# हातिमताई



BVBK-0402825

ग्रो. वा.
२८२५
९/८/६२

म. ग्रं. सं. मुंबई, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
ग्र. क्र. ............ दिनांक .......
विषय ............... क्र. .........

# हातीमताई

हुस्नबानूच्या सात प्रश्नांची उत्तरे देणारा तई राजाचा पुत्र हातीम याच्या सत्यप्रिय, त्यागी, परोपकारी, साहसी जीवनाची मनोवेधक, अद्भुतरम्य, सुरस, बोधप्रद, वाचनीय कथा.

२८२५
बा : वा

: लेखक :

श्री. प्रभाकर नारायण तुंगार
बी. ए.

BVBK-0402825

सेंट्रल प्रकाशन मुंबई–४

*प्रकाशक :*
एफ. बी. बुरहाणपूरवाला,
सेन्ट्रल प्रकाशन,
६ ए, विजय चेंबर्स, मुंबई-४०० ००४.

❋

*मुखपृष्ठ छपाई :*
महाराष्ट्र प्रिंटरी,
मुंबई-४०० ००४.

❋

*पुनर्मुद्रण :*
ऑगष्ट १९९२

❋

*सर्वाधिकार प्रकाशकाधीन*

❋

*मुद्रक :*
ए. एफ. बुरहाणपूरवाला
महाराष्ट्र प्रिंटरी, पाववाला बिल्डींग,
पाववाला स्ट्रीट, मुंबई-४०० ००४.

पूर्वी एकेकाळी येमेनचा बादशहा तई याने खूप वर्षे राज्य केले. आपल्या अलकिरसमा नावाच्या चुलत्याच्या कन्येशी विवाह केला. पुढे बऱ्याच दिवसांनी त्यांना एक सुंदर मुलगा झाला.

त्यावेळी बादशहाला अतिशय आनंद झाला. त्याने अनेक पंडितांना बोलावून म्हटले की, 'आपल्या पंचांगात पाहून याचे अचूक भविष्य सांगा.' त्या सर्व विद्वानांनी त्याची पत्रिका तयार केली व ती पाहिल्यावर बादशहास सांगितले की, 'खुदावंत! आमच्या मते हा राजपुत्र बादशहा तर होईलच, पण त्याशिवाय तो आपले सारे आयुष्य परोपकारात घालवून पुण्यसंचय करील. प्रत्यक्ष विधात्याचेच कार्य केल्यामुळे याचा किर्तीरूपी सुगंध आकाशात चंद्रसूर्य असेपर्यंत चोहीकडे दरवळत राहील.' हे ऐकून बादशहा एकदम खूश झाला. त्याने ह्या लोकांना खूप जडजवाहीर व मोहरा देऊन निरोप दिला.

नंतर त्या मुलाचे मोठ्या थाटाने 'हातिम' असे नांव ठेवून त्याने आपल्या सरदारांना आज्ञा केली की, 'तुम्ही सगळीकडे दवंडी जाहीर करा की, 'माझ्या राज्यात आज ज्याच्या कुटुंबात मुलगा जन्माला आला असेल तो आजपासून बादशहाचा नोकर आहे. त्याच्या मातापित्यांनी त्याला इकडे पोहोचते करावे. मुलाचे लालनपालन येथेच केले जाईल.

बादशहाचा हुकूम ऐकताच प्रत्येकाच्या आईवडिलांनी आपापला मुलगा हुजूरांकडे पोहोचता केला. त्या दिवशी राज्यात सहा हजार मुलगे जन्माला आले होते.

नंतर त्या सर्व मुलांसाठी सहा हजार दाया व नोकरचाकर ठेवले गेले. त्या मुलांपैकी एकावर सर्वांचे विशेष लक्ष होते, तो म्हणजे हातिम. त्याला अनेक दाया जपत व अनके प्रकारांनी खेळवत असत. एवढे करूनही तो मुलगा डोळे उघडेना किंवा दूधसुद्धा घेईना.

तो प्रकार पाहून बादशहा बुचकळ्यात पडला व त्याने

सरदारांना हुकूम सोडला 'की, पंडितांना ह्याचे कारण विचारा. ते ऐकल्यावर पंडितांनी सांगितले की, सर्व मुलांचे दूध पिऊन झाल्यावर हा दूध पिईल' त्याप्रमाणे सर्व मुलांना दूध पाजल्यावर तो प्याला. पुढे त्या सहा हजार मुलांबरोबर त्याचे जेवणखाणे होऊ लागले.

जेव्हा तो १४ वर्षांचा झाला तेव्हा त्याने बापाची संपत्ती गोरगरिबांस वाटून टाकली. त्याने कधीही कोणावर जुलूम केला नाही. आपले नुकसान करून घेतले नाही किंवा दुसऱ्याचेही केले नाही.

पुढे तारूण्य प्राप्त झाल्यावर तो इतरांना उपदेश करू लागला की, 'ही सर्व सृष्टी ईश्वराने निर्माण केली. त्याच्या कारागिरीनी चौऱ्याशी लाख विश्वे निर्माण केली आहेत' त्याच्याप्रमाणे प्रत्येकाने आपापल्या कर्तृत्वाने पुढे यावे.'

लवकरच त्याचे लावण्य, शौर्य बुद्धिमत्ता, परोपकारी वृत्ती याची किर्ती वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली.

एकदा तो जंगलात शिकारीसाठी गेला असता एक सिंह त्याच्या अंगावर गुरगुरताना दिसला. तेव्हा त्याने मनात विचार केला की, 'मी खंजीर मारला तर तो घायाळ होईल. सोडून दिले तर माझा प्राण घेईल. पण मग ह्याचा आत्मा तरी कसा शांत होईल?'

शेवटी तो स्वतःच सिंहापुढे उभा राहून म्हणाला, 'हे वनराजा! मी व माझा घोडा तुझ्यासमोर हजर आहोत. तुला आवडेल त्याला खाऊन तू तृप्त हो.' ते ऐकून तो सिंहराज आपली गर्दन झुकवून हातिमच्या पायांवर पडला आणि डोके त्याच्या पायांवर चोळू लागला. त्याचे पाय चाटू लागला. तेव्हा हातिमने त्याला पुन्हां सांगितले की, 'मला खात नसशील तर माझ्या घोड्याला खा,' पण सिंह काही न करता मान खाली घालून तेथून निघून गेला.

अशा प्रकारे हातिम सर्वांसाठी झटत होता. परोपकारासाठी आपले आयुष्य वेचित होता.

# हा ति म ता ई

## हूस्नबानूची कथा

अति प्राचीनकाळी खुरासन प्रांतामध्ये एक लौकिकसंपन्न बादशहा राज्य करीत होता. त्याचे पदरी आठ प्रधान होते. ते कर्तव्यदक्ष होते. इतर नोकर-चाकरसुद्धा आपले काम दक्षतेने करीत.

बादशहाचे नाव होते कर्दनशहा.

कर्दनशहा इतका न्यायनिष्ठुर होता की, न्यायासनापुढे प्रत्यक्ष मुलाचीही ता पर्वा करीते नसे.

प्रत्यक्ष राज्यात रहाणारा बरझाक नावाचा अत्यंत धनवान व उदार अंत:करणाचा सौदागर, राजाचा जिवलग मित्र होता. बरझाकला फक्त एकच कन्यारत्न होते, तिचे नाव हुस्नबानू.

कांही काळाने मरणसमयी सौदागराने राजास बोलावून आपली धनदौलत व कन्या हुस्नबानू त्याच्या ताब्यात दिली.

मित्राच्या अफाट संपत्तीचा लोभ न धरता हुस्नबानू तारूण्यात आल्यावर राजाने सर्व संपत्ती तिच्या स्वाधीन केली. हुस्नबानू आपल्या दाईसमवेत पित्याच्या वाड्यात राहू लागली.

हुस्नबानूची आई लहानपणीच वारली असल्याने ती दाईसच आई म्हणत असे. एके दिवशी हुस्नबानू दाईस म्हणाली, 'आई! हा संसार निरर्थक आहे. सारी धनदौलत गरिबांस वाटून अल्लाचे नामस्मरण करीतच जीवन सार्थकी लावावे असे मला वाटते. या बाबतीत तुझे मत काय आहे?

ते बोलणे एकून ती दाई मोठ्या प्रेमाने म्हणाली, हा वेडेपणा तू करू नकोस. एका साधुमहाराजांच्या कृपेने मला सात प्रश्न माहीत आहेत. ते सर्व प्रश्न तू दरवाजावर लिहून ठेव. त्याची जो समाधानकारक उत्तरे देइल त्याच्याशी तू लग्न कर म्हणजे तुझे जीवन सुखी व समाधानी होईल.

[१] एक वेळ पाहिले आहे पुन्हा पहाण्याची इच्छा आहे.
(एक बार देखा है, दुसरी बार देखने की तमन्ना है)

[२] चांगले कर आणि पाण्यावर टाक.
(नेकी कर और दरिया में डाल)

[३] कोणालाही दगा देऊ नकोस. देशील तर तशीच फळे भोगशील.
(बदी किसीसे न कर अगर करेगा तो वही पावेगा)

[४] खरे बोलणारा सदा सुखी असतो.
(सच कहनेवाला हमेशा खुशहाल होता है)

[५] 'कोहनिदा' असे आवाज करणाऱ्या पर्वताची खबर आण.
('कोहनिदा' पहाड की खबर ला दे)

[६] पाणकोंबडीच्या अंड्याएवढा एक मोती माझ्यापाशी आहे. त्याच्या जोडीला दुसरा घेऊन ये
(वह मोती जो मुर्गाबी के अंडे के बराबर बिल फैल मौजूद है उसीकी जोडी पैदाकर दो।)

[७) हमामबाद गिर्दची बातमी आण.
(यह है कि हमामबाद गर्द की खबर ला दे)

दाईने सांगितलेले सातही प्रश्न ऐकल्यावर हुस्नबानू म्हणाली

की 'या प्रश्नांची उत्तरे देणारा ज्ञानसंपन्न पुरूष सापडणे अत्यंत अवघड आहे व त्याप्रमाणे सापडल्यास त्याच्याशी विवाह करून मी सुखी होईन हे तरी कशावरून? तिचा प्रश्न ऐकून त्या दाईने साधूची योग्यता सांगितली व त्याप्रमाणे आचरण केल्यास सुखप्राप्ती निश्चित होईल असा विश्वास तिच्या ठिकाणी निर्माण केला.

## हुस्नबानू व ढोंगी साधू

हुस्नबानू त्याप्रमाणे आपल्या जीवनातील दिवस घालवीत होती. एक दिवस रस्त्यावरील मौज खिडकीतून ती पाहत होती. एक वृद्ध साधुमहाराज आपल्या शिष्यांसह रस्त्यावरून जाताना दिसला.

त्याचे शिष्य त्याच्या मार्गावर सोन्यारूप्याच्या विटा ठेवीत होते. त्यावरून जमिनीला पाय न लावता साधुपुरूष चाललेला पाहून ती आश्चर्यचकीत झाली व तिने दाईस हा असा का चालला आहे असे विचारले.

तेव्हा दाई म्हणाली, 'बेटी, हा साधुपुरूष राजाचा गुरू आहे व त्याच्या भेटीसाठी तो जात आहे. कधी कधी राजासुद्धा त्याच्या दर्शनास जातो.'

नंतर बानूने दाईला विचारले की, 'आई! तुझी परवानगी असेल तर या साधुपुरूषास आपल्या घरी बोलावून त्याचे दर्शन मी घेऊ का?' तेव्हा मी म्हणाली, 'तुझी इच्छा असल्यास जरूर दर्शन घे.'

त्याप्रमाणे आपल्या चाकराकरवी हुस्नबानूने साधूस निरोप

पाठविला की, आपल्या चरणांची धूळ आमच्या घराला लावून आम्हाला पावन करावे अशी प्रार्थना आहे.

साधूने तिच्या प्रार्थनेचा स्वीकार केला. दुसऱ्या दिवशी येण्याचे मान्य केले. हुस्नबानूस अतिशय आनंद झाला. तिने त्या दिवशी संपूर्ण महाल शृंगारला. निरनिराळ्या प्रकारची उत्तमोत्तम पक्वान्ने तयार केली. प्रात:काळीच साधूला घेऊन येण्यासाठी चाकरास पाठवून दिले.

बाह्यात्कारी साधू असणारा तो इसम अत्यंत दुष्ट व भयंकर नीच पातळीचा ढोंगी माणूस होता. दुष्ट कृत्ये करण्यास तो सरावला होता. त्याचे शिष्यसुद्धा पापकर्म करण्यात पटाईत होते.

पण आश्चर्याची गोष्ट ही होती की, त्याच्या पापांचा सुगावा कोणालाच लागत नसे. त्यामुळे राजाचीसुद्धा त्याच्या ठिकाणी श्रद्धा होती. राजादेखील त्याला पूज्य मानी.

साधूच्या स्वागतासाठी हुस्नबानूने सर्व वाडा सजविला. दिवाणखान्यात भरजरी बैठकी घातल्या. ठरलेल्या वेळी साधू आपल्या शिष्यासह आला. बानूने त्याला आसनावर बसविले. मनोभावे त्याची पूजा केली. मौल्यवान जवाहिऱ्यांची भरगच्च ताटे त्याच्यासमोर ठेवून ती हात जोडून उभी राहिली..

तेव्हा ती धनदौलत पाहून साधु शांतपणे म्हणाला, 'ही संपत्ती घेऊन मी काय करणार? मला त्याचा उपयोग काय?

साधूची ही वैराग्य वृत्ती पाहून बानूला त्याचेबद्दल अतिशय आदर वाटू लागला.

नंतर साधूला बानूने दुसऱ्या दालनात नेऊन भरजरी पोषाख अर्पण केला. पण त्याने त्याचाही अंगिकार केला नाही.

त्यानंतर तिसऱ्या दालनात बानू त्यांना घेऊन गेली. तेथे मोत्याचे जाळीदार पडदे सोडलेले होते. हंड्या व झुंबरांनी तर फारच शोभा आली होती. सोन्यारूप्याच्या सुंदर ताटात तऱ्हेतऱ्हेची चविष्ट पक्वान्ने वाढून बानूने सर्वांपुढे ठेवून त्यांना प्रार्थना केली, 'महाराज! जवाहर व भरजरी पोषाख यांचा आपण स्वीकार केला नाही, तेव्हा जर कृपा करून थोडा उपहार केलात तर मी स्वत:ला भाग्यवान समजेन.'

तिची ती प्रार्थना ऐकून तो दुष्ट साधू जड अंत:करणाने खावयास बसला. पण त्याची नजर तिच्या मौल्यवान संपत्तीकडे होती. राजापेक्षाही अधिक ऐश्वर्य असणारी तिची संपत्ती लुटावी कशी याची चिंता त्याला लागून राहिली होती. भोजन झाल्यावर अत्तर-गुलाबाचा स्वीकार करून हुस्नबानूस आशीर्वाद देऊन साधुमहाराज तेथून बाहेर पडले.

त्या दिवशी हुस्नबानू आणि तिचे नोकरचाकर साधूच्या आदरातिथ्याने थकून जाऊन गाढ झोपले होते. त्यांनी मौल्यवान वस्तूंची आवराआवर केली नव्हती. एवढेच तर त्या वाड्याचे दरवेजेही लावयचे राहून गेले होते.

तो दरोडेखोर साधू आपल्या चाळीस शिष्यांसह मध्यरात्री वाड्यात आला. त्याने लगेच किमती वस्तू चोरण्याचा सपाटा चालविला. तेवढ्यात बानूचे काही नोकर जागे झाले व चोरांना प्रतिकार करू लागले. परंतु त्याच्यापैकी कांहीना ठार करून तर कांहीना जखमी करून साधूने संपत्ती लुटून नेलीच. त्याच्या या गोंधळाने हुस्नबानूस जाग आली व तिने त्या दुष्ट साधूची पापकर्मे स्वत: पाहिली.

ज्याला आपण दैवी अंग मानला तो साधूच महा नीच

कृत्ये करणारा आहे हे पहाताच बानूस अतिशय संताप आला. त्याचा नायनाट केलाच पाहिजे, म्हणून जखमी नोकरांना घेऊन ती राजवाड्यात आली.

प्रधानाने तिची हकीगत ऐकून घेतली व ती राजास सांगून तो म्हणाला, 'महाराज! तुमच्या जिवलग मित्राची कन्या आपल्याला स्वत: हकीगत सांगण्याची परवानगी मागत आहे.'

राजाने त्याप्रमाणे बानूस बोलाविले तेव्हा घडलेली सर्व हकीकत सांगून ती म्हणाली, 'खुदावंत! ज्याला आपण गुरू मानलेत त्याने विरक्तपणाचे सोंग घेऊन अशी भयंकर कृत्ये केली आहेत, तेव्हां योग्य न्याय करावा.'

## बानूच्या पदरी वनवास

तिची हकीकत ऐकून राजा रागाने लाल झाला आणि म्हणाला, 'गुरुची निंदा करणाऱ्या हिचा ताबडतोब शिरच्छेद करा!'

तेव्हा प्रधानास दया येऊन त्याने हात जोडून राजास प्रार्थना केली की, 'खुदावंत! आपल्या पोटच्या गोळ्याप्रमाणे हिचे आपण संगोपन केलेत, तेव्हा एवढी भयंकर शिक्षा तिला देऊ नये!' तेव्हा राजा म्हणाला, ठीक आहे! तुमच्या म्हणण्याला मान देऊन मी हिला हद्दपार करून हिची सर्व संपत्ती जप्त करून टाकण्याचा हुकूम देत आहे.'

खरी हकीकत सांगूनही राजाचा उलटा न्याय पाहून बानू अतिशय दु:खी अंत:करणाने आपल्या दाईसह उद्वेगाने अरण्याच्या मार्गाने चालू लागली. पुढे चालून दमल्याने त्या दोघी एका झाडाखाली विश्रांती घ्यावी म्हणून थांबल्या. बानूला आपल्या

पूर्वीच्या परिस्थितीची जाणी झाली व ती दाईस म्हणाली, 'आई! देवाचा असा काय गुन्हा केला आहे म्हणून ही भयंकर शिक्षा तो मला भोगावयास लावीत आहे.' तेव्हा दाई म्हणाली, 'बेटी! दैव फिरल्यावर देवाला दोष देऊन काय होणार?'

## दिव्य साधुचा साक्षात्कार

श्रम, तहान आणि भुकेने व्याकुळ झाल्याने त्यांना त्या अवस्थेत झोप लागली, झोपेत बानूच्या स्वप्नात एक दिव्य साधू आला आणि तिला म्हणाला, 'मुली! तू दुःखीकष्टी होऊ नकोस. या वृक्षाखाली अलोट संपत्तीने भरलेल्या सात खोल्या आहेत त्या तुला मी बक्षीस देतो. येथेच एक शहर वसवून तू सुखाने राहा.'

हुस्नबानू दचकून जागी झाली. लगेच तिने दाईला जागे केले आणि आपले स्वप्न सांगितले. तेव्हा तिलाही समाधान वाटले.

त्याप्रमाणे थोडे खणू लागताच द्रव्य आढळू लागले. परमेश्वरी लीलेचे कौतुक करीत तिने थोडे दाईकडे दिले व बाजारातून आवश्यक त्या वस्तु खरेदी करुन आणण्यास सांगितले. पण भीषण अरण्यात बानूला एकटी सोडून जाण्यास ती प्रेमळ दाई तयार होईना.

थोड्याच वेळात एक फकीर रस्त्याने जाताना दिसला. दाईने त्याला ओळखून हाक मारली. बानूचा चुलत भाऊच होता. त्याला घडलेली सर्व हकीगत सांगून बाजारात पाठवून दिले.

त्याने येताना अन्न, वस्त्र, कारागीर व बांधकामाचे साहित्य

आणले. त्यानंतर साधूच्या दिव्य संदेशप्रमाणे शहर वसविण्याचा ती विचार करू लागली.

ती राजाची हद्द असल्याने शहर वसविण्यासाठी प्रथम त्याची परवानगी आणा असा सल्ला बानूला कारागिरांनी दिला. त्यासाठी ती बादशहाकडे आली.

## राजुपत्र वेशात राजाकडे

राजाच्या आज्ञेवरुन ती राजासमोर उभी राहिली. त्यावेळी तिचा वेश राजपुत्राचा होता. त्यामध्येही ही अतिशय तेजस्वी व मोहक दिसत होती.

भेटीसाठी आणलेला नजराणा राजापुढे ठेवून तिने राजास प्रणाम केला. राजपुत्राचे सौंदर्य पाहून राजासुद्धा चकित झाला.

नंतर राजपुत्र आपली हकीकत सांगू लागला, 'महाराज! मी एक व्यापारी पुत्र आहे. माझ्या लहानपणी माझा पिता समुद्रमार्गे प्रवास करीत असता तुफान वादळात सापडून मृत्युमुखी पडला. मी मोठा झाल्यावर शहर वसवून रहावे या उद्देशाने आपल्या परवानगीसाठी आलो आहे. तेव्हां कृपावंत होऊन आज्ञा दयावी. त्याचे हे विनयशील भाषण ऐकून राजा म्हणाला, 'तुला पहाताच मला पुत्र लाभल्याचा आनंद होत आहे. मलाही पुत्र नाही. तेव्हा माझे राज्य मी तुलाच देईन. आता येथून जाऊ नयेस. तुझे नाव याहरुशा ठेवतो.'

तेव्हा चतुराईने बानू म्हणाली, 'जर मी तुमचा पुत्र आहे, तर माझा हा हट्ट आपल्याशिवाय कोण पुरवणार?'

निरुत्तर कर्दनशहाने मधून मधून माझ्या भेटीस ये, असे

म्हणून शहर वसविण्यास परवानगी दिली आणि कारागिरांना शहर वसविण्याचा हुकूम दिला. रात्रंदिवस खपून दोन वर्षांनी एक ऐश्वर्यसंपन्न शहर वसविले. त्याचे नाव शहाबाद ठेवले.

## दुष्टाला पापाचे प्रायश्चित्त

एकदा बानू राजाच्या भेटीसाठी गेली असता तिने तो नकली साधू तेथे आलेला पाहिला. तेव्हा ती त्याला वंदन करुन म्हणाली, 'महाराज! आपल्यासारख्या वैराग्य वृत्तीच्या महात्म्याने माझ्या सारख्या पामराकडे चरणधूळ झाडली तर मी धन्य होईन.' तिच्या प्रार्थनेचा साधूने स्वीकार केला.

तो साधू गेल्यावर तिने राजास विनंती केली की, 'महाराजांनी कृपावंत होऊन शहरातील बरझाक व्यापाऱ्याचे रिकामे घर मला राहण्यास द्यावे म्हणजे साधूच्या सेवेचा लाभ घेता येईल!'

राजाची परवानगी मिळाल्यावर एक महिन्याने बऱ्याच साधन सामुग्रीसह ती बरझाक व्यापाऱ्याच्या घरी रहावयास आली. साधूस तिने बोलाविले. सर्व वाडा सुशोभित केला. साधूला बसविण्यासाठी सुंदर आसन मांडले शिष्यांना आसन म्हणून रुप्याचे पाट मांडले.

साधूच्या आगमनानंतर बानूनें त्याची मोठ्या थाटामाटाने पूजा केली. मौल्यवान हिरेमाणकांचा नजराणा अर्पण केला. पण त्या साधूने वैराग्यवृत्तीने तो नाकारण्याचे सोंग केले. नंतर मेवामिठाईची ताटे मांडून भोजन करावे म्हणून प्रार्थना केली. साधूने दोनचार घास खाल्ल्यावर सांगितले, 'फकिराला एवढे पुरे आहे. तरीही तिने विनंती केल्यावर तो म्हणाला, 'तुझ्या विनंतीला मान देऊन एवढे तरी खाल्ले, नाहीतर दोनचार दाणे खाऊन अष्टौप्रहर ईश्वर

चिंतनात मी मग्न असतो' एवढे बोलून तो भोंदू साधू ताबडतोब निघून गेला.

अगोदरच बानूला सर्व कल्पना असल्याने तिने कोतवालास वर्दी दिली की, कांही दरोडेखोर आज दरोड्यासाठी अपरात्री येतील तेव्हा तुम्ही संरक्षण द्यावे.

त्यानंतर आपल्या नोकरचाकरास जागरूक राहण्याचा इशारा देऊन सर्व भौल्यवान संपत्ती बानूने उघडीच ठेवली.

मध्यरात्री साधू आपल्या शिष्यासंह दरोडा घालण्यासाठी आला. तेव्हा दबा धरून बसलेल्या कोतवालाने त्याला शिष्यांसह पकडून नेले.

दुसरे दिवशी सभेत कोतवालाने सर्व दरोडेखोरांस हजर केले. त्यामध्ये साधूला पाहून राजाला फार संताप आला. त्याच्या तपासात बानूकडची सर्व संपत्ती सापडली.

बानूला आपण हद्दपार केले तिच्या बापाला तिचे संगोपन करण्याचे जे वचन दिले ते आपण पाळले नाही म्हणून राजाला फार दुःख झाले. मी बानूस व्यर्थ हद्दपारीची भयंकर शिक्षा दिली. असे म्हणून त्याने निःश्वास टाकला.

तोच बानू हात जोडून म्हणाली, 'महाराज, व्यर्थ शोक का करता? बानू तुमच्यापुढे उभी आहे.'

राजाला आश्चर्याचा धक्का बसला व त्याने आनंदाने हुस्नबानूस मिठी मारली.

त्या ढोंगी साधूला जबरदस्त शिक्षा झाली. बानूला आता राजा सोडेना, तेव्हा तिने उलट राजासच हौसेने बांधलेल्या आपल्या

शहरी मुक्कामास येण्याची विनंती केली. तिच्या विनंतीला मान देऊन राजा लव्याजम्यासह तीन दिवस शहाबादला राहिला.

राजाच्या स्वागतासाठी बानूने सारे शहर शृंगारले. तिचे वैभव पाहून राजा चकित झाला. तीन दिवस मेजवान्या व इतर कार्यक्रम झाले. राजाला परत जाताना आपणास दिव्य साक्षात्काराने प्राप्त झालेली सारी संपत्ती नजराणा म्हणून घेण्याची बानूने प्रार्थना केली. तिच्या आग्रहाने राजाने त्याचा स्वीकार केला.

पण ज्यावेळी राजाचे नोकर ते द्रव्य घेऊन जाण्यासाठी द्रव्याजवळ गेले तेव्हा तेथे सर्वत्र साप आणि विंचू दिसू लागले.

ही बातमी राजास कळविली तेव्हा तो म्हणाला, 'परमेश्वराने ही संपत्ती तुझ्यासाठीच निर्माण केली. ती आमच्या कामाला येणार नाही. तू याचा आनंदाने उपभोग घे' असे सांगून राजा निघून गेला.

त्या द्रव्यसाहाय्याने बानूने मोठमोठ्या धर्मशाळा बांधल्या तेथे प्रत्येक वेळा प्रवाशांच्या आदरातिथ्यासाठी ती जातीने हजर असे.

तिच्या या थोरपणाची कीर्ती साऱ्या त्रिभुवनात सूर्यतेजासारखी परसली.

## हुस्नाबानू, चित्रकार व शाहजादा मुनीर

हस्नबानूची थोरवी खारमिझ शहराचा रूपगुण व विद्यासंपन्न राजपुत्र मुनीरशाह याला कळली. तिला पहावे अशी प्रबळ इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली. म्हणून त्याने एका चित्रकारास बानूकडे जाऊन तिची हुबेहुब तसवीर काढून आणण्यास सांगितले.

त्याप्रमाणे तो प्रवास करीत करीत शहबादेस येऊन पोहचला व तेथील एका धर्मशाळेत उतरला.

तेथे त्याचे उत्तम तऱ्हेने आदरातिथ्य करण्यात आले, तेथील नोकरांनी त्याच्या इच्छेप्रमाणे त्यास हुस्नाबानूकडे नेले. तेव्हा त्याच्याशी पाडदयाआडूनच बोलताना तिने विचारले, 'तुझी इच्छा काय?' तेव्हां चित्रकार म्हणाला, 'मी एक चित्रकार असून आपल्या सेवेसाठी मी हजर झालो आहे, 'तेव्हा बानूने त्यास तेथेच ठेवून घेतले.

कांही दिवसांनी आपले चित्र काढून घ्यावे अशी तिला इच्छा वाटू लागली. तेव्हा तिने त्या चित्रकारास बोलावून घेतले. तो फार उत्कृष्ट चित्रकार असल्यानें त्याने बानूस उंच जागी उभे केले. खाली एक पाण्याचं भांडे ठेवून त्यात पडलेल्या बानूच्या प्रतिबिंबाकडे पाहून त्याने आपले कौशल्य पणास लावून बानूचे हुबेहूब चित्र काढले.

नंतर त्याच प्रकारे त्या चित्राची आणखी एक प्रत त्याने काढली. एक प्रत बानूस नजर केली. दुसरी स्वतःकडे ठेवली. आपले हुबेहूब चित्र पाहून बानू अतिशय खुश झाली व तिने चित्रकाराची स्तुती केली.

नंतर एकदा चित्रकार बानूजवळ जाऊन रजा मागू लागला तेव्हा त्याला बक्षिसी म्हणून बानूने भरपूर द्रव्य देऊन निरोप दिला.

नंतर तो चित्रकार खारमिझ शहरात आला. त्याने हुस्नबानूचें चित्र राजपुत्रापुढे ठेवले. त्यास घडलेली हकीकत सांगितली.

ते अप्रतिम सौंदर्य पाहून राजपुत्र बेभान झाला. बानूला

प्रत्यक्ष भेटण्याचे ठरवून शिकराचे कारण सांगून तो खारमिझ शहरातून निघाला. प्रवास करीत करीत तो थेट शहाबादेतील धर्मशाळेत येऊन उतरला.

रीतीरिवाजाप्रमाणे धर्मशाळेतील सेवकांनी त्याच्या आदरातिथ्यास सुरुवात केली. परंतु त्याने ते नाकारले. ही गोष्ट बानूच्या कानावर जाताच तिने त्याची चौकशी करण्यासाठी बोलावून घेतले.

तेव्हा आपल्या येण्याचे कारण सांगताना शाहजादा मुनीर म्हणाला, 'तुझ्यासारख्या गुणी, उदार व लावण्यसंपन्न स्त्रीशी विवाह करावा या एकमेव इच्छेनेच मी तुझ्या भेटीला आलो आहे' तेव्हा बानू जड अंत:करणाने म्हणाली, ही गोष्ट शक्य नाही. कारण मी विचारलेल्या सात प्रश्नांची जो समाधानकारक उत्तरे देईल त्याच्याशीच विवाह करण्याची मी प्रतिज्ञा केली आहे.' ते ऐकून तिचे प्रश्न जाणून घेण्याची इच्छा त्याने प्रदर्शित केली. तेव्हा बानू म्हणाली, 'एकवेळ पाहिलेले पुन्हा पाहण्याची इच्छा आहे' असे म्हणणाऱ्या मनुष्याची बातमी आणणे हा झाला पहिला प्रश्न. याचे उत्तर आणल्यावर मी दुसरा प्रश्न सांगेन. या पद्धतीने माझ्या प्रश्नांची तू योग्य उत्तरे दिल्यास मी तुझ्याशी विवाह करीन.'

राजपुत्राने बानूची तसबीर बरोबर घेतलीं व पहिल्या प्रश्नाचे उत्तर एका वर्षात घेऊन येतो असे म्हणून तो तेथून निघाला.

त्यावेळी त्याने एका फकिराचा वेश धारण केला होता. सुरुवातीला जरी तो मोठ्या हुशारीने तपासास निघाला होता, तरी पुढे भटकून भटकून तो इमाम शहराजवळच्या भागात आल्यावर दमल्याने विश्रांती साठीं एका झाडाखाली बसला. परंतु बानूच्या प्राप्तीचे विचार मनात येताच तो निराश होऊन रडू लागला.

# परोपकारी हातिमची भेट

योगायोगाने त्याचवेळी येमेन देशाचा राजा हातिम शिकारीच्या निमित्ताने तेथे आला होता. परोपकारी व सद्गुणी राजाच्या कानावर ज्यावेळी त्या माणसाच्या रडण्याचा आवाज आला तेव्हा आपल्या सेवकास त्याने त्याचा शोध करण्यास धाडले. सेवकाने परत आल्यावर सांगितले, 'महाराज! एका झाडाखाली एक फकीर रडत बला आहे, पण विचारले असता तो काहींच बोलत नाही.' त्याचे हे बोलणे ऐकून हातिम स्वत: चौकशीसाठी तेथे आला व म्हणाला, 'हे तरुणा! तुझ्या चेहऱ्यावरून तर तू उच्च घराण्यांतील दिसतोस, तर मग ह्या फकीर वेशात तू रानावनातून कां हिंडतोस?'

हातिमकडे पहताच हा कोणीतरी थोर पुरुष असावा ह्या समजुतीने मुनीर म्हणाला, 'महाराज, मी अन्नवस्त्राच्या अभावाने दु:खी नसून केवळ हृदरोगाने मी भयंकर पींडित झालो आहे. त्यामुळेच माझी अशी दैन्यावस्था झाली आहे.'

त्यावर हातिम म्हणाला, 'तुझे दु:ख जर मला कळेल तर माझ्या सर्व प्रयत्नाने ते दूर करण्याची मी जास्तीत जास्त खटपट करीन.' ते ऐकून हुस्नबानूचे चित्र दाखवून मुनीरने हातिमास सर्व हकीकत सांगितली.

थोडा विचार केल्यावर हातिम म्हणाला, 'अरे, तू बिल्कुल काळजी करू नकोस. मी हुस्नाबानूच्या सातही सवालांचा जबाब देऊन तुला तुझ्या इच्छेप्रमाणें तिची प्राप्ती करून देतो.'

मग ते दोघे इमाम शहरी गेले. त्यानंतर तेथून ते शाहबादेस बानूकडे आले. त्यांचे योग्य आदरातिथ्य केल्यावर हातिम बानूस

म्हणाला, 'तुझ्या अप्रतिम लावण्यावर हा लुब्ध झाला आहे. तुझ्या सवालाचा जो जबाब देईल त्यासच तू विवाहमाळ घालणार, त्यामुळे याची इच्छा पुरी होणार नाही. त्याच्यातर्फे मी जर तुझ्या प्रश्नांची उत्तरें दिली तर तू त्याला वरशील काय?' त्यावर बानूने उत्तर दिले की, 'हे गुणवान उदार पुरुषा! आपण इतक्या कष्टानें माझ्या प्रश्नांची उत्तरे आणलीत तर आपल्या सांगण्याबाहेर मी नाहीं.'

तेव्हा व्यवहारचतुर हातिमने दोन साक्षीदार ठेवून बानूकडून तसा करार लिहून घेतला. प्रश्नांची उत्तरे देईपर्यंत मुनीरशहाचा सांभाळ करण्यास सांगितले. त्याप्रमाणे बानूने आनंदाने त्याची व्यवस्था लावली हातिम सर्वांना भेटला व त्यांचा निरोप घेऊन पहिल्या उत्तराच्या शोधार्थ तेथून निघाला.

# पहिला प्रश्न

## एक वेळ पाहिले आहे, पुन्हा पाहण्याची इच्छा आहे

परमेश्वरावर श्रद्धा ठेवून शहाबाद येथून पहिल्या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधासाठी हातिम प्रवासास निघाला. एका भयंकर अरण्यातून जात असताना एक लांडगा एका हरणीला पकडण्यासाठी धांवत असलेला त्याने पाहिला. ते दृश्य पाहून दयाळू हातिम जोराने ओरडून म्हणाला, 'अरे ये लांडग्या! त्या गरीब हरिणीस मारून खाऊ नकोस. तिच्या पाडसावरील प्रेमामुळे तिच्या सडातून दूध पाझरत आहे.' ते ऐकून तो लांडगा म्हणाला, 'हे श्रेष्ठ पुरुषा! ज्या अर्थी तुला ह्या हरिणीची दया आली त्या अर्थी तू हातिमच असला पाहिजेस!' लांडग्याचे ते बोलणे ऐकून हातिम आश्चर्यचकित

होऊन म्हणाला 'हे तुला बरोबर कसे समजले?' त्यावर लांडगा म्हणाला, सर्व प्राणिमात्रांवर दया करणारा असा हातिमशिवाय दुसरा कोणीही नाही, अशी आमच्या जातीत ख्याती असल्यामुळे मी हा तर्क केला. मला आता अतिशय भूक लागली आहे. तेव्हा तू माझी भूक भागविण्याची ताबडतोब व्यवस्था कर.'

त्यावर हातिमने त्याला विचारले की, 'तुला काय पाहिजे ते माग.' लांडगा म्हणाला, ' मांसाशिवाय इतर काहींही मी खात नाही.' ताबडतोब हातिमने स्वतःची मांडी चिरुन लांडग्यास मांसाचा एक तुकडा दिला. त्यामुळे संतुष्ट झालेल्या लांडग्याने त्यास प्रवासाचे कारण विचारले. हातिमने त्यास सर्व हकीकत सविस्तर सांगितली आणि पहिला प्रश्न पण सांगितला. तेव्हा लांडगा म्हणाला, 'तो माणूस माझ्या पाहण्यात नसला तरी तो हौदाच्या अरण्यात राहातो हे मी ऐकले आहे. ते अरण्य ह्या ठिकाणाहून खूप लांब गेल्यावर लागणाऱ्या दोन रस्त्यापैकी डाव्या हाताच्या रस्त्याने प्रवास केल्यावर लागते. नंतर लांडगा तेथून निघून गेला. मांडीचे मांस कापून लांडग्यास दिल्यामुळें हातिमला खूप वेदना होत होत्या. त्यामुळे तो तसाच तेथील झाडाखाली निपचित पडून राहिला.

संध्याकाळी एक कोल्ह्याचे जोडपे आपले भक्ष्य घेऊन तेथे आले. कोल्हिणीने हातिमास पाहिले आणि ती म्हणाली, 'आता ह्या ठिकाणी माणसे येऊ लागली आहेत, तेन्हा हे ठिकाण आपण सोडले पाहिजे.' ते ऐकून कोल्हा तिला म्हणाला, 'हा माणूस इतरांप्रमाणे नाही. सर्व प्राणिमात्रांवर दया दाखविण्यासाठी प्रत्यक्ष ईश्वराने ह्याला निर्माण केले आहे.' त्यावर कोल्हिणीने विचारले, 'हे तुम्हास कसे समजले? 'तेव्हां कोल्हयाने हातिम नांवाचा एक अत्यंत परोपकारी माणूस मांडीवरचे मांस दिल्यानें

जखमी होऊन व्याकुळ झाला आहे. त्यावर उपचार करुन तू त्याला बरे कर.' त्याच्या खमेवरील औषध पण त्याने मला सांगितले आहे. त्याच्या मांडीवरचे मांस का गेले असे विचारल्यावरुन कोल्ह्याने बानू, मुनीरशहा व लांडग्याची सगळी हकीकत तिला सांगितली.

मग तो तिला म्हणाला, ' आता याची या व्याधीपासून मुक्तता करण्यासाठी मी 'माझनद्राना' अरण्यात जो पारो नावाचा पक्षी आहे त्याचा मेंदू आणण्यासाठी जातो. मी सात दिवसांत औषध घेऊन परत येतो. तोपर्यंत तूं ह्याचा सांभाळ कर.' नंतर कोल्हा निघून गेला. हातिम सर्व ऐकत होता, पण अंगात त्राण नसल्याने तो तसाच पडून राहिला.

इकडे कोल्हा प्रवास करीत माझनद्राना अरण्यात पोहोचला. तेथे एका झाडाखाली पारो पक्षी झोपला होता. त्याला मारुन त्याचे डोके तोंडात धरून तो परत हातिमाकडे आला. पारोचा मेंदू हातिमाच्या जखमेवर लावताच सुमारे तासातच त्याची मांडी पहिल्यासारखी झाली. तेव्हा हातिम त्या कोल्ह्यास म्हणाला, 'श्वापदे असून तुम्ही माझ्यावर दया केलीत, पण पारो पक्ष्याचा प्राण घेतलात हे योग्य नाही.' त्यावर कोल्हा म्हणाला, 'ह्या अपराधाची मी परमेश्वराजवळ क्षमा मागीन. पण तू मात्र सुखी राहा.'

ते बोलणे ऐकून हातिम म्हणाला, 'मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तेव्हा काय इच्छा असेल ती सांगा.' तेव्हा कोल्ही काकुंळतीने म्हणाली. 'एका तरस नेहमी आमची पिले खातो. त्याचा बंदोबस्त करा. दुसरे आम्हाला काही नको.

कोल्हीचे ते भाषण ऐकून त्यांच्यासह हातिम तरसाच्या बिळाजवळ गेला. तरस त्यावेळी तेथें नव्हता. तेव्हा कोल्ह्यास

जावयास सांगून हातिम तेथे बसला, तरस संध्याकाळी परत आल्यावर 'कोल्ह्याची पिले तू खाऊ नकोस' असे त्यास हातिमने बजावले. परंतु तरसाने ते ऐकले नाही. तेव्हा नाईलाजाने हातिमने त्याचे दोन पंजे व दात कट्यारीने कापून टाकले.

तेव्हा तरस रडत म्हणाला, आता माझे भक्ष्य मी कसे मिळवू? त्यावर हातिम उत्तरला की, परमेश्वर कोणासही कधी उपाशी ठेवीत नाही. इतक्यात कोल्हा तेथे येऊन म्हणाला, 'जोपर्यंत मी जिवंत आहे तो पर्यंत तरसाचें पालनपोषण व संरक्षण करीन. याबाबतीत बिलकूल काळजी नको. नंतर हातिम तेथून जावयास निघाला. त्यावेळी कोल्ह्याने त्याच्याबरोबर येण्याचा हट्ट धरला. हातिमनें त्यास परत जावयास सांगितले. तेंव्हा तो म्हणाला, 'त्या हौदाच्या अरण्यात जाण्यास दोन रस्ते आहेत. त्यापैकी जवळच्या रस्त्याने जाण्यात भयंकर धोका आहे. तेव्हा तूं लांबच्या रस्त्याने जा.'

त्यावर हातिमने उत्तर दिले की, 'ईश्वराची कृपादृष्टी असल्यावर भीती कशाची? मी तर जवळच्याच रस्त्याने जाणार.' त्याचे ते धिटाईचे बोलणे ऐकून 'समोरच्या रस्त्याने गेल्यावर जे चार रस्ते लागतील त्यापैकी उजव्या हाताच्या रस्त्याने जा म्हणजे बरोबर हौदाच्या अरण्यात पोहोचाल, असे सांगून कोल्हा निघून गेला.

इकडे सुमारे एक महिना प्रवास केल्यावर हातिमास चार रस्ते लागले. ईश्वराचे चिंतन करून हातिम उजव्या हाताच्या रस्त्याने चालू गलाला.

पुढे एका ठिकाणी त्याला खूप अस्वले दिसली. त्यांच्या राजाने काही राजकारणासंबंधी चर्चा करण्यासाठी त्यांना तेथे बोलाविले

होते.

एवढ्यात अस्वलांची दृष्टी हातिमावर जाताच त्यांनी हातिमास पकडले आणि आपल्या राजाजवळ नेऊन उभे केले. राजाने त्याचे लावण्य आणि त्याप्रमाणे ऐश्वर्य न्याहळून पाहिल्यावर त्याला मोठ्या इतमामाने शहरात आणण्याचा हुकूम दिला. अस्वलांचा राजा आपला दरबार संपल्यावर आपल्या नगरात आला. तेव्हा त्याच्या सेवकांनी हातिमास त्याच्यासमोर आणून उभे केले. त्यावेळी त्याला पाहून राजा म्हणाला, 'हे येमेन देशाच्या राजा हातिमा, स्वत:चे राज्य सोडून तू वनात का भटकतोस?' मग हातिमने त्यास प्रवासाचे कारण सांगितल्यावर तो म्हणाला, 'तुझे आगमन हे मी माझा मोठा लाभ समजतो. माझ्या उपवर कन्येस आयतेच सुंदर स्थळ मिळाले.' हे एकून हातिम गुपचूप उभा राहिला. म्हणून राजाने उत्तर न देण्याचे कारण विचारले. तेव्हा हातिम म्हणाला, 'तुमचा माझा संबंध कसा जमणार?'

त्यावर राजाने सांगितले, 'माझी कन्या तुझ्याच जातीची आहे.' नंतर राजाने आपल्या सेवकांबरोबर त्यास राजकन्येच्या महालात पाठविले. राजकन्येचे अनुपम सौंदर्य पाहून हातिम आश्चर्यचकित झाला. मग परत हातिम राजाजवळ जाऊन म्हणाल, 'महाराज! आपण सार्वभौम राजे, तर मी एक सामान्य माणूस, म्हणून आपल्या कन्येबरोबर मी विवाह करणे योग्य दिसणार नाही.'

त्यावर राजा बोलला, तू सुद्धा रापुत्र आहेस. म्हणून हा विवाह आम्हास पसंत आहे.' राजाने धरलेला आग्रह पाहून हातिम विचार करू लागला की, 'मी ज्या कार्यसिद्धीसाठी येथवर आलो. ती विवाहाने साध्य होणार नाही. म्हणून या मायापाशात

सापडणे योग्य नाही. इतक्यात अस्वलराजा म्हणाला, 'माझे म्हणणे तू मान्य केले नाहीस तर मी तुला अटकेत ठेवीन. तरीही हातिम स्तब्ध उभा आहे. हे पाहून रागावलेल्या अस्वल-राजाने त्यास कैदेत टाकले.

हातिमने त्याच्या बंदिवासात दोन आठवडे अन्नपाण्यावाचून काढल्यावर सेवकांनी त्याला राजापुढे नेले.
तेथे त्याच्यापुढे उत्तमोत्तम फळे, पाणी वगैरे ठेवण्यात आली. भुकेलेल्या हातिमने प्रथम काहीएक न बोलता आपली क्षुधा शांत केली. त्यानंतर 'लग्न करणार आहेस का नाही?' असे अस्वलराजाने विचारले असता हातिमने काहीही उत्तर दिले नाही. तेव्हा पुन्हा त्याला कैदेत टाकण्यात आले.

पुढे एके दिवशी गाढ झोपेत असता हातिमच्या स्वप्नात एक दिव्य साधू आला आणि त्याला उपदेश करू लागला, 'अरे हातिम! अस्वल कन्येबरोबर ताबडतोब विवाह करून टाक व जाण्याची परवानगी माग मग राजा तुला अडवणार नाही. हाती घेतलेले कार्य येथे खितपत पडून सिद्धीस जाणार नाही' असे सांगून तो दिव्य साधू दिसेनासा झाला.

पुढे एकदोन दिवसात राजाने विवाहाबद्दल पुन्हा विचारले तेव्हा हातिमने तयारी दर्शविलेली पाहून राजाला अतिशय आनंद झाला. त्याने त्या दोघांचे मोठ्या थाटाने लग्न लावले व त्यांना राहण्यासाठी एक अत्यंत सुंदर वाडा दिला.

तेथे हातिमला रोज सुमधुर फळे मिळत, पण त्याला त्याचाही फार कंटाळा आला. म्हणून सेवकाकरवी त्याने मानवी भोजनाचे साहित्य आणविले. पुढे हातिम स्वत: स्वयंपाक करून आपल्या पत्नीसह भोजन करू लागला. अशा तऱ्हेने त्याने तेथे सहा

महिने मुक्काम केला.

एके दिवशी हातिमाने आपल्या पत्नीला आपण किती महत्त्वाच्या कार्यासाठी बाहेर पडलो हे समजावून सांगितले . मी काम आटोपताच ताबडतोब निघून येईन म्हणून वचनही दिले. ही गोष्ट तिने आपल्या पित्यास सांगितली. तेव्हा तो म्हणाला, 'तुझा पती परत येईल असा तुला भरवसा असेल तर माझी काही हरकत नाही. तिचा हातिमवर विश्वास होता. म्हणून तिने संमती दिली. मग राजाने आपल्या सेवकांना हातिमला राज्य-सीमेपर्यंत पोहोचविण्याचा हुकूम दिला. हातिम सर्वांचा निरोप घेऊन निघाला.

पुढे काही दिवसांनी हातिम एका ओसाड वाळंवटात येऊन पोहोचला त्या वाळवंटातून हातिम पुढे जात असता एका अगडबंब अजगराच्या तावढीत सापडला. ती अजगर इतका प्रचंड होता की, ती एक वाळूची टेकडी असावी असे वाटून हातिम निष्काळजीपणे अजगराजवळून जात असताना त्याने चटकन हातिमास गिळून टाकले. आपण अजगराच्या पोटात आलो आहोत असे समजताच हातिमने परमेश्वराची प्रार्थना केली. तीन दिवसानंतर तो अजगराच्या पोटातून बाहेर आला.

त्याचे कारण असे की, राजकन्येचा निरोप घेऊन हातिम ज्यावेळी निघाला त्यावेळी तिने एका जादूचा मोती त्याच्या पागोट्यात ठेवला त्या मोत्याच्या ठिकाणी असा विलक्षण गुण होता की, तो ज्याच्या पाशी असेल त्याला कोणत्याही विषाची अगर अग्नीची बिलकुल बाधा होऊ नये. केवळ या गुणामुळेच हातिम त्या भयंकर अजगराच्या पोटातून बाहेर पडला, कारण अजगरास त्रास होऊ लागताच त्याने हातिमास बाहेर फेकले.

हातिम ईश्वराचे स्मरण करून पुढे चालू लागला. काही

दिवसांनी वाळवंट संपून एक नदी लागली. त्या नदीवर अजगराच्या लाळेने बरबटलेले कपडे धूत असतांना निम्मे शरीर माणसाचे व निम्मे माशांचे असणारी एक मत्स्यकन्या बाहेर आली व पटकन हातिमास पाण्यात घेऊन गेली. तिच्या हातून सुटण्याचा हातिमाने खूप प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

हातिम पाण्यात गेल्यावर बेशुद्ध झाला. ज्यावेळी तो सावध झाला त्यावेळी आपण सुशोभित महालांत असून आपणाला एकांतवास वाटू नये म्हणून आपले मनोरंजन ती मत्स्यकन्या करीत आहे असे दिसले.

हातिम साधव झालेला पाहून माझा स्वीकार कर म्हणून तिने त्याची मनधरणी केली, पण आपण प्रवासास बाहेर पडण्याचे कारण सांगून तो म्हणाला, 'माझे काम पूर्ण होताच मी तुझे मनोरथ पूर्ण करीन. 'ते ऐकून निराश झालेल्या मत्स्यकन्येने त्याला पहिल्या ठिकाणी आणून सोडले.

या संकटातून मुक्त झालेला हातिम पुढे जात असताना एका पर्वताशी येऊन पोहोचला. तेथे निबीड वृक्षाच्या घनदाट छाया पाहून त्यांच्या गर्द झाडीत तो मोठ्या आनंदाने शिरला. तेथे निर्मळ पाण्याचे अनेक झरे वाहात होते. श्रमपरिहारासाठी ठिकठिकाणी बाके ठेवली होती. हातिम दमला होता म्हणून एका बाकावर बसताच त्याला झोप लागली.

इतक्यात त्या जागेचा मालक तेथे आला व हातिमशेजारी बसला. थोड्या वेळाने हातिम जेव्हा जागा झाला, तेव्हा त्याने त्या मालकास सलाम केला. तेव्हा आपण कोठून आलात? कोठें जाणार? असे त्याने हातिमला विचारले. तेव्हा हतिम म्हणाला,

'मला हौदाचे अरण्यात जावयाचे आहे.' ते ऐकून तो म्हणाला, 'तुला ख़ात्रीने वेड लागले असावे. कारण आजपर्यंत जेवढे पुरुष तिकडे गेले त्यातील एकही परत आला नाही. तरीही तू तिकडे जाणारच असशील तर सांगतो तसे वाग.

तेथे फार भयंकर इंद्रजाल आहे. त्यात. जर तू अडकलास तर तुझी कधीही सुटका होणार नाही हे लक्षात ठेव. त्या अरण्याच्या जवळपास अनेक रुपसंपन्न स्त्रिया असून तू तेथे गेल्यावर त्या तुझ्या भोवती जमतील. कुरळ्या केसाची चारुगात्री स्त्री पाहून तुझे मन द्रवेल पण त्यावेळी तू मनावर ताबा ठेवशील तर लगेच हौदाचे अरण्यात जाशील.

याप्रमाणे ते बोलत आहेत एवढ्यात सेवकांनी भोजनाची दोन ताटे आणून ठेवली. दोघांनी भोजन केले. थोडावेळ गप्पागोष्टी झाल्यानंतर दोघे वाड्यात झोपण्यास गेले.

दुसरे दिवशी त्या धन्याचा निरोप घेऊन हातिम पुढील प्रवासास निघाला. काही दिवस चालल्यानंतर त्याला एक स्वच्छ पाण्याने भरलेले सुंदर सरोवर लागले. तो तेथे थांबला असता एक अप्सरा पाण्यातून बाहेर आली आणि त्याचा हात धरून त्याला पाण्यात ओढून घेऊन गेली. तळाला गेल्यावर हातिमचे पाय जमिनीला टेकले. तेव्हा डोळे उघडून तो पाहू लागला. त्याला आपण एका रमणीय उद्यानात उभे असल्याचे दिसले.

हातिम इकडची तिकडची शोभा पहात चालला असता हजारो अप्सरांनी त्याला गराडा घातला व त्यातील प्रत्येक अप्सरा त्याला मोहिनी घालण्यासाठी त्याच्यावर नेत्रबाणांचा वर्षाव करू लागली. पण हे सर्व इंद्रजाल आहे हे पूर्वीच माहीत असल्याने हातिमने तिकडे दुर्लक्ष केले.

इतक्यात एका नवयुवतीने हातिमचा हात हातात घेतला व त्याला एका रत्नजडित महालात घेऊन गेली. तेथे एक सिंहासन होते. त्यावर हातिमने पाय ठेवताच एकदम अतिशय मोठा गंभीर आवाज उमटला. पण त्याकडे बिलकुल लक्ष न देता हातिम धीटाईने त्या सिंहासनावर जाऊन बसला.

थोड्याच वेळात एक अत्यंत सुंदर स्त्री हातिमच्या शेजारी येऊन बसली. ती सर्वांत सुंदर असल्याने तिच्या तोंडावरचा बुरखा दूर करावा असे त्याला सारखे वाटू लागले. पण अगोदर सर्व हकीकत माहिती असल्याने त्याने मनावर ताबा ठेवला.

हातिम त्या सिंहासनावर बसून असेपर्यंत त्याला नाच-गायनाचा सुमधुर ध्वनि सतत ऐकू येत होता. नंतर रात्र झाल्यावर महालात इंद्रजालाचे दिवे लागले. त्याचा सूर्याप्रमाणे प्रकाश पडला होता, पण दिवे मात्र कोठेच दिसत नव्हते.

तेथील स्त्रियांनी हातिमास खाण्यापिण्यास दिले, परंतु त्या पदार्थामुळे त्याची भूक भागली नाही. तेथील चमत्कार पहात तो तीन दिवस सिंहासनावर बसून होता.

चौथ्या दिवशी न कळत हातिमने सिंहासनाजवळ असलेल्या एका स्त्रीचा हात धरला. त्याबरोबर त्या सिंहासनातून एक स्त्री निर्माण झाली आणि तिने हातिमास एक ठोसा लागावला त्यामुळे हातिम बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. पुढे काही वेळाने तो सावध झाला व डोळे उघडून इकडे तिकडे पाहू लागला.

आपण एका ओसाड अरण्यात उभे आहोत असे त्यास आढळून आले. तेव्हा 'हेच ते हौदाचे अरण्य' असा तर्क त्याने केला. इतक्यात ज्याच्या शोधासाठी तो सतत फिरत होता ते

'जे एकदा पाहिले तो पुन्हा पहाण्याची इच्छा' हे शब्द ऐकू आले. त्यामुळे हातिमचा आनंद गगनात मावेनासा झाला. ताबडतोब त्या शब्दांच्या रोखाने तो चालू गलाला.

तो सतत आठ दिवस चालत होता. शेवटी नवव्या दिवशी एका वृद्ध माणूस जमिनीवर निपचित पडलेला पाहून हातिम त्याच्यापाशी गेला. दोघांची सलामी झाल्यावर आपण इकडे कोठून आलात? वगैरे विचारल्यावर हातिमने त्यास सर्व हकीकत सांगितली.

तेव्हा तो म्हणाला, 'तुम्ही ज्याच्या शोधार्थ सतत फिरत आहात तो दुसरा कोणी नसून मीच आहे. आपण येथे बसा. म्हणजे मी सर्व काही सांगतो.' त्याचे ते बोलणे ऐकून हातिम त्याचे शेजारी बसला. तेवढ्यात तेथे भोजनाची ताटे व पाणी निर्माण झाले. मग दोघांनी भोजन केले.

नंतर तो वृद्ध सांगू लागला 'एकदा एका सरोवराच्या काठी मी उभा असताना एका स्वरुपसुंदरीने मला तळ्यात नेले. तेथे मला एक रमणीय बाग दिसली. त्या बागेतील सृष्टीसौंदर्य पहात असताना मला हजारो सुदर स्त्रियांनी वेढले मग त्यांनी मला एका रत्नजडित सिंहासनावर नेऊन बसविले. तेव्हा एक बुरखा घेतलेली स्त्री माझ्याजवळ येऊन उभी राहिली. माझ्या मनावरील ताबा जाऊन मी तिचा बुरखा दूर केला. ती फारच सुंदर होती. ती हंसलेली पाहून मी तिला सिंहासनावर बसवू लागलो. लगेच सिंहासनातून एक दुसरी स्त्री उत्पन्न झाली व तिने मला जोरात ठोसा मारला. त्यासरशी मी ह्या अरण्यात येऊन पडलो आहे.

त्या सुंदरीकडे माझे मन आकर्षित झाल्याने मी अहोरात्र अरण्यात भटकत आहे. हे सांगता सांगताच तो रडत म्हणाला,

'जे मी एकदा पाहिले, तेच पुन्हा पहाण्याची इच्छा आहे.'

त्याची सर्व हकीकत ऐकल्यावर हातिम त्याला घेऊन त्या सरोवरापाशी आला व म्हणाला, 'आता स्त्री येऊन तुला तळ्यात घेऊन जाईल. तेथील महालांत तुझ्याजवळ जी स्त्री येईल तिचा बुरखा तू बाजूला सारला नाहीस तर तुला जे पाहण्याची इच्छा आहे ते नक्की दिसेल, परंतु जर तिचा हात धरशील तर दु:खीकष्टी होशील' असे सांगून हातिम बानूच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर सापडल्याच्या आनंदात पूर्वीच्या पर्वतावर आला तेथील मालकास सर्व वृत्तांत सांगून सासुरवाडीस महिनाभर राहिला. त्यानंतर तो शहाबादेस गेला. तेथे तो मुनीरशहास भेटला. त्याच्यासह हूस्नबानूकडे गेला. तिला त्याने इंद्रजालाची सर्व हकीकत सांगितली. तेव्हां ती म्हणाली, 'आपण सांगतो ते सत्य आहे, कारण आता तसा आवाज येत नाही.'

नंतर हातिमने दुसरा प्रश्न काय? असे विचारले. त्यावर आपण थोडी विश्रांती घ्यावी व मग विचारावे असे बानू म्हणाली. 'काम पूर्ण झाल्याशिवाय विश्रांती घेणार नाही.'

त्याचे हे उत्तर ऐकून बानूने दुसरा प्रश्न सांगितला की, 'चांगले करून पाण्यावर टाक' अशी अक्षरे त्याच्या दारावर आहेत, त्या माणसाने कोणते सत्कृत्य केले आहे, ते मला सांगा.'

त्या प्रश्नांसंबंधी इतर माहिती मिळवून त्याच्या उत्तराच्या शोधासाठी मुनीरशहा व बानूचा निरोप घेऊन हातिम प्रवासास निघाला.

## दुसरा प्रश्न

## 'चांगले करून पाण्यावर टाक'

हुस्नबानूने दुसरा प्रश्न सांगितल्यानंतर ज्याच्या दरवाजावर 'चांगले करून टाक' असे लिहिलेले आहे तो मनुष्य कोठे रहातो? असे विचारल्यावर तो माणूस उत्तर दिशेस असलेल्या मार्दम शहरात रहातो असे तिने सांगितले. ते ऐकून हातिम उत्तर दिशेकडे निघाला. पुढें एके दिवशी एका घनदाट जंगलातून जात असताना संध्याकाळी एक इसम रडत असलेला पाहनू हतिमास वाईट वाटले. त्या इसमाजवळ जाऊन चौकशी केल्यावर तो म्हणाला, 'महाराज, माझ्या दुःखाचे निवारण कोणीही करू शकणार नाही. मग विनाकारण सांगण्यात काय अर्थ आहे.

हातिमने पुन्हा विनंती केल्यावर तो म्हणाला, 'मी एक व्यापारी असून येथून दोन कोसावर असलेल्या शहरी गेलो होतो. तेथे हारीथ नावाच्या व्यापाऱ्याची सुंदर कन्या मी पाहिली. तिच्यावर मन गेल्यानें मी तिला मागणी घातली त्यावेळी तो व्यापारी म्हणाला, 'माझ्या मुलीने विचारलेल्या तीन प्रश्नांची जो समाधानकारक उत्तरे देईल त्याच्याशीच मी विवाह करीन असा तिचा निश्चय असल्यामुळे तू तिच्याशींच बोलणी कर.' तेव्हां मी त्या सुंदरीला भेटलो आणि तिला माझा हेतू सांगितला. तेव्हा ती म्हणाली, 'माझ्या प्रश्नांची उत्तरे दिलीस तर मी तुझ्याशीं नक्कीच विवाह करीन. परंतु जर तू उत्तरेच दिली नाहीस तर तुझी संपत्ती माझी होईल.' मी तिच्या अटीस मान्यता दिल्यावर मला तिने प्रश्न सांगितले. त्यापैकी पहिला प्रश्न असा?

शहारानजीक एक गुहा आहे? ह्याचा शोध करणे. दुसरा प्रश्नः दर गुरुवारी या शहरानजीकच्या जंगलात 'आज मला उपयोगी पडेल असे मी काही केली नाही' ह्याचा शोध लावणे हा

असून तिसरा प्रश्न 'महापरी गंधर्वकन्येजवळ शहामोरा नामक जो हिरा आहे तो मला आणून द्यावयाचा आहे' हा आहे.

तिचे हे तीन प्रश्न ऐकून मी हतबल झालो आणि माझी सारी धनदौलत तिला देऊन जंगलात येऊन रडत बसलो आहे. नैराश्यामुळे मला काही सूचत नाही. हातिमला अतिशय दया आल्याने तो म्हणाला, 'मला त्या व्यापारी कन्येकडे घेऊन चल म्हणजे मी तुझी इच्छा पूर्ण करतो.'

त्यानंतर दोघे त्या शहरात गेले. त्या निराशावादी माणसास हातिम हारिथाच्या मुलीकडे घेऊन गेला. हातिमाने सर्व हकीकत सांगितल्यावर तिने आपले तिन्ही प्रश्न सांगितले.. 'मी सांगेन त्या मनुष्याबरोबर लग्न करण्याची तुझी तयारी असल्यास मला तसा करार करून दे. म्हणजे तुझ्या प्रश्नांची उत्तरे मी देईन. त्याचप्रमाणे पित्याच्या संमतीने तिने करार लिहून दिला.

नंतर ती हातिमास म्हणाली 'आपण ही उत्तरे आणली नाई. तर मी आपणास काय दंड करू? तेव्हा हातिम उत्तरला, माझ्यापाशी द्रव्य नाही, पण मी उत्तरे आणू शकलो नाही तर तू माझ्या शरीराचे वाटेल ते कर.' तिने त्यास होकार देताच तो आपल्या दुःखी मित्रास भेटला. नंतर त्या व्यापाऱ्याच्या कन्येने शहरानजीकची गुहा दाखविण्यासाठी आपले तीन सेवक हातिमबरोबर दिले. त्यानी ती गुहा दाखविताच हातिम आत शिरला.

कांही दिवस चालल्यावर त्यास प्रकाश दिसला. हातिमास वाटले की, गुहा संपली पण तेथे वस्ती नव्हती. पुढे त्याला एक अरण्य लागले. त्या ठिकाणी हातिमाने बदाम खाऊन पाणी प्याला. पुढे गेल्यावर त्यास एक शहर लागले. तेथील राक्षसांनी

हातिमाला पकडले. त्याच्यापैकी एक राक्षस म्हणाला. 'आपण याचे मास खाल्ले तर राजा आपल्याला कडक शिक्षा करील.' ते ऐकून शिक्षेच्या भीतीने सर्व राक्षस तेथून पळाले. थोड्या वेळाने तेथे दुसरी राक्षसांची टोळी आली. ते हातिमास ठार करणार. इतक्यात त्यांचा प्रमुख म्हणाला, 'आपली राजकन्या आजारी आहे. तिला मानव उपायानीच गुण येईल असे मी ऐकतो. म्हणून याला सोडून दया.'

तेथून पुढे गेल्यावर हातिमास दुसरे एक शहर लागले. तेथे कांही राक्षसांनी त्याला पकडून आपल्या सरदाराकडे नेले. तेव्हा दुःखीकष्टी दिसणारा सरदार वैतागाने पाहून राक्षसांस म्हणाला, 'ह्याला विनाकारण कशाला पकडले? ताबडतोब सोडून दया' पण हातिमास त्याची दया आल्याने त्याच्या दुःखाचे कारण विचारले. तेव्हां तो म्हणाला, 'माझ्या पत्नीस नेत्ररोग असून कित्येक उपाय केले तरी तो बरा होऊ शकत नाही. त्यामुळे मी अस्वस्थ आहे.' तेव्हा हातिम म्हणाला, 'मी तुमच्या पत्नीला निश्चित बरे करीन. ते ऐकताक्षणीच तो आश्चर्याने आणि आनंदाने हातिमाकडे पाहू लागला. नंतर तत्परतेने त्याने हातिमास आपल्या पत्नीच्या महाली नेले. तिला पाहिल्यानंतर हातिम म्हणाला, जर आपण मला आपल्या राजाकडे नेत असाल तरच मी हा नेत्ररोग बरा करीन. सरदारने ते ताबडतोब मान्य केले. मग हातिमने अस्वलकन्येने दिलेला प्रभावी मोती उगाळून ते पाणी तिच्या डोळ्याला लावल्याबरोबर तिला पूर्ववत् दिसू लागले. हातिमाच्या उपायाने आपली स्त्री बरी झालेली पाहून सरदाराने हातिमाचे उपकार कधीही न फिटणारे आहेत अशा भावनेने आठ दिवस त्याचा उत्तम पाहुणचार केला. नंतर कबूल केल्याप्रमाणे त्याला आपल्या राजाकडे नेले.

तेथे गेल्यावर सरदार राजास म्हणाला, 'महाराज! हे गृहस्थ

फार परोपकारी असून अत्यंत दयाळू आहेत. त्याचप्रमाणे वैदयविदयेतही अतिशय निष्णात आहेत. माझ्या पत्नीला त्यानी अवघ्या एका दिवसांत बरें केलें. असा मनुष्य मी अदयाप पाहिला नाही.' ते ऐकून राजा म्हणाला, मलासुद्धा पोटशूळाची व्यथा आहे. अनेक उपाय केले, तरी मी बरा होत नाही. यावर उपाय सांग.'

हातिमने प्रथम त्याची प्रकृती तपासली व सांगितले, 'महाराज आपल्या भोजनाच्या वेळी मला तेथे बोलवावे म्हणजे मी उपाय सुचवीन.' त्याप्रमाणे राजाने भोजनाच्या वेळी हातिमास बोलाविल्यावर त्याने राजाच्या पानातील एक पदार्थ झाकून ठेविला. नंतर जवळ जवळ एक तासाने तो पदार्थ राजापुढे ठेवला तेव्हा त्याला त्यामध्ये बरेच किडे दिसले त्यावेळी हातिम म्हणाला, 'आपल्या अन्नावर नोकरांची नजर पडते. केवळ त्यामुळेच पोटशूळाचा भयंकर विकार तुम्हास जडला आहे. आता आपण भोजनप्रसंगी कोणासही बोलावू नका.' ते म्हणणे पटल्यावर राजा त्याप्रमाणे वागू लागला. थोड्याच दिवसात राजा पूर्ण बरा झाला.

नंतर राजाने अत्यंत आनंदाने हातिमास त्याची इच्छा विचारली तेव्हा हातिम म्हणाला, 'आपल्या कैदेत असणारी सर्व माणसे ताबडतोब मुक्त करा. त्याचप्रमाणे पुन्हा कोणासही कैदेत डांबू नका.' राजाने ते म्हणणे मान्य करून सर्वांस वस्त्रालंकार देऊन मुक्त केले. मग राजा हातिमास म्हणाला, 'हे थोर पुरुषा, माझी कन्या कित्येक दिवसापासून आजारी आहे. तिला जर बरी करशील तर मजवर अनंत उपकार होतील.' राजाच्या म्हणण्याप्रमाणे हातिमाने राजकन्येस औषध देण्यास सुरुवात केली. तिला थोडी साखर आणि पाणी प्यावयास दिले तेव्हा तिला हुशारी वाटू लागली. पुढे अवघ्या तीनच दिवसांत तिला चांगले बरे वाटू लागले

ग्रं. पं. ... कार्यालय ...
प्र. क्र. २८२५ ...
दि. ...

व ती पहिल्यासारखी झाली.

पुढे हातिम आपल्या कामासाठी जात असताना त्यास राजाने अमूल्य असे जवाहीर दिले व काही नोकर सोबत म्हणून गुहेच्या तोंडाशी पाठविले. नंतर ते सर्व द्रव्य हातिमाने शहरात आणून धर्मशाळेत राहिलेल्या तरुणास बक्षीस म्हणून दिले. पुढे सावकार कन्येकडे गुहेतील सर्व हकीगत सांगितली. तेव्हा तिने सांगितले 'जे मला आज उपयोगी पडेल असे मी काही केले नाही' असे दर गुरुवारी नजीकच्या अरण्यात एक माणूस म्हणत असतो त्याचा शोध कर म्हणजे माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळेल.

मग हातिम त्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध करण्याकरता निघाला. सकाळपर्यंत सतत चालल्यामुळे थकून गेलेला हातिम एका झाडाखाली बसला. नंतर तेथून जवळच असणाऱ्या एका गांवात गुरुवारपर्यंत मुक्काम केला. गुरुवारी ते शब्द ऐकू येतच हातिम त्याच्या शोधार्थ निघाला. कित्येक दिवस प्रवास केल्यावर तो एका खेडेगांवात पोहोचला. तेथे त्याने तेथील लोक एकत्र बसून शोक करीत असलेले पाहिले. हातिमने त्यांच्यातील एकाला दु:खाचे कारण विचारता तो म्हणाला, 'दर बुधवारी या गांवी एक ब्रह्मराक्षस येतो व आमच्यापैकी एक माणूस बळी घेतो. आज पाटलाच्या एकुलत्या एक सद्गुणी मुलाची नरबळीची पाळी आहे. आमचा काहीच इलाज चालत नसल्यामुळें आम्ही हतबल होऊन शोक करीत बसलो आहोत.' त्यांची दया येऊन परोपकारी हातिम म्हणाला, 'तुम्ही शोक करू नका. या बुधवारी, राक्षसाला ठार करून तुमचे संकट कायमचे नष्ट करतो.

राक्षस केवढा आहे हे विचारल्यावर पाटलाने त्याची आकृती काढून दाखविली. राक्षस फारच मोठा होता. शस्त्राने तो मरणार

नाही हे लक्षात आल्यावर हातिमाने एका काचवाल्याकडून अतिशय मोठा आरसा तयार करून घेतला. त्यानंतर गावातील लोकांच्या साहाय्याने तो आरसा राक्षसाच्या वाटेवर ठेवून तो चादरीने पूर्ण झाकला. नंतर बुधवार उजाडताच हातिम गावकऱ्यांना म्हणाला, 'ज्याला आज मी राक्षसास कोणत्या युक्तीने नाहीसा करतो हे पाहण्याची इच्छा असेल त्यांनी माझ्याबरोबर यावे. 'हे ऐकून पाटलाचा मुलगा येण्यास तयार झाला. पण पाटील म्हणाला, 'बाळ! तू आपला जीवन विनाकारण का धोक्यात घालतोस? त्यावर तो मुलगा म्हणाला 'बाबा! या दयाळू माणसाने माझ्यासाठी काहीही संबंध नसताना स्वत:चा जीव धोक्यात घालून मोठे धाडस पत्करले आहे, तर मग त्याच्याबरोबर मी नुसता जाऊसुद्धा नको? हे ऐकून पाटीलसुद्धा सर्वांना घेऊन जाण्यास निघाला.

नंतर तेथे गेल्यावर राक्षस मोठ्याने ओरडत येऊ लागला. सर्वजण भीतीने पळत सुटले. पण हातिमने धीर देऊन सर्वांना थांबवून धरले. राक्षसाचे प्रचंड शरीर, अवाढव्य पोटाचा नगरा, पण त्याचे डोके मात्र छोटे. ती विचित्र आकृती पाहून हातिमाला हसू आले.

राक्षसाच्या जबड्यातून अग्निज्वाला बाहर पडत होत्या. तो जवळ येताच हातिमाने आरशावरील आच्छादन दूर केले. त्याबरोबर त्या राक्षसाने आरशात पाहिल्यावर हा दुसरा महाभयंकर राक्षस आपल्याला ठार करणार म्हणून तो इतका भयंकर घाबरला की, त्याला श्वासोच्छवास करता येईना. शेवटी केवळ भीतीनेच मृत्यू पावला. एका साध्या युक्तीने त्याने राक्षसास नाहीसा केलेला पाहून त्या लोकांना अस्मान ठेंगणे झाले त्यानी मोठ्या समाधाने व आनंदाने हातिमास खूप द्रव्य दिले गावकऱ्यानी हातिमाच्या प्रवासासंबंधी विचारपूस केली. तेव्हा 'जे मला आज उपयोगी

पडेल असे मी काहीही केले नाही.' असा दर गुरुवारी कोणाचा तरी आवाज येतो. त्याच्या तपासासाठी मी निघालो आहे असे त्याने सांगितले. त्यावर ते लोक म्हणाले की, आम्हीसुद्धा हे शब्द ऐकतो, पण त्यासंबंधी आम्हांला काहीच माहिती नाही. त्या दिवशी हातिम पाटलाकडे मुक्कामाला होता.

रात्री ते शब्द ऐकू येताच पाटलाचा निरोप घेऊन तो आवाजाच्या रोखाने निघाला. सतत दोन महिने प्रवास केल्यावर त्याला एक टेकडी लागली. वर चढून जाताच त्याला तेथे काही माणसे दिसली. पण हातिम जवळ जाताच एकाएकी ती अदृश्य झाली व त्याचे संगमरवरी पुतळ्यात रूपांतर झाले तो दिवस गुरुवारचा असल्याने हातिम तेथेच थांबला.

रात्र झाल्यावर त्या पुतळ्यांनी पुन्हा मनुष्यरूप धारण केले. भरजरी पोशाख घालून ते सिंहासनावर बसून अमृत प्राशन करू लागले. पण त्यांच्यातील एकजण मात्र अंगास राख फासून जमिनीवर पडला होता. त्याला कोणी अमृताचा थेंबही दिला नाही किंवा कोणीही त्याची साधी चौकशीसुद्धा केली नाही.

तेवढ्यातच तो मोठमोठ्याने 'जे मला आज उपयोगी पडेल असे मी काहीच केले नाही' असे म्हणून लागला. आपल्याला दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर सापडले म्हणून हातिम आनंदित झाला. तेवढ्यात तेथे भोजनाची ताटे निर्माण झाली. सर्वजण पानावर बसले. एक पान रिकामेच होते. तेथे त्यांनी हातिमास बसविले. सर्वजण मोठ्या खुशीने. जेवत होते. हातिम मोठ्या कष्टाने जेवत होता; कारण त्याचे लक्ष त्या दुःखी माणसाकडे लागले होते.

तो माणूस आपल्या ताटातील नासकेकुचके पदार्थ खात होता. भोजन संपल्यावर हातिमास राहावेना म्हणून त्याने विचारले,

'तुम्ही सर्वजण खुशीत आहात, तर मग हा एकटाच असा दु:खीकष्टी का?' त्यावर ते म्हणाले, 'त्याचे कारण तोच सांगेल.'

त्याच्याकडे जाऊन हातिमाने त्याच्या या अत्यंत वाईट गतीचे कारण विचारले. तेव्हा तो बोलू लागला, 'मित्रा, तुला काय सांगयचे? अरे या मर्वांचा पूर्वजन्मीचा मी धनी. माझे नाव युसुफ. मी फार कंजुष होतो. माझी यत्किंचित् संपत्ती दानधर्मत खर्च केली. मी या उलट माझे नोकरचाकर मात्र दानधर्म करीत असत. मला ते कळताच मी त्यांच्यावर भडकत असे. पण 'दानधर्म केल्याने सद्‌गती मिळते म्हणून आम्ही तो करीत राहाणार' असे ते मला सांगत. मी पण तसे वागावे असा त्यांचा हेतू होता.

एकदा या सर्व नोकरचाकरांना घेऊन मी खारमिझ शहराकडे निघालो वाटेत चोरांनी आम्हा सर्वांवर हल्ला करून ठार केले व त्या ठिकाणी आम्हाला गाडून टाकले. सध्या आम्ही सर्वजण मेलेलेच आहोत पूर्वी जर मी दानधर्म केला असता तर यांच्यासारखा मी पण सुखात असतो.' ते ऐकून हातिमास अतिशय वाईट वाटले.

त्यानंतर हातिम त्यास म्हणाला, 'तुमच्या दु:खाचा शेवट करण्याचा काही उपाय असेल तर मला जरूर सांगा. मी प्रयत्न करून तुमची या अवस्थेतून मुक्तता नक्कीच करीन.' त्यावर तो इसम सांगू लागला, 'मी चीन देशात रहात असे. तेथील माझ्या घरात मी बरीच संपत्ती पुरुन ठेवली आहे. याची कोणासही काहीसुद्‌धा माहिती नाही. सध्या माझे नातू भीक मागून उपजीविका भागवतित. ती पुरलेली संपत्ती बाहेर काढून तिच्यापैकी एक भाग माझ्या नातवाना दिला व इतर सर्व दानधर्म करून टाकला,

तर माझी या अवस्थेतून मुक्तता होईल.' हातिमाने त्याप्रमाणे कबूल केले.

नंतर तो चीनकडे निघाला, एके दिवशी तहान लागल्याने तो एका विहिरीपाशी गेला. इतक्यात विहीरीचे पाणी काढणाऱ्या माणसास एका सर्पाने वेढा घालून विहीरीत ओढले. त्याला बाहेर काढण्यासाठी हातिमने बेधडक विहीरीत उडी मारली.

ज्यावेळी तो विहिरीच्या तळाशी पोहोचला त्यावेळी आपण एका शोभिवंत बगिच्यात उभे असून जवळच रत्नजडित बंगला आहे असे हातिमास दिसले. तो त्या बंगल्यात गेला. तेथे मानवरूपी ब्रह्मराक्षस झोपलेला त्याने पाहिला. त्याला जागा करण्याच्या हेतूने हातिम त्याच्या जवळ गेला. तेवढ्यात तो साप एकदम त्याच्या अंगावर आला. हातिमने चपाळाईने त्याचे तोंड घट्ट पकडले. इतक्यात ब्रह्मराक्षस जागा झाला व म्हणाला, 'माझ्या नोकरास प्रथम सोडून दे.' त्यावर हातिम म्हणाला, 'ह्याने एका माणसाला येथे ओढून आणले आहे. त्याला सोडले तरच मी ह्याला सोडीन.' हातिमचे हे धैर्य पाहून तो राक्षस सर्पाला म्हणाला अरे ज्याने तुला पकडला आहे तो महाबलाढ्य आहे. म्हणून तू त्याला तुझ्या तोंडातील मार्गाने अजिबात जाऊ देऊ नको.'

हे त्याचे बोलणे ऐकताच हातिम चपळाईने सर्पाच्या तोंडात घुसण्याचा प्रयत्न करूं लागला, पण सर्पाने त्याला लगेच गिळून टाकले. हातिमला त्याच्या पोटात काळसर भाग दिसला. त्याने तो कट्यारीने कापताच एकदम मोठा गडगडाट होऊन चोहीकडे पाणी झाले.

थोड्या वेळाने हातिम डोळे उघडून इकडे तिकडे पाहू लागला, तेव्हा त्याला एका सपाट मैदानावर आपण उभे असून

आपल्याभोवती सहस्त्रावधी माणसे दीनवाणी होऊन उभी असलेली त्याने पाहिली. त्यांची चौकशी केल्यावर सर्पाने आम्हाला येथे खेचून आणले असे हातिमास समजल्यावर त्यांना तो म्हणाला, 'त्या सर्पाचा शेवट मी केला आहे. तुम्ही आता स्व:च्या घरी जा! हातिमबद्दल कृतज्ञता व्यक्त करून ते आनंदाने घरी जाण्यास निघाले.

नंतर हातिम पुढे चालला असताना थोड्या दिवसात त्याला एक शहर लागले. त्या ठिकाणच्या राजाच्या नोकरांनी त्याला पकडून राजापुढे नेले.

त्याला पाहून राजा म्हणाला, 'या भागात जे प्रवाशी येतात त्यांना माझी कन्या तीन प्रश्न विचारील. त्याची उत्तरे ते देऊ शकले नाहीत तर त्यांना ठार करील, पण तुम्ही इकडे कोठून आलात? त्यावर हातिम उत्तरला की, 'येमेन देशातून मी इकडे आलो, परंतु आपण प्रवाशांचा असा अमानुष छळ करता, त्यांचा जीव घेता हें ठीक नाही. ते ऐकून राजा म्हणाला. 'माझ्या मुलीपुढे आमचे कांहीच चालत नसल्याने नाईलाज झाला आहे. एवढेच नव्हे तर तिच्या या भयानक वागण्याने एकेकाळी अदालतबाद (न्यायी शहर) असा नांवाप्रमाणे शहराचा असणारा लौकिक नष्ट होऊन आता बेदादबाद असे नांव पडले आहे. आता तिचे मन वळविण्याचा प्रयत्न तूच करावास हातिमास पाहताच मोहित झालेली राजकन्या आपल्या सखींना म्हणाली, 'हा देखणा पुरुष श्रेष्ठ कुळातील दिसतो. परंतु जर याने माझ्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिली नाहीत तर याचासुद्धा प्राण घ्यावाच लागेल.'

हातिमाने राजकन्या प्रवाशांचा जीव का घेते म्हणून तिच्या

सखींना विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले, त्या राजकन्येला दररोज रात्री पिशाच्चबाधा होते. मग ती वेडेवाकडे बरळते आणि प्रवाशांना कांहींहि प्रश्न विचारते. त्याची उत्तरे अजूनही कोणीच दिली नाहीत. आपण तिला या पिशाच्च संचारापासून सोडविलेत तर आम्ही तुमच्या ऋणी राहू.'

इतक्यात जेवणाची तयारी झाली तरीही हातिम जेवणास जाईना. 'हाती असलेले कार्य तडीस न नेता मिष्ठान्नावर ताव मारणाच्या हातून कार्यसिद्धी होणे शक्य नाही. म्हणून राजकन्येच्या प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय मी अन्नास स्पर्शही करणार नाही असे हातिमाने निश्चयाने सांगितले. त्या दिवशी रात्र होताच राजकन्येसमोर हातिमास बसवून तिचे सर्व सेवक निघून गेले. थोडा वेळ जाताच राजकन्या हातिमाकडे पाहून म्हणाली, 'आता माझ्या प्रश्नांची नीट उत्तरे दिली नाहीस तर स्व:च्या जीवन गमावशील.'

लगेच तिने 'समुद्रात प्राण्याची कशी उत्पत्ती होते?' हा पहिला प्रश्न विचारला. त्यावर हातिम उत्तरला, 'जमिनीवरील प्राण्यास जशी हवा मिळते व त्यांची उत्पत्ति होते त्याचप्रमाणे पाण्यातील हवेच्या वेगाने तेथील प्राण्यांची निर्मिती होत असते. पाण्यातही सर्व जीवनावश्यक गुणधर्म आहेत."

त्यानंतर राजकन्येने दुसरा प्रश्न विचारला - 'सर्व फळांत श्रेष्ठ फळ कोणते?' हातिमने उत्तर दिले की, 'पुत्रफळच सर्वश्रेष्ठ' ताबडतोब राजकन्येने तिसरा प्रश्न विचारला, 'प्राण्यास अप्रिय असताना त्याला प्राप्त होते ते काय? तात्काळ 'साक्षात् मृत्यू कारण तोच अप्रिय असतो असे हातिमने उत्तर देताच राजकन्या धाडकन् जमिनीवर कोसळून बेशुद्ध झाली.

नंतर तिच्या हातातून एक लाल साप बाहेर आला व हातिमवर फुत्कार टाकू लागला. अस्वलकन्येने दिलेला मोती त्याला दाखवताच तो दीन झाला. मग त्याने त्याला एक बाटलीत घालून वाड्याबाहेर काढून गाडून टाकले.

थोड्या वेळाने राजकन्या शुद्धीवर आली व तिने हातिमास पाहून आपल्या दासीला हाक मारली. हा नवखा माणूस माझ्या महालात कसा काय असे विचारल्यावर दासीने तिला घडलेली सर्व हकीकत सांगितली. नंतर हातिमास खाणेपिणे देऊन ती राजकन्येबरोबर तेथून बाहेर गेली. दुसरे दिवशी हातिमास जिवंत पाहून राजा फारच आनंदित झाला.

हातिमाने सर्व घटना सांगितल्यावर राजा हातिमावर फारच खूश झाला आणि त्याला म्हणाला, 'आपण माझ्या कन्येशी विवाह करावा' आपल्या कार्याची सर्व माहिती राजास सांगून हातिम म्हणाला, 'विवाहानंतर मला आपण जाऊ दयाल तरच मी विवाहास तयार होईन.'

राजाला हे मान्य होऊन त्याने मोठ्या थाटाने त्यांचा विवाह सोहळा साजरा केला. त्यानंतर हातिमने तीन महिने मनमुराद आनंद लुटला. मग तो सर्वांचा निरोप घेतल्यावर राजास भेटला व म्हणाला, 'आपली कन्या माता होणार असून तिला जर मुलगा झाला व त्याला बापाला भेटण्याची इच्छा झाली तर माझ्या देशी धाडून द्या. आता जगलो वाचलो तरच आपली भेट होण्याची शक्यता.'

नंतर हातिम चीन देशाकडे निघाला. तेथे गेल्यावर तो युसुफच्या नातवंडाना भेटला. त्यांनी त्याला सर्व हकीगत सांगितली. 'युसुफ मरून कित्येक वर्षे लोटल्याने आम्हास हे अशक्यच वाटते.

तरीही आपण हे सर्व आमच्या राजास सांगू या' असे म्हणून ते राजाकडे गेले.

राजाने सर्व हकीगत ऐकल्यावर तो म्हणाला, 'याचे सांगणे बनावट तरी आहे किंवा हा वेडा तरी झाला असावा. कारण शंभर वर्षांपूर्वी मेलेला माणूस याला भेटला कसा?'

तेव्हा हात जोडून हातिम म्हणाला, 'महाराज! प्राणी मेल्यावर त्याचा देह नष्ट झाला तरी आत्मा अमरच असतो. युसुफ मला भेटणेच शक्य नाही अशी तुमची खात्री आहे. तर मग त्याचे घर चीनमध्ये असून त्यात बरीच संपत्ती पुरली आहे. त्या संपत्तीचा विनियोग कसा करावा या बाबत युसुफची काय इच्छा आहे, हे मला समजण्याचे कारणच काय?

त्याच्या बोलण्याचा परिणाम होऊन प्रत्यक्ष राजाच त्याची प्रचिती पाहण्यासाठी तेथे हजर झाला. युसुफच्या घराखाली खणू लागताच तेथे बेसुमार संपत्ती निघाली. तेव्हा राजा आश्चर्याने थक्क झाला. नंतर राजाने युसुफच्या इच्छेप्रमाणे द्रव्याचा एक भाग त्याचा नातवास देऊन बाकीचे सर्व द्रव्य दानधर्म करण्यासाठी हातिमास दिले. हातिमाने ते सारे तेथील गरिबांस दान केले व राजाचा निरोप घेऊन तो अदालताबादकडे निघाला.

तेथे पोहचल्यावर काही दिवसांनी त्याची पत्नी प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झाले. त्याचे नाव 'सामील' ठेवल्यावर हातिमाने सर्वांचा निरोप घेतला व तो क्ष्वेतांच्या टेकडीजवळ आला. तेथे गुरुवारी रात्री नेहमीप्रमाणे सर्व पुतळे माणसाच्या रुपात प्रकट झाले. यांच्यामध्ये युयुफही आनंदात पाहून हातिमाला आपल्या प्रयत्नाला यश आले म्हणून समाधान वाटले, हातिमला पहाताच युसुफ त्याचाजवळ येऊन म्हणाला, 'मित्रा! केवळ तुझ्या कृपेनेच

मी दुःखातून या सुखी जीवनांत आलो. तुझे माझ्यावर फार उपकार आहेत.' मग काही वेळातच सर्वांची भोजने झाली.

सूर्योदय होताच सर्वांचे पुतळे झाले. हातिम मार्ग आक्रमीत पुढे जात असता त्याला अतिशय भुकेलेला एक कुत्रा दिसला. त्याची हातिमला फार दया आली. त्याने त्यास उचलून घेतल व जवळच असलेल्या एका खेड्यात नेले. तेथे त्यास अन्न जमा करून खाऊ घातले व पाणी पाजून त्याचे समाधान केले. पोट भरल्याने कुत्र्याला हुशारी वाटू लागली.

तो हातिमचे पाय चाटू लागला. दयाळू हातिम मोठ्या ममतेने त्याच्या आंगावरून हात फिरवून त्याला गोंजरू लागला. इतक्यात त्याच्या हाताला कुत्र्याच्या डोक्यांत एक कठीण वस्तू लागली. त्याने न्याहाळून पाहिल्यावर कुणीतरी तो खिळा ठोकला आहे असे त्यास दिसून आले. हातिमला फार वाईट वाटले व त्याने खिळा त्याच्या डोक्यातून बाहेर काढला. त्याबरोबर कुत्रा अदृश्य झाला व त्याच्या जागी एक देखणा पुरुष उभा राहिला.

आश्चर्यचकित झालेल्या हातिमने त्याला 'तुला कुत्रा कुणी केले! आणि खिळा काढताच तू पुन्हा मनुष्य कसा झालास? हे विचारताच तो सांगू लागला, 'आपण माझी या भयंकर अवस्थेतून सुटका केलीत म्हणून प्रथम आपले आभार मानतो. मी एका व्यापाऱ्याचा मुलगा असून माझ्या पित्याने व्यवसायामध्ये अतोनात संपत्ती मिळावली. मी एकुलता एक असल्याने त्याने एका सुंदर स्त्रीशी माझा विवाह करून दिला. पित्याच्या मृत्यूनंतर मी सर्व संपत्ती चंगीभंगीपणा करून घालविली.

पुढे मी चीनमध्ये व्यापार करण्याच्या हेतूने गेलो. इकडे

माझी पत्नी एका हबशी चाकरावर फिदा झाली. मी परतल्यावर तिने एका मांत्रिकाकडून हा खिळा तयार करून घेतला. मी झोपलो असताना माझ्या डोक्यात ठोकला. त्याबरोबर मी कुत्र्याच्या रूपाने हिंडू लागलो.

हे ऐकून हातिमाने त्या तरूणास तुझे घर कोठे आहे? हे विचारले, तेव्हा तेथून तीन मैल दूर असणाऱ्या 'सुरी' नावाच्या शहरात मी राहतो असे त्याने सांगितले. त्यावर हातिम म्हणाला, हारिथ व्यापाऱ्याच्या कन्येने विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देण्यास मला तेथेच जावयाचे आहे. तेव्हा आपण बरोबरच निघू.'

हातिम वाटेत त्या तरूणास म्हणाला, तुझ्याजवळ, हा खिळा जपून ठेव आणि तुझ्या बायकोच्या डोक्यात हा ठोक म्हणजे ती सुद्धा कुत्री होईल. तरूणास ते पटले तो मध्यरात्री स्वःच्या घरी गेला. तेव्हा जाग्या झालेल्या नोकरांनी त्यास ओळखले व त्याची चौकशी केली. तेव्हा सर्वांना गुपचूप राहण्यास बजावून तो आपल्या घरात गेला. त्याची पत्नी हबशी चाकरासह झोपलेली पाहताच तो भयंकर संतापला व त्याने झोपेतच त्या हबश्याचे शीर उडविले. ताबडतोब बायकोच्या डोक्यात खिळा ठोकला त्याबरोबर तिला कुत्रीचे रूप प्राप्त झाले. त्या दोघांची ती स्थिती पाहून हातिमास वाईट वाटले.

नंतर एक दिवस तेथे राहून तो धर्मशाळेतील आपल्या मित्राकडे गेला. मग त्याला घेऊन तो हारिथ कन्येकडे गेला. तिला सर्व माहिती दिल्यावर ती म्हंणाली, 'तुम्ही म्हणता ते सत्य आहे, कारण तो आवाज आता बंद झालेला आहे'

आता माझ्या तिसऱ्या प्रश्नांकडे वळू - 'महापरी गंधर्व कन्येकडे असणारा मौल्यवान हिरा शमोरा मला आणून दया.'

नंतर आपल्या मित्रास तुझा प्रश्न लवकरच सोडून तुला सुखी करतो असे आश्वासन देऊन शोध करण्यासाठी निघाला.

महापरी गंधर्व कन्येचा तपास कोठे लागेल या विचारात असताना राक्षसांचा राजा फरोक्याश हा माहिती देईल असे वाटल्यामुळे हातिम त्याच्याकडे गेला. फरोक्याशने हातिमचे आदरातिथ्य केले.

नंतर 'महापरी गंधर्व राणी कोंठे असते हे मला पाहिजे, कारण तिच्याजवळ असणारा शहामोरा हिरा आणण्यासाठी मी निघालो आहे' असे हातिमने सांगितल्यावर परोक्याश म्हणाला, 'अरे हातिम मानवशक्तीबाहेरील सर्व कामे तू कशी स्वीकारतोस? महापरीच्या राज्यात आम्हीच जाऊ शकत नाही, तेथे तू कसा जाणार? तेव्हा हातिम म्हणाला, 'ईश्वर पाठीराखा असल्यावर काय अशक्य आहे. आपण मार्ग दाखविण्यासाठी आपला एक सेवक पाठवा.

राक्षसांच्या राजाने त्याप्रमाणे परीराजाच्या सीमेपर्यंत व तेथून हातिम परत येईपर्यंत तेथेच वाट पहात थांबण्यासाठी आपल्या एका सेवकाला हातिमबरोबर पाठवून दिले. त्या राक्षससेवकाला तेथेच थांबण्यास सांगून हातिम काफ पर्वताकडे निघाला.

त्या पर्वताजवळ येताच वर पहारा करण्याऱ्या राक्षसांनी त्यास पाहिले. ते आपापसात बोलू लागले, 'अरे हा कोणीतरी माणूस दिसतो! याला आपण मारून टाकू या. लगेच त्यांनी हातिमास विचारले, तू आलास कोठून? हातिम म्हणाला, 'मी सुरी शहरातून आलो.' हातिमाचे हे उत्तर ऐकून ते ताबडतोब म्हणाले, 'तुला हारिथकन्येनेच धाडले असणार. आता हिरा मिळविण्याऐवजी तूं स्वत:चे प्राण मात्र गमावणार आहेस' असे म्हणून ताबडतोब त्यांनी अग्नी पेटवून त्यात हातिमास फेकून

दिले, पण अस्वलकन्येच्या मोत्याने हातिमास अग्नी जाळू शकला नाही. जाळ विझून गेल्यावर हातिम पुढे जाऊ लागला.

थोड्या अंतरावर त्या पहारेकऱ्यांनी हातिमला पाहिले आणि ते आश्चर्याने थक्क झाले. त्यावेळी हातिम त्याना म्हणाला, 'परमेश्वराने मला दिलेल्या देहाची तुम्ही होळी करता हे महापाप आहे हे लक्षात ठेवा.' हे ऐकून ते अधिकच भडकले व त्यांनी त्याला समुद्रात भिरकावून दिले.

हातिम पाण्यात पडल्यावर त्याला एक मोठ्या माशाने गिळून टाकले. त्याच्या पोटात हातिम इकडे तिकडे हिंडत होता. इतक्यात तो मास किनाऱ्यावर आला. अस्वलकन्येचा मोती जवळ असणाऱ्या हातिमास त्याने पोटातून बाहेर टाकले.

हातिमला बाहेर आल्यावर अतिशय भूक लागली होती. तेवढ्यात ते पहारेकरी त्यास पुन्हा भेटले तेव्हां तो त्याना म्हणाला, 'परमेश्वर माझा पाठीराखा आहे, तेव्हा तुम्ही मला मारू शकणार नाहीं. आता कांहीतरी खावयास द्या! ते ऐकून एका गंधर्वास त्याची दया आली व तो इतरांस म्हणाला, 'खरेखरीच याच्यावर परमेश्वराची कृपा आहे. तेव्हा या थोर पुरूषास खाण्यास देणे हेच चांगले! मग त्यांनी हातिमास खावयास दिले. नंतर हातिमने सुद्धा अनेक गोष्टी सांगून त्यांचे मनोरंजन केलें त्यामुळे ते हातिमवर भावाप्रमाणे प्रेम करू लागले. एके दिवशी हातिमने आपण कोणत्या हेतूने प्रवास करीत आहोत याची हकीकत त्यांना सांगितली. ती ऐकल्यावर त्यांच्या मनात दया उत्पन्न झाली.

तरीपण कोणत्याही परिस्थितीत मानवास आसरा दिला गेल्याचे राणीस कळले तर ती आम्हाला ठार मारल्याशिवाय रहाणार नाही अशी भीती व्यक्त केली. तेव्हां हातिम त्यांना म्हणाला,

'आपण राणीकडे जाऊ या. तेथे हा इसम समुद्राकिनारी सापडला असे सांगा आणि मोकळे व्हा. मग पुढे काय होईल ते बघू.' त्यांना ते पसंत पडल्यावर सर्वजण राणीकडे गेले.

त्यांच्यापैकी एकाने प्रथम राणीला त्याप्रमाणे सांगितल्यावर 'त्याला प्रथम माझ्यासमोर आणा, मी स्वतः चौकशी करणार आहे' असे ती म्हणाली. एक अत्यंतत देखणा पुरूष गंधर्व राज्यांत आला आहे ही वार्ता तेवढ्यात चोहीकडे वाऱ्यासारखी पसरली गेली.

महापरीची मसनापरी नावाची एक दासी असून तिला हसनापरी नावाची रूपवती कन्या होती. हसनापरीस तेथे आलेला सुंदर पुरूष पाहण्याची तीव्र इच्छा झाली. तेव्हां त्याला कसे पाहवे या विचारात ती असताना दुसरी एक दासी तिला म्हणाली, 'तू तुझ्या आईची परवानगी काढ. तो ज्या रस्त्याने येणार आहे तेथेच आपण जाऊ या. त्याप्रमाणे तिने आपल्या आईची परवानगी घेतली व ती समुद्रकिनारी जाऊन राहिली.

नंतर ज्या ठिकाणी हातिमला कैदेत ठेवले आहे तेथे जाऊन तिने पहारेकऱ्यांवरच मोहिनी विद्येचा प्रयोग केला. तो यशस्वी होताच तिने हातिमास पळविले.

हातिमचे झोपलेल्या स्थितीतील ते देखणे स्वरूप पाहून तिला त्याची विलक्षण मोहिनी पडली. तो जागा झाल्यावर 'आपण मजबरोबर विवाह करा' असे ती त्याला विनवू लागली. तेव्हां आपण कोणत्या कामासाठी येथे आलो आहे हे त्याने तिला सांगितले. पण जर तू मौल्यवान हिरा मला मिळवून दिलास तर मी नक्कीच तुझ्याशी विवाह करीन' अशी त्याने अट घातली. तेव्हा ती म्हणाली, 'तो हिरा देवादिकांनाही मिळविता येणार

नाही, परंतु तुम्ही मानवी कल्पनाशक्तीच्या साहाय्याने काही युक्ती योजल्यास शक्य होईल.'

त्या दिवशी तिने हातिमला आपल्याजवळ ठेवून घेतले. दुसरे दिवशी पहारेकरी जागे होताच हातिम नाहीसा झाल्याचे पाहून घाबरले. त्याच्या रूपावर फिदा होऊन कोणत्या तरी परीने त्यांला पळविले असावे असे वाटून त्यांनी कसून तपास केली तरीही त्यांना शोध लागला नाही.

शेवटी राणीने खुद्द सेनापतीलाच तपासासाठी पाठविले. परंतु एके दिवशी हातिमाला व हसनापरीला समुद्रकिनाऱ्यावर हिंडताना एका पहारेकऱ्याने पाहताच तो तिला म्हणाला, 'महापरीने त्याला दरबारात बोलाविले आहे. त्याच्याबरोबर तू सुखोपभोग घेत आहेत ही बातमी मी ताबडतोब राणीला जाऊन सांगणार आहे' हे ऐकताच हसनापरी पहारेकऱ्यास पकडण्यासाठी धावली, पण तो तिला सापडला नाही. त्याने पळत जाऊन राणीला सर्व हकीगत कळविली.

महापरीने ताबडतोब तिच्या आईस पकडून आणण्याचा हुकूम सोडला. त्याप्रमाणे तिला पुढे हजर करण्यात आल्यावर तिने प्रथम तिच्या मुलीची चौकशी केली. तेव्हा ती म्हणाली, 'गेले चार मंहिने माझी मुलगी कोठे आहे हे मलाच माहिती नाही'

नंतर राणीच्या आज्ञेप्रमाणे सेनापतीसह मसनापरी आपल्या मुलीला शोधण्यासाठी निघाली असता एका बागेत हातिमाबरोबर सुखविलास करताना आपल्या मुलीला पाहून ती भयंकर संतापली. तिने मुलीस ताब्यात घेऊन हातिमास सेनापतीच्या स्वाधीन केले.

सेनापतीने हातिमाला राणीपुढे आणून उभे केले. त्याचे

लावण्य पाहून ती स्तिमित झाली. 'इकडे येण्याचे कारण काय? असे तिने विचारल्यावर हातिम म्हणाला, 'राजा फरोक्याश या च्याकडून आपले गुणगान केल्यावर आपल्या सेवेसाठी मी हजर झालो आहे. त्यानंतर राजा फरोक्याश याची दोस्ती कशी झाली हे त्याने तिला सांगितले.

नंतर महापरी त्याला म्हणाली, 'मनुष्यप्राणी हा सर्व प्राण्यांत अत्यंत श्रेष्ठ, बुद्धिमान व युक्तिबाज म्हणून आपल्या हातून माझी एक मोठी काळजी दूर होईल असे वाटते. ' ती सांगू लागली की, 'माझा मुलगा हा रूपसंपन्न असूनही त्याला नेत्ररोग आहे. त्यामुळे तो फार वैतागला आहे. आपण त्याला बरा करा व त्याला दिसू लागेल असे कराल तर मी तुम्हाला मागाल ते देईन.'

हातिमने आपल्याकडे असणारा मोती उगाळून राजपुत्राच्या डोळ्यास लावला. त्यामुळे त्याच्या वेदना जरी बंद झाल्या तरी त्याला दृष्टी मात्र आली नाही. तेव्हा त्याची दृष्टी परत येईल असे उपचार करण्याविषयी महापरीने हातिमास विनंती केली. झलमत अरण्यात असणाऱ्या नादर वृक्षाचा रस घेऊन या म्हणजे त्याची दृष्टी मी आणतो! असे हातिमने महापरीला सांगितल्यावर राणीने नादर वृक्षाचा रस आपणणाऱ्यास त्याच्या इच्छेस येईल ते इनाम देण्याची दंवडी साऱ्या राज्यात पिटविली. ती दवंडी जरी सर्वांना ऐकवली होती तरी राक्षस, भूते, पिशाच्चे वगैरे त्या वृक्षाच्या संरक्षणार्थ असल्याने त्या भयंकर ठिकाणी जाण्यास कोणीच तयार होईना.

अखेर हसानपरी महापरीस म्हणाली, 'मला आपण जर माझ्या अपराधाची क्षमा कराल व हातिमला माझ्या स्वाधीन

कराल तर मी तो रस घेऊन येईन.' यावर राणीने सांगितले, 'हातिम हा स्वतंत्र आहे त्याला तुझ्या स्वाधीन करण्याचा अधिकार मला नाही!' परंतु यावर तोडगा म्हणून हातिम म्हणाला, 'तू तो रस आणल्यास माझी इच्छा असेल तो पर्यंत तुझ्याकडे राहण्याचे वचन देतो. पण मला पुन्हा इच्छा होताच मी तेथून निघून जाईन.

हसनापरीने ती अट मान्य केली व ती मोठ्या कष्टाने झलमत अरण्यात पोहचली. अतिशय सावध राहून तिने नादर वृक्षाच्या रसाची कुपी भरून घेतली. इतक्यात अरण्याचे रखवालदार तिला धरण्यासाठी धावले, परंतु फार चपळाईने तेथून निसटली. नंतर ती थेट राणीपुढे आली आणि तिने तिला ती कुपी दिली.

हातिमने त्याच्याजवळ असणारा मोती त्या रसात उगाळला व ते मिश्रण राजपुत्रात्राच्या डोळ्यात लावताच त्याला साफ दिसू लागले.

नंतर महाराणीला हातिमने तिच्या वचनाची आठवण करून दिली. तेव्हा तिने हातिमला भरपूर द्रव्य बक्षीस दिलं, पण त्याच्याऐवजी माझ्या इच्छेप्रमाणे मला शहामोरा हिरा द्या असे सांगितले. तेव्हा महापरी आश्चर्याने म्हणाली, 'हा तू हारिथ कन्येसाठी मागत असावास. माझ्या कबुलीप्रमाणे मी तो आता तुला देते, पण थोड्याच दिवसात मी तो परत आणीन.'

तेव्हा 'माझा कार्यभाग साध्य झाल्यावर तुम्ही वाटेल ते करा.' असे हातिमने तिला सांगितले. राणीने तो हिरा त्याच्या स्वाधीन केला. तो हिरा ज्याच्याजवळ असेल त्याला पुरलेल्या धनाचा अचूक ठावठिकाणा लागतो असा विलक्षण गुणधर्म त्या हिऱ्याच्या ठिकाणी आहे हे हातिमच्या ताबडतोब प्रत्ययास आले.

मग कबूल केल्याप्रमाणें हातिम हसनापरीच्या महाली गेला व त्याने चार महिने मुक्काम केला.

नंतर परीराज्याच्या हद्दीवर येऊन तेथे वाट पाहात असलेल्या फारोकाश राजाच्या सेवकाबरोबर विमानाने तो त्याच्या राज्यात आला. तेथे दोन दिवस पाहुणचार घेऊन व राजास घडलेली सर्व हकीगत सांगून हातिम तेथून निघाला.

प्रवास करीत तो सुरी शहरात आला व आपल्या मित्रास येऊन हारीथ कन्येकडे गेला. तिला शहामोरा हिरा देऊन हातिम म्हणाला, 'तुझे सर्व प्रश्न आता बरोबर सुटले आहेत, तेव्हां आता माझ्या मित्राशी तू विवाह कर.'

तेथील रीतिरिवाजाप्रमाणे त्या दोघांचा विवाह मोठ्या थाटाने साजरा झाला. नंतर हातिम त्यांचा निरोप घेऊन निघाला. तेवढ्यात महापरीने तो हिरा हिरावून नेल्याने हारीथ कन्या शोक करीत असल्याची बातमी त्याला समजताच तो तिच्याकडे जाऊन तिची समजूत करताना म्हणाला 'तुझ्याजवळ अतोनात संपत्ती असताना आणखीन मिळावावी या लोभाने तूं हिरा मिळविलास खरा, पण जिथे देवाचीच इच्छा तो तुझ्याजवळ राहू नये अशी होती, तेव्हा व्यर्थ शोक करण्यात अर्थ काय?' असे म्हणताच तिला ते पटल्यावर हातिम तेथून निघाला.

पुढे नदीकाठावरून जात असताना एके ठिकाणी एका संगमरवरी वाड्याच्या दरवाजावर 'चांगले करून पाण्यावर टाक' हे वाक्य लिहिले त्याने वाचले. ताबडतोब दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याच्या आनंदात तो वाड्याजवळ गेला. इतक्यात तेथील नोकर त्या वाड्यात बसला होता. हातिमला पहाताच त्याने त्यालाही सिंहासनावर बसविले.

नंतर आपुलकीने त्याची विचारपूस करून त्याच्यासह भोजान केले. 'आपण आपल्या वाड्याच्या प्रमुख दरवाजावर जे वाक्य लिहिले आहे त्याचा अर्थबोध जाणून घेण्याची मला तीव्र इच्छा आहे,' असे हातिमाने विचारल्यावर तो सांगू लागला.' 'तरूणपणी मी भयंकर वाईट कृत्ये केली. चोऱ्या, मारामाऱ्या, दरवडे वगैरे मार्गाने अलोट संपत्ती मिळविली. स्वतः स्वयंपाक करावा. नंतर त्यातील काही अन्न श्रद्धेनें पाण्यात सोडून मग भोजनास बसावे असा माझा नियम होता.

पुढें एके दिवशी मी बराच आजारी पडलो. त्यावेळी मला यमदूत खेचून नेत आहेत असा भास झाला. पण तेव्हाच कांही तेजःपुंज दूतांनी तेथे येऊन माझी मुक्तता केली. त्याच्यापैकी एकजणाने सर्वांना सांगितले 'तुम्ही याला विनाकारण घेऊन निघालात. दररोज दानात सर्वश्रेष्ठ अन्नदान केल्याने याचे शंभर वर्षे आयुष्य झाले आहे. त्याच्या पुण्यसंचयामुळे तो सर्व सुखे पुष्कळ काळ उपभोगेल. याला परत नेऊन याच्याच नावाच्या दुसऱ्या कोणालाही आणा.' त्याचे म्हणणे ऐकून दूतांनी मला घरी आणून सोडले. हा भास दूर झाल्यावर मी मनोभावे परमेश्वर चिंतन केले.

पुढे मी बरा झालो व नित्याप्रमाणे त्या नदीत अन्न सोडले, पण मला तेथेच संभर मोहरांची थैली मिळाली. याप्रमाणे सतत दहा दिवस घडले. ज्याची संपत्ती असेल त्याने घेऊन जावे अशी दवंडी पिटवूनही कोणीही फिरकले नाही. एके दिवशी रात्री एक सिद्धपुरूष माझ्या स्वप्नात आला व त्याने मला संदेश दिला की, 'प्रत्यक्ष परमेश्वर तुला प्रसन्न झाला आहे. आता तुला रोज शंभर मोहरा सापडतील तरी तू त्यामधून स्वतःचा खर्च भागून उरलेल्या मोहरा दानधर्मासाठी खर्च कर.

नंतर मी खडबडून जागा झालो व परमेश्वराची प्रार्थना केली. पुढे हा वाडा बांधल्यावर त्याचे दरवाजावर प्रथम मी 'चांगले करून पाण्यावर टाक' हे वचन लिहिले. दैवयोगाने अजूनही मला नित्य शंभर मोहरा सापडतात. परमेश्वरी लीलेचे मनात कौतुक करीत हातिम तेथे दोन दिवस मुक्काम करून शहाबादेस आला.

तेथे मुनीरशहाला भेटून त्याला घेऊन तो हुस्नबानूकडे आला तिला त्याने घडलेली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकल्यावर बानू म्हराली, 'आता माझा तिसरा प्रश्न सांगते तो असा –

एक माणूस स्वानुभवाने असे म्हणत असतो की, कोणाशी दगा करू नकोस, करशील तर तशीच फळे भोगशील.

नंतर हातिम त्या दोघांचा निरोप घेऊन तिसऱ्या प्रश्नाच्या शोधार्थ निघाला.

## प्रश्न तिसरा

### 'कोणाशीही दगा करू नकोस, करशील तर तशी फळे भोगशील!'

शहाबादेच्या उत्तर दिशेकडे जात असताना हातिमला एक महिन्याने एक मोठा डोंगर लागला. त्याच्या पायथ्याशी एक इसम रडत म्हणत होता - 'हे प्राणदेवते! ताबडतोब ये तुझ्याविना मला साऱ्या दुनियेला स्मशानवैराग्य आल्यासारखे वाटते.'

त्याची ती केविलवाणी स्थिती पाहून हातिमने त्याच्याजवळ जाऊन त्याला आपल्या दुःखाचे कारण विचारले. तेव्हा तो सांगू लागला, 'हे दयाळू पुरुषा, मी व्यापारी असून या ठिकाणाहून

माल घेऊन जात असता एक अत्यंत सुंदर स्त्री पाहिली. तिला पाहून कामज्वराने माझी शुद्धी गेली.'

मी जेव्हा जागा झालो तेव्हा माझे डोके तिच्या मांडीवर आहे असे मला समजताच मी तिला विचारले, 'हे रूपवती! अशा घनघोर अरण्यात तू एकटी कशी? तेव्हा तिने सांगितले की, मी याच अरण्यांत राहणारी गंधर्वकन्या आहे. कित्येक दिवस मी आपल्यासारख्या पुरूषाची वाट पहात आहे. आज आपण मला. भेटलात. तेव्हा आता आपण सुखाने दिवस घालवू. तिच्या लाघवी बोलण्याने माझ्यावर मोहिनी घातली आणि सर्व आसांचा त्याग करून तिच्या जवळच राहिलो.

पुढे काही दिवसांनी मी तिला सांगितले की, आपण येथे राहण्यापेक्षा शहरात जाऊन राहू. तेव्हा ती म्हणाली, 'या जागेच्या मालकाची परवानगी घेऊन मी सात दिवसातच परत येते. तोपर्यंत तुम्ही येथून कोठेही जाऊ नका. गेलात तर आपण पुन्हा भेटणार नाही!' आज सात वर्षे होऊनही ती परत आली नाही. तिची माझी चूकामूक होईल म्हणून मी तेथून अजूनही कुठेच गेलो नाही. तेव्हा आता मी काय करू हे तुम्ही सांगा? त्या स्त्रीचे नाव अलकापरी असून ती अलका पर्वतावर राहते अशी माहिती व्यापाऱ्याकडून घेतल्यावर हातिम म्हणाला, 'थोड्यात दिवसांत मी तुझी आणि तिची भेट घडवितो. तोपर्यंत तू येथे आरामात राहा.'

नंतर हातिम उत्तरेकडील मोठेमोठे पर्वत ओलांडल्यावर एका खूप मोठ्या बागेमध्ये आला. तेथे तो विश्रांतीसाठीं बसला असता तेथील गार वाऱ्यामुळे झोपी गेला.

थोड्याच वेळात तेथे चार गंधर्व सुंदरी आल्या. त्या आपसात

बोलत होत्या. इतक्यात हातिम जागा झाला. तेव्हा 'तू येथे कोठून आलास?' असे त्यांनी विचारले. त्यावर हातिम उत्तरला, 'एका व्यापाऱ्यास अलका पर्वतावर रहाणाऱ्या अलका परीने फसविले आहे. म्हणून मी तिचा तपास करण्यासाठी इकडे आलो आहे.' ते ऐकून त्या संतापून म्हणाल्या, 'ती या भागाची मालकीण आहे. एका मानवाशी कसलेही संबंध ठेवण्याचे पाप तिच्याकडून घडणे शक्य नाही. तिच्यावर असले आरोप केल्यावर तुला आपला जीव गमवावा लागेल हे लक्षात ठेव' यावर हातिम म्हणाला, 'देव माझा पाठीराखा असेपर्यंत मला कोणीही मारू शकणार नाही.' तेव्हा 'तू आमच्याबरोबर रहावयास तयार झालास तर आम्ही अलका पर्वतावर घेऊन जाऊ' असे त्यांनी सांगितल्यामुळे हातिम नाईलाजाने कबूल झाला.

पुढे त्या स्त्रियांबरोबर एक आठवडा प्रवास केल्यावर त्यांनी हातिमला सांगितले - 'यापुढे तुझ्याबरोबर येणे आम्हाला शक्य नाही. उजव्या हाताच्या रस्त्याने पुढे गेल्यावर तुला दोन रस्ते दिसतील. त्यापैकी उजव्या हाताच्या रस्त्याने पुन्हा तू चालायला लाग. म्हणजे बरोबर पर्वतावरच पोहचशील. त्यांच्या सांगण्याप्रमाणे हातिम उजव्या हाताच्या रस्त्याने जाऊ लागला. पुढे त्याला दोन रस्ते लागले. पण रात्र झाल्याने त्याने तेथेच मुक्काम केला.

मध्यरात्रीच्या सुमारास त्याला कोणा माणसाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला म्हणून तो शोध करू लागला, पण त्याला कोणीच सापडले नाही. दुसरे दिवशी तोच प्रकार घडल्यावर हातिमने कसून शोध सुरू केला.

बऱ्याच वेळाने त्याला एक उघडा मनुष्य रडत असलेला भेटला. हातिमने त्याला रडण्याचे कारण विचारले. तेव्हा तो

म्हणाला की, 'मी एक शिपाई आहे. काम मिळावे म्हणून मी फिरत फिरत एका शहरात आलो. तेथे एका उदयानात मी विश्रांतीकरिता बसलो असता पुष्कळ सुंदर स्त्रिया आल्या. आपण आता येथे थांबू नये असा विचार करून मी तेथून निघालो, पण त्यांनी मी तेथे आल्याचे आपल्या मालकीणीला कळविले होते. त्यामुळे एका दासीबरोबर मला तिच्या महालात जावे लागले. तेथे गेल्यावर तिचे सौंदर्य पाहून मी मोहून गेलो आणि तिच्याशी गप्पागोष्टी मारीत बसलो. बऱ्याच वेळाने तिचा पिता तेथे आला. तो त्या शहराचा जादुगार राजा होता. मला तेथे पहाताच तो तिच्यावर भयंकर भडकला. तेव्हा ती शांतपणे म्हणाली, 'विनाकारण चिडू नका. आधी नीट चौकशी करा आणि मग माझी चूक असेल तर मला कोणतीही शिक्षा करा.' हें ऐकून तो एकदम शांत झाला. थोड्याच वेळांत तेथे एक वृद्ध बाई आली आणि सांगू लागली की, 'आपली कन्या आता उपवर झालेली आहे. हा तरूण उच्च कुळातील दिसतो आहे. यालाच आपला जावई करून घ्या. आपण या प्रमाणे वागलो नाही तर कुळाची दुष्कीर्ती झाल्याशिवाय रहाणार नाही'

नंतर तिच्या पित्याने तिची पसंती विचारताच 'त्याला पाहताच मी वरले आहे' असे तिने स्पष्ट सांगितले. तेव्हा जादुगार मला म्हणाला, 'माझ्या मुलीशी विवाह करावयाचा असल्यास माझ्या तीन प्रश्नांची उत्तरे दे.' तेव्हा मी काही विचार न करता संमती दर्शविली.

दुसरे दिवशी दरबार भरवला आणि सर्वांना माझी हकीकत सांगितली व तेथेच मला तीन प्रश्न सांगितले. त्यातील पहिला 'परो नांवाच्या पक्ष्याचे झोपडे आणणे.' दुसरा 'लाल रंगाच्या सापाच्या तोंडातला हिरा आणणे' आणि तिसरा 'तेल कढवून

त्यातून जिवंत बाहेर येणे' असा होता.

त्या सर्वांची उत्तरे शोधावी म्हणून मी प्रवासाला निघालो, पण वाटेतील खाण्यापिण्याच्या हालामुळे माझ्या अंगात पुढे झाण्याची ताकद उरली नाही. म्हणून मी येथे रडत बसलो आहे.'

त्या माणसाला तुझे तिन्ही प्रश्न सोडवितो असे आश्वासन देऊन हातिम पुढे निघाला असता त्याला माजद्रान अरण्यातून आपल्या मांडक्षवरचे मास गेले असता कोल्हयाने परोपक्षी आणून आपली जखम बरी केली होती याची आठवण होऊन तेथे जावे या विचाराने तो तिकडे निघाला.

त्याला वाटेत शहर लागले. तेव्हा तेथील सर्व माणसे तटाभोवती लाकडांचा ढीग करण्यांत गुंतली होती. ते पाहून हातिमाची उत्सुकता वाढली. त्याने जवळ जाऊन चौकशी केली. तेव्हा त्याला गावकऱ्यानी सांगितले की, दररोज रात्री ,क भयंकर राक्षस येऊन त्याला सांपडतील तेवढ्या लोकांना पकडून घेऊन निघून जातो. म्हणून संरक्षणासाठी हा ढीग आम्ही रात्री पेटवून ठेवतो. त्यामुळे राक्षस आत येऊन शकत नाही.

हातिमने राक्षस किती मोठा आहे हे विचारल्यावर 'त्याला सात डोकी असून प्रत्येकावर एक शिंग आहे. एखाद्या क्रूर श्वापदासारखा तो भयानक असून अजस्त्र आहे.' असे एकाने सांगितले. तेव्हां हातिम त्यांना म्हणाला, 'माझ्या सांगण्याप्रमणो वागाल तर मी राक्षसाला मारून टाकतो. त्याबरोबर त्या सर्वांनी एकदम मान्यता दिली.

नंतर राक्षसाच्या येण्याच्या मार्गवर हातिमने खूप मोठा खड्डा खणण्यास सांगून त्याच्या बाजूने लाकडाचे ओंडके व काटेरी

झाडांचा ढीग घालण्यास सांगितले. रात्र झाल्यावर तो ढीग पेटवून धनुष्यबाण सज्ज करून हातिम खड्ड्यांत जाऊन बसला.

मध्यरात्रीच्या समयास भयंकर आरोळ्या ठोकीत तो राक्षस शहराकडे आला. तेथे आग भडकलेली पाहून तो तेथेच थबकला. इतक्यात त्याच्या डोळ्यावर हातिमने नेम धरून बाण सोडला. तो लागताच राक्षस घायाळ झाला आणि भयाने आल्या वाटेने पळत सुटला. दुसऱ्या दिवशी त्याने तेथील लोकांना राक्षसाचा बंदोबस्त केल्याचे सांगितले. पण त्यांचा विश्वास बसेना.

शेवटी खात्री करून घेण्यासाठी सर्वजण रात्री गावाबाहेर जमले. पण राक्षसाची चाहूलही लागली नाही. तेव्हा त्यांचा विश्वास बसला. मग मोठ्या आनंदाने त्यांनी हातिमला राजाकडे नेले.

राजाने हातिमचा सत्कार करून त्याला बरीच संपत्ती बक्षीस दिली. परंतु हातिमने ती गरिबांना दान करून टाकली. नंतर राजाचा निरोप घेऊन हातिम माझद्रान अरण्यात जाण्यास निघाला. त्यावेळी राजाने त्यास एक राजदंड दिला आणि एक मोती घेऊन सांगितले कीं, 'ह्या राजदडामुळे विषबाधा होत नाही व शरीरभोवती फिरवला तर जादूटोण्याचाही परिणाम होत नाही. तसेच पाण्यातून जाण्यासाठी याचा होडीसारखा उपयोग होतो. ऐवढेच नव्हे तर अग्नीसुद्धा इजा करू शकत नाही. त्याचप्रमाणे हा मोती तोंडात ठेवल्यास सापाचे भय बाळगण्याचे काहीच कारण नाही. त्या दोन्ही वस्तूंचा स्वीकार करून हातिम प्रवासास निघाला.

पुढे त्यास एक काळ्या पाण्याची नदी लागली. तेव्हा राजदंडाच्या साहाय्याने तो पैलतीर जाण्यास निघाला. नदीच्या मध्यावर आल्यानंतर एका राक्षसाने हातिमला ओढून तळाशी नेले.

तेथे आपण जमिनीवर उभे असून राक्षस आपल्यासमोर हात जोडून उभा असल्याचे त्याने पाहिले

नंतर आश्चर्यचकित झालेल्या हातिमास राक्षस म्हणाला, 'एका बलाढ्य राक्षसाने मी जागेचा मालक असताना ही जागा माझ्याकडून अन्यायाने बळकावून घेतली आहे, तेव्हा कृपा करून आपणच याचा न्यायनिवाडा करा.'

इतक्यात तो बलाढ्य राक्षस तेथे आला. तेव्हा त्याला पाहताच दुसरा भिऊन पळू लागला. पण हातिमने धीर दिल्याने तो तेथेच थांबला.

नंतर हातिम त्या धिप्पाड राक्षसास म्हणाला, 'तुझ्यासारख्याला दुसऱ्याची जागा हिसकावून घेणे शोभत नाही. ते ऐकताच तो चवताळून हातिमच्या अंगावर आला तेवढ्यात हातिमने त्यास दंडाचा जोरात तडाखा दिला. त्याबरोबर तो घाबरून वेगाने पळत सुटला.

थोड्या वेळात योग्य न्याय करणाऱ्या हातिमास पहिल्या राक्षसाने नदीच्या पैलतीरी नेऊन सोडले. तेथून हातिम पुढे जात असता एका भयंकर अरण्यात येऊन एका झाडाखाली विश्रांतीसाठी थांबला. योगायोगाने त्याच झाडावर परोपक्ष्याचे एक जोडपे रहात होते.

त्या जोडप्याने परोपकारी हातिमास उपयोगी पडावे म्हणून सांगितले की, 'केवळ परोपकरासाठी तू परोपक्षाच्या जोडा शोधत आहेस, केव्हा आम्हास घेऊन त्या जादुगार कन्येस दे. म्हणजे तुझ्या दुःखी मित्राचा पहिला प्रश्न सुटेल. हातिमने ईश्वराचे चिंतन केले व परोपक्ष्याचा जोडा घेऊन त्या शिपायाकडे आला. त्यास

परोपक्ष्याचा जोडा देऊन हातिम म्हणाला 'हा जोडा जादुगार कन्येस दे म्हणजे तुझा पहिला प्रश्न संपला.'

शिपायाने त्याप्रमाणे केल्यावर तो जादुगारास म्हणाला, 'मी इतक्या कष्टाने हा परोपक्ष्याचा जोडा जिच्या प्राप्तीसाठी आणला तिला निदान एकदा पहायला तरी मिळावे.' तेव्हा जादुगर राजाने त्याची व आपल्या कन्येची भेट घडविली. तेव्हा तो शिपाई तिला म्हणाला, 'प्रिये, आता लाल सर्पाच्या तोंडातील हिरा आणण्यास मी निघालो आहे. तेव्हा ते सर्प कुठे असतात ते सांगतेस का ? तेव्हा ती म्हणाली, 'काफ पर्वतावर ते सर्प सापडतील', त्याप्रमाणे माहिती मिळाल्यावर त्याने ती हातिमास सांगितली.

नंतर हातिम काफ पर्वताकडे निघाला. वाटेत त्याला सात रंगाचा साप दिसला. तेव्हा हातिम त्याच्याच पाठोपाठ चालू लागला. संध्याकाळ झाल्यावर तो साप एका पर्वताच्या गुहेत शिरला. पण हातिम मात्र जवळच असणाऱ्या नदीवर गेला. तेथील लोकानी हातिमला खावयास घालून रहाण्याचाही आग्रह केला. परंतु तेथे न राहता हातिम परत सर्पाच्या गुहेजवळ येऊन बसला. थोड्या वेळाने काही धनगर फिरत फिरत तेथे येऊन मुक्कामासाठी थांबले.

तो सर्प मध्यरात्रीच्या सुमारास बाहेर आला व सर्व धनगरांस चावून गुहेत गेला. हातिमने व इतर गावातील लोकांनी दे दृश्य पाहिले. तेव्हा त्याना दु:ख झाले. तेवढ्यात तो सर्प बाहेर आला व त्याने गावाच्या पाटलास दंश केला. तेव्हा सर्व गावकरी चिंताक्रांत झाले.

नंतर तो सर्प तेथून निघून जाऊ लागला तेव्हा हातिम त्याच्या पाठोपाठ निघाला. पुढे तो सर्प संध्याकाळाच्या सुमारास

एका शहरात गेला व त्याने राजपुत्र व नंतर प्रधानास दंश केला.

काही वेळाने तो साप सिंहरूपात प्रकट झाला व त्याने एका तरूणाच्या नरडीचा घोट घेतला. नंतर त्या सिंहाने सुंदर स्त्रीचे रूप धारण केले व तो एका जाण्यायेण्याच्या रस्त्यावर येऊन बसला.

तेथून दोघा व्यापाऱ्यांना जात असताना पाहून ती सिंहरूपी सुंदरी मोठ्याने रडू लागली. तेव्हा त्यांनी जवळ जाऊन तिची विचारपूस केली. ते दोघे व्यापारी भाऊ होते.

त्यांना ज्यावेळी या स्त्रीचा पती नाहीसा झाल्याचे समजले त्यावेळेला त्यातील थोरला भाऊ म्हणाला, 'माझ्याशी लग्न करण्यास तयार असतील तर आमच्याबरोबर चल' तेव्हा या स्त्रीरूपधारी सर्पाने सांगितले कीं, 'मी तुझ्याशी लग्न करीन, पण तू दुसऱ्या कोणत्याही स्त्रीशी संबंध ठेवता कामा नये अगर मला स्वयंपाकपाणी तयार करावयास लावता कामा नये.' 'तेही मान्य करून तो तिला घेऊन निघाला. हातिम ते पाहून त्यांच्या पाठोपाठ जाऊ लागला.

पुढे वाटेत ती स्त्री म्हणाली, 'मला भूक लागली आहे.' तेव्हा आपल्या धाकट्या भावाजवळ तिला ठेवून मोठा भाऊ कांही पदार्थ आणण्यास गेला. तेवढ्यात ती स्त्री धाकट्या भावाला म्हणाली, 'तुझा थोरला भाऊ मला अजिबात पसंत नाही. तूच मला आवडला आहेस तेव्हा आपण चटकन निघून जाऊ.' त्यावर तो साळसपणे म्हणाला, 'आता मी तुला माझी आई समजतो.'

त्यामुळे चिडून जाऊन तिने आपल्या अंगावरील वस्त्रे फाडून

खूपमोठ्याने रडायला सुरूवात केली. तेवढ्यात मोठा भाऊ येताच तिने धाकट्या भावाने कांही नीच कृत्य केल्याचे सांगितले. तेव्हा धाकट्या भवाने खरी हकीकत सांगितली. तरीही थोरल्याचा विश्वास बसला नाही. दोघांनी तलवारी उपसून लढाई केली आणि त्यातच त्या दोघांना मृत्यू आला.

नंतर या स्त्रीने एका म्हाताऱ्याचे रूप घेतले. तेव्हा हातिमने कुतूहलाने त्यास विचारले, 'आपण सतत अशी निरनिराळी रूपे का घेता?' त्यावर तो उत्तरला की, 'मी मृत्युदेव यम असून माणसाच्या विधिलिखीताप्रमाणेच त्याचा अंत करण्यासाठी मी असा उपाययोजना करतो.'

हातिमने स्वत:बद्दल विचारता म्हणाला, हातिमा! तुला दोनशें वर्षे आयुष्य असून अजून तू शंभरीसुद्धा गांठली नाहीस. तुझ्या कानातून रक्त जाऊन तुझा शेवट होईल, पण त्याबद्दल कोणताही विचार तू आता करू नकोस. असेच परोपकारासाठी जीवन खर्च कर म्हणजे तुला पुण्य लाभेल.'

थोड्याच वेळात यम गुप्त झाला. हातिम स्वत:च्या कामासाठी पुढे जाऊ लागला. नंतर एका काळ्या जंगलातून जात असता त्याच्या अंगावर एक कृष्णसर्प आला, पण राजदंड दाखवून हातिमने त्यास पळविले. पुढे त्याला श्वेत अरण्य लागले. तेथील सफेत रंगाच्या सर्पाचा तो तांबड्या अरण्यात आला. तेथील उष्णतेने अस्वस्थ झालेल्या हातिमास एका सत्पुरूषाने दर्शन देऊन सांगितले, 'या ठिकाणच्या तांबड्या सर्पाच्या श्वासाने असे वातावरण निर्माण झाले आहे तुझ्या जवळचा मोती तोंडात धर म्हणजे तुला बिलकुल त्रास होणार नाही. त्याप्रमाणे केल्यावर हातिमाला हुशारी वाटू लागली. पुढे त्या अरण्याच्या मध्यभागी तेताच हातिमच्या अंगावर

असंख्य सापांनी फुत्कार टाकले.

त्याच्यामधील मुख्य सर्पाच्या तोंडात हिरा पाहताच हातिमने राजदंड त्याच्यापुढे टाकला. तेव्हा हिरा टाकून तो भीतीने इतरांच्या बरोबर पळून गेला. तो हिरा घेऊन हातिम आनंदाने परत फिरला व त्याने त्या शिपायाजवळ येऊन त्याला तो दिला. मग हातिमने त्याला त्या हिऱ्याचे आंधळ्याला दृष्टी येणे, अग्नी व पाण्यासापून इजा न पोहचणे, विषबाधा न होणे वगैरे अनेक गुण सांगितले. मग शिपायाने तो हिरा जादूगार राजास दिला.

नंतर त्याच्या प्रश्नाप्रमाणेच शिपायाने हातिमने दिलेला मोती तोंडात धरून कढईतील उकळत्या तेलात उढी टाकली, पण त्याला थोडीसुद्धा इजा झाली नाही. ते पाहून जादुगाराला फारच आश्चर्य वाटले.

मग आपण दिलेल्या वचनाप्रमारे त्याने त्या शिपायाचा राजकन्येशी मोठ्या थाटाने विवाह करून दिला. हातिम थोड्याच दिवसात सर्वांची रजा घेऊन पुढे निघाला.

वाटेत त्याला एक उंच डोंगर लागला. तो कसा ओलांडावा याचा विचार करीत असता हातिमला कांही गंधर्व स्त्रिया दिल्या हातिम त्यांच्याजवळ गेला तेव्हा त्या एका वारूळात शिरल्या. त्यांच्या पाठोपाठ हातिमही आत गेला तेथे त्यास एक उदयान लागले.

तेथे हातिमने त्या स्त्रियांना त्या प्रदेशाबद्दल विचारले तेव्हा त्या म्हणाल्या की, 'या भागाची मालकीण अलकान परी असून ती उद्या येथे येईल, परंतु तिने जर तुला पाहिले तर ती आम्हाला शासन केल्याशिवाय रहाणार नाही. तेव्हा तू तेथून

जावेस.' त्यावर हातिम उत्तरला की, 'मी अपार कष्ट सोसून, अनंत संकटांना तोंड देऊन तिच्या भेटीसाठीच तेथे आलो आहे. आता काय वाटेल ते झाले तरी मी तिला भेटल्याशिवाय तेथून जाणे शक्य नाहीं.

ते ऐकून त्यांनी हातिमची अलकानपरीशी भेट घडवून आणण्याचे कबूल केले व त्याला एका गुप्त ठिकाणी लपून रहाण्यास सांगितले. दुसरे दिवशीं अलकानपरी त्या उद्यानात आली. मोठ्या प्रमाने ती भेठीसाठी आलेल्यांशी हंसत खेळत गप्पागोष्टी करीत होती. तेव्हा त्या गंधर्व स्त्रियांनी हातिमचे हातपाय बांधले आणि अलकानपरीस जाऊन सांगितले की, आपल्या उद्यानात एक मनुष्य आला असता आम्ही त्यास पकडून ठेवले आहे.

ते ऐकल्यावर अलकानपरी म्हणाली, 'सात दिवसात येते म्हणून ज्या माणसास मी थांबवण्यास सांगितले तोच आला असेल, तेव्हा त्याला माझ्याकडे घेऊन या.' परीच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी हातिमास तिच्यापुढे नेऊन उभे केले. आपणास भेटलेला हा माणूस नाही हे पाहाताच तिला आश्चर्य वाटले. तिने हातिमला सिंहासनावर बसवून त्याला 'कोठून आलास?' असे विचारले. पण तिच्या रूपाची हातिमवर इतकी मोहिनी पडली की, त्याच्या तोंडून शब्दच उमटेना.

अलकनपरीने पुन्हा विचारल्यावर हातिमने मन आवरले व मी येमेन देशाहून आलो असून माझे नाव हातिम आहे, असे सांगितले. ते ऐकताच तिला इतका आनंद झाला की, तिने हातिमला स्वत:च्याच सिंहासनावर बसविले.

नंतर ती हातिमास म्हणाली, 'हे परोपकारी श्रेष्ठ राजा! आपली थोर कार्ती ऐकून प्रत्यक्ष भेट घ्यावी अशी कित्येक

दिवसांची माझी इच्छा होती. आज दैवयोगाने ती पूर्ण झाली म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजते. आता आपल्या येण्याचा हेतू कृपा करून सांगावा.' ते ऐकल्यावर हातिमने संगमरवरी पुतळ्यावर उभे राहून शोक करण्याऱ्या व्यापाऱ्याची माहिती सांगून म्हटले, 'तू सात दिवसात येते असे सांगून गेलीस, पण आज सात वर्षे तो तेथून हाललासुद्धा नाही. तुझ्या भेटीसाठी तो व्याकुळ झाला आहे.'

ते ऐकल्यावर अलकन परी म्हणाली, 'इकडे आल्यावर ती गोष्ट मी साफ विसरले पण माझ्यावर जिवापाड प्रेम असून ज्याला माझे नाव व ठिकाण माहीत आहे तो न येता व्यर्थ शोक करीत तेथे थांबलाच कशाला?' तेव्हा हातिम म्हणाला, 'मी येईपर्यंत हालू नका. नाहीतर आपली चुकामुक होईल या तुझ्या सांगण्यामुळे त्याला कोठेच जाता येईना.' त्यावर अलकन परी म्हणाली, 'आपण सांगता त्या गोष्टी पूर्ण सत्य आहेत, पण मानवाशी असले संबंध ठेवण्यास माझे मन धजत नाही. त्याला माझी इतकी जरूर आहे तर त्याने इकडे यावे.

हातिमास तिचे बोलणे ऐकून फार राग व 'एखादयाला वचन देऊनसुद्धा तू त्याचा असा विश्वासघात करतेस ही नीच गोष्ट आहे' असे म्हणून तो निघून आला व जवळच्या एका झाडाखाली सात दिवस अन्नपाण्यावाचून पडून राहिला. सातव्या दिवशी एका सिद्ध पुरूषाने स्वप्नात येऊन हातिमास म्हटले की, 'अरे हातिमा! येथे उपाशी पडून तुला काय साध्य होणार आहे? त्याच्यापेक्षा तुझ्याजवळ असणारा मोती उगाळून त्याचे पाणी परीस पिण्यास दे व तुझ्या मित्राला येथे घेऊन ये. म्हणजे परीची आपोआप त्याच्यावर प्रीती जडेल.'

अलकान परीने दुसऱ्या दिवशी हातिमची चौकशी केली. तेव्हा त्याने सांगितले कीं, तू तिकडे जाणार नाहीस तर निदान त्याला तरी इकडे घेऊन ये.' परीने त्याप्रमाणे दासीकरवी व्यापाऱ्यास आणविले.

परीला पहाताच व्यापऱ्याची पुन्हा शुद्ध गेली, पण तिने उपचार करून त्याला जागे केले. नंतर हातिमने अलकानपरीच्या पिण्याच्या पाण्यात उगाळलेल्या मोत्याचे पाणी टाक असे आपल्या मित्रास सांगितले. त्याने तसे केले. नंतर जरा वेळाने ती ते पाणी प्याली. त्यामुळे तिचे हृदयपरिवर्तन होऊन तिने व्यापाऱ्याशी विवाह केला. हातिमला आपल्या कष्टाला चांगले फळ आले आहे हे पाहून समाधान वाटले.

थोड्यात दिवसात त्याने त्यांचा निरोप घेतला, परीने पाठविलेल्या दासीसह हातिम पुढे निघाला. काही वेळाने 'कोणाशी दगा करून नको करशील तर तशी फळे भोगशील' असे शब्द त्याला ऐकू येऊ लागले. तेव्हा दासीने परत जाण्यास सांगून तो त्या शब्दाच्या रोखाने चालू लागला.

थोडे अंतर चालून गेल्यानंतर एका झाडाला पिंजरा टांगलेला असून त्यातील माणूस ते शब्द उच्चारित असल्याचे त्यास दिसले. तेव्हा जवळ जाऊन हातिमाने त्याला विचारले, 'तुझी अशी दीन अवस्था होण्याचे कारण काय व हे शब्द तरी तू सारखे का उच्चारतोस? तेव्हा तो म्हणाला, 'माझे दु:ख नाहीसे करण्याची तुझी तयारी असेल तर माझी पूर्व हकीकत ऐक' असे त्या वृद्धाने सांगितल्यावर हातिमने त्याची दु:खातून सुटका करण्याचे वचन दिले.

नंतर तो वृद्ध सांगू लागला, 'माझा बाप सावकार होता.

व्यवसायासाठी तो दूर गेला असता काही दुराचारी मित्रांच्या नादाने सारी संपत्ती मी उडवून टाकली. माझा बाप परत येत असता वादळाच्या तडाख्यात सांपडून मृत्यू पावला. माझी सारी इस्टेट मी गमावल्यामुळे मला वाईट दिवस आले. तेव्हा मला आमच्या घरात पुरलेल्या द्रव्याची आठवण झाली. ताबडतोब मी एका मांत्रिकास बोलावून सांपडलेल्या द्रव्याचा चवथा हिस्सा तुला देईन असे सांगितले. त्याने मला द्रव्य असणारी जागा बरोबर दाखविली. त्याचा योग्य मोबदला देण्याचे कबूल करूनही मी त्याला अगदी थोडे द्रव्य देऊ लागलो. त्याने ते नाकारताच मी त्याला धक्के मारून घालवून दिले.

पुढे थोडे दिवसात तो जादूगार माझ्याकडे येईन म्हणाला, 'मला द्रव्याची काहीच गरज नव्हती. मी तुझे मन पाहिले, पण तू मात्र विनाकारण मला छळलेस. आतां ते जाऊ दे. तुला मी आणखीन कितीतरी द्रव्य दाखवून देतो.' मी लोभाने पुन्हा त्याच्याशी प्रेमाने वागू लागलो. नंतर मी त्याला तुझी विद्या मला शिकवतोस का? असे विचारताच त्याने संमती दर्शाविली.

त्यावर तो मला म्हणाला, नुसत्या डोळ्यांनी पुरलेली संपत्ती दिसणे शक्य नाही. त्यासाठी तुला डोळ्यात अंजन घालून यावे लागेल मी ते मान्य केल्यावर तो मला गांवाबाहेरील एका झाडाखाली घेऊन आला. झाडावर हा पिंजरा टांगलेला पाहून मी त्याला याचा मालक कोण आहे हे विचारले. तेव्हा तो थोड्या, वेळात येईल असे त्याने सांगितले. नंतर त्याने ते अंजन माझ्या डोळ्यात घातले आणि माझी दृष्टी गेली. तेव्हा मी दुःखाने त्याला विचारले, 'तू काय केलेस? त्यावर तो उत्तरला, 'तू जे केलेस तेच मी केल्यावर तुला येवढे दुःख होण्याचे कारण काय? विश्वसघाताला

२८२५
०७-०७

हेच योग्य प्रायश्चित्त आहे'

त्यावर मी म्हणालो, 'या भयंकर कृत्याबद्दल परमेश्वर तुला नक्कीच प्रायश्चित देईल.' ते ऐकून त्या मात्रिकाने सागितले की, 'दर पाव घटकेला कोणीशी दया करू नकोस, करशील तर तशी फळे भोगशील असे म्हणत जा.'

कांही दिवसांनी एक पुण्यात्मा या जंगलात येईल. तुझ्या डोळ्यात त्याने सूर्यकमळाचा रस घालताच तुझे डोळे पूर्ववत् बरे होतील. त्याच्या म्हणण्याप्रमाणे हे श्रेष्ठ पुरूषा! तू आज आलास. आता कृपा करून या भयानक अवस्थेतून मला सोडव.' हातिमास त्याची कीव आली.

'मी सूर्यकमळाचा रस आणून तुझ्या डोळ्यात घालतो व तुला या यातनातून मुक्त करतो' असे आश्वासन देऊन हातिम तेथून निघाला.

इकडे अलकन परीच्या दासी हातिमास सोडून परत आल्या. त्याना पाहून अलकनपरी अतिशय संतापून म्हणाली, 'त्याला अर्ध्या वाटेत सोडून तुम्ही परत का आलात? ताबडतोब जाऊन त्याचे जे काम असेल ते केल्यावर परत या.' परीच्या आज्ञेप्रमाणे त्या ताबडतोब विमानाने हातिम होता त्या ठिकाणी उतरल्या व त्याला म्हणाल्या, 'महाराज! राणीच्या आज्ञेप्रमाणे आम्ही आपल्या सेवेसाठी परत आलो आहोत. तेव्हां आज्ञा व्हावी.'

त्यावर हातिम उत्तरला की, 'हिमयार अरण्यात असणाऱ्या सूर्यकमळाच्या सोधासाठी मी जात आहे.' ते ऐकल्यावर त्यांनी म्हटले की, आम्ही आपणांस अरण्यापर्यंत घेऊन जाऊ, पण सूर्यकमळे अत्यंत तेज:पुंज असून जंगलात अतोनात विषारी जनावरे सैरावैरा फिरत असल्याने आत येऊ शकणार नाहीं.' हातिमने

ते मान्य केल्यावर त्यानी विमानातून त्यास अरण्याच्या जवळ आणून सोडले. सूर्यकमळाचा तो हंगाम नसल्याने हातिमला तेथे कांही दिवस मुक्काम करावा लागला.

पुढे मोसम सुरू झाल्यावर सर्व झाडे फुलांनी बहरली. सूर्यकमळे तर विलक्षण तेजाने चमकत होती. अस्वलकन्येचा मोती तोंडात धरून हातिमने कमळे तोडल्याने त्यास कांहीच इजा पोचली नाही. ताबडतोब तो परत फिरला व पिंजऱ्यातील वृद्धाजवळ आला. त्याच्या डोळ्यात सूर्यकमळाचा रस घालताच त्याला पूर्ववत दिसू लागले.

हातिमचे उपकार मानून त्याने त्यास पुष्कळ द्रव्य दिले. परंतु त्याचा स्वीकार न करता हातिम त्याला म्हणाला की, 'हे द्रव्य गरिबांना देऊन सदाचाराने राहा म्हणजे तुझे कल्याण होईल.'

नंतर त्या विमानात बसून हातिम शहाबादेस आला. तेथे मुनीरशहास भेटल्यावर त्याच्यासह बानूकडे गेला.

बानूला सर्व हकीकत सांगितल्यावर तिला हातिमच्या शौर्याचे कौतुक वाटले. हातिमने तिला चौथा प्रश्न विचारला तेव्हा काराम शहरात राहणारा एक मनुष्य 'खरे बोलणारा कायम सुखी असतो' असे म्हणत असता त्याचा शोध लावा.

ते ऐकताच हातिम त्या दोघांचा निरोप घेऊन प्रवासास निघाला.

## चौथा प्रश्न

## 'खरे बोलणारा सदा सुखी असतो'

हातिमला काराम शहराचा मार्ग माहीत नसल्याने तो वाट फुटेल त्या बाजूने जाऊ लागला. थोड्या दिवसांनी त्याला रक्तासारखे लाल भडक पाणी असणारी एक नदी लागली. या चमत्काराचा शोध करण्यासाठी हातिम नदीच्या उगमाकडे जाऊ लागला.

कांही दिवसांनी त्याला एक अतिशय उंच तितकाच मोठा वृक्ष लागला. त्याच्या प्रत्येक फांदीला पुष्कळ स्त्रियांची मुंडकी टांगलेली असून त्यातून खालच्या पाण्यात सतत रक्त गळत होते. या विलक्षण दृश्याकडे तो त्यांच्याकडा बारकाईने पाहूँ लागला. त्यावेळी सगळ्यात उंचावर असणारे एक सुंदर स्त्रीचे शीर पाहून तो मनाशी विचार करू लागला: की, शरीरापासून वेगळी झालेली ही शिरे अशी हंसतात का? यांना अशा अनंत यातना का भोगाव्या लागतात? या गोष्टीचा शोध आपण लावलाच पाहिजे असे म्हणून त्या जागी आणखी कोणकोणते चमत्कार होतात हे पाहण्यासाठी तो तेथेच थांबला.

रात्रीचा सुमार झाल्यावर ती मुंडकी खालून वाहणाऱ्या पाण्यात पडू लागली. ताबडतोब तेथे एक अत्यंत शोभिवंत महाल निर्माण झाला. त्यामध्ये तऱ्हेतऱ्हेच्या भारी बैठकी व्यवस्थित घातलेल्या होत्या. त्या ठिकाणी प्रत्येक स्त्री आपापल्या आसनावर येऊन बसली. नंतर एक सर्वात सुंदर स्त्री सगळ्यात मौल्यवान असणाऱ्या सिंहासनावर स्थानापन्न झाली. तिला पाहून हातिमने अंदाज केला की, सर्वात उंच टांगलेले जे शीर होते तीच ही स्त्री होय. तिचे लावण्य पाहून हातिमचे मन अधिकच आकर्षित झाले. इतर स्त्रिया तिच्या दासी होत्या. इतक्यात महालातून नृत्यगायनाचा जलसा सुरू झाला.

कांही वेळाने तेथे भोजनाची सिद्धता झाली. सर्व स्त्रिया

पानावर जाऊन बसल्या. तेव्हा सर्वात सुंदर स्त्री म्हणाली, 'बाहेर एक प्रवासी बसला आहे त्याला भोजनाचे पान नेऊन दया.' त्याप्रमाणे एकीने तसे केले, परंतु हातिमने भोजनाचा स्वीकार न करता 'तुझी मालकीण कोण आहे व हा चमत्कार काय आहे? ते मला सांग' असे म्हणाला. 'ते मला सांगता येत नाही' असे ती म्हणाली. तेव्हा हातिम उत्तरला, 'असे असेल तर मला ते अन्न नको.' हे हातिमचे हे बोलणे तिने त्या मुख्य स्त्रीस कळविले. त्यावर 'आज आपण भोजन करावे. उद्या सर्व काही समजेल.' असे तिने कळविले. पण हातिमने ते न ऐकता त्या स्त्रीस अडविले. तेव्हा त्याला झटका मारून ती तेथून निघून गेली. हातिम मात्र तेथे तसाच उपाशी राहिला.

दिवस उजाडताच सर्व शिरे पहिल्याप्रमाणे झाडावर टांगली गेली. हा सर्व चमत्काराचा कसून तपास करावयाचा व मग त्या प्रमुख स्त्रीशी विवाह करावयाचा असा हातिमने मनाशी निश्चय केला. रात्र झाल्यावर पुन्हा महाल उत्पन्न झाला व पुन्हा एक स्त्री त्याचेसाठी भोजनाचे पान घेऊन आली. परंतु त्याने तेही नाकारले. जेव्हा हे त्या सुंदर स्त्रीला कळले तेव्हा तिने निरोप धाडला की, प्रथम तू जेवणखाण कर. मग तुला सर्व उलगडा होईलच. भोजन केल्यावर हातिम त्या आलेल्या स्त्रीबरोबर जाऊ लागला. तिने पाण्यात उडी मारताच हातिमनेही तिच्या पाठोपाठ उडी टाकली. काही वेळाने आपण एका घोर अरण्यात आहोत असे त्यास आढळून आले.

त्या ठिकाणी भटकत असताना त्याला एक सिद्ध पुरूष भेटला. हातिमने त्याची प्रार्थना करून घडलेली सर्व हकीकत सांगितली तेव्हा तो सिद्ध म्हणाला, 'ईद्रजालचा शोध करण्यास तू हजारो कोस दूर आलेला आहेस. तेथे राक्षसांची वस्ती आहे.'

त्यावर हातिम म्हणाला, 'मला पूर्वीच्या ठिकाणी परत जाण्यची इच्छा आहे.' असे म्हणताच सिद्धाने त्यास डोळे मिटावयास सांगितले. हातिमने तसे केले. त्याबरोबर हातिम मुंडकी लटकलेल्या त्या झाडापाशी आला. सर्वांत उंच असलेल्या त्या सुंदर स्त्रीचे मुखकमल काढण्याचा तो प्रयत्न करू लागला. तोच भयंकर वादळ झाले आणि हातिमचे अर्धे शरीर आत अडकून बसले. त्यातून बाहेर पडण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला, पण त्याला यश आले नाही. ज्या भयानक राक्षस वस्तीतून हातिमची ज्या सिद्ध पुरूषाने सुटका केली, तो तेथे प्रकट झाला. आपल्याजवळची थोडी राख त्याने झाडावर टाकली व हातिमची सुटका केली.

नंतर हातिमने त्याला विचारले की, 'या सर्व स्त्रियांची अशी शोचनीय स्थिती का झाली?' तेव्हा तो सिद्ध सांगू लागला की, 'स्त्रियातील अत्यंत सुंदर असलेले जे मुंडके आहे ते भुवनसुंदरी नावाच्या एका ऋृषीकन्येचे आहे व इतर तिच्या दासी आहेत. त्या सुंदरीचे एकपुरूषावर जिवापाड प्रेम होते. त्याजबरोबर तिची विवाह करण्याची तीव्र इच्छा पाहून ऋृषीस भयंकर राग आला. त्या भरातच त्याने इंद्रजाळ उत्पन्न केले आणि त्या भुवनसुंदरीची व तिच्या सर्व दासींची अशी शोचनीय अवस्था केली. या ठिकाणाहून हजारो मैलावर ऋृषीघाट नावाचा एक पर्वत आहे तेथे त्याचे वास्तव्य असते. सर्व तपस्व्याहून तो श्रेष्ठ असून केव्हाही येथे वायुवेगाने येऊन शकतो, तो जिवंत असेपर्यंत त्याच्यात कोणताच फरक होणार नाही.' 'काय वाटेल ते झाले तरी त्या भुवनसुंदरीचे शीर मी खाली आणल्याशिवाय रहाणार नाही.' तेव्हा तो सिद्ध म्हणाला, 'या भानगडीत तू पडू नयेस. तुला अतोनात कष्ट पडतील' हे सांगूनही हातिमचा निश्चय कायम होता. हे पाहून त्या सिद्धपुरूषाने आपल्या झोळीतील

थोडी राख त्या वृक्षावर टाकली व तो अदृश्य झाला.

ईश्वराचे चिंतन करीतच हातिम त्या वृक्षावर चढला. त्याने त्या भुवनसुंदरीच्या शिरास हाताचा स्पर्श करताच त्यचे शीर तेथे टांगले गेले व शरीर मात्र पाण्यात पडले. स्त्रियांबरोबर हातिम सर्व गोष्टीचा उपभोग घेऊ लागला. पण यातून आपली सुटका कशी करून घ्यावी ह्याचा तो सारखा विचार करीत होता.

याप्रमाणे अनेक दिवस गेल्यावर तो सिद्ध पुरूष परत तेथे आला नेहमीप्रमाणे त्याने आपल्या झोळीतील राख हातिमवर टाकली. त्याबरोबर तो पूर्ववत झाला. त्या सिद्‌धाच्या चरणावर मस्तक टेकवून हातिम विनयाने म्हणाला, 'आपल्या कृपेशिवाय माझी इच्छा पूर्ण होणे शक्य नाही.' त्यावर तो सिद्‌ध म्हणाला, 'त्यासाठी तुला त्या भुवनसुंदरीच्या पित्याला ठार केले पाहिजे. तेव्हा मी बारा अक्षरी एक मंत्र तुला सांगतो तो तू पाठ कर.' हातिमने तो पाठ करताच त्याने सांगितले की, 'या मंत्राचा जप स्नान करून करीत जा, म्हणजे तुझी सर्व संकटे नाहीशी होतील. त्याचप्रमाणे हा दंड जेव्हा हातात धरशील त्यावेळी क्षणार्धात तू त्या ब्रह्माघाटावर जाशील' त्याप्रमाणे हातात दंड धरून ईश्वराची प्रार्थना करताच हातिम ब्रह्मघाटावर गेला.

तेथील पर्वत चढून गेल्यावर त्याने स्नान करून मंत्रजपास आरंभ केला. तेव्हा ताबडतोब इंद्रजालातील जनावरे सैरावैरा पळू लागली. बारा अक्षरी मंत्राच्या साहाय्याने आपला प्राण घेण्यासाठी एक राजपुत्र येथे आला आहे, त्याच्या प्रचंड सामर्थ्यामुळे आपला नाश होणार हे ऋषीला समजताच तो भयभीत झाला. हातिमास मंत्राचा विसर पडावा म्हणून त्याने इंद्रजाळविध्येने यक्षिणी निर्माण

केल्या. त्यामध्ये भुवनसुंदरीचे रूप धारण केलेली स्त्री हातिमाजवळ आली आणि त्याला मोहक आवाजात म्हणाली, 'प्राणेश्वरा! माझ्यासाठी असे दुःखीकष्टी का होता? माझ्या बाबांनी कायमची सुटका केल्याने मी क्षणाचाही विलंब न करता आपल्याकडे आले आहे. नंतर तिने हातिमास बाहुपाशात घेऊन खूप मद्य पाजले व लगेच भयानकर रूप धारण करून त्याला कैद केले आणि कृषीपुढे नेऊन उभे केले.

मग त्या कृषीने त्याला अग्नीत टाकण्यास सांगितले, पण अस्वलकन्येने दिलेला मोती जवळ असल्याने हातिमला कोणतीच इजा झाली नाही. हे पाहताच त्याने यक्षिणीला हातिमास पुष्करणीत टाकून देण्याची आज्ञा दिली. पुष्करणीवर गेल्याबरोबर स्नान करून हातिम परत मंत्रजप करू लागला. आता मात्र आपली धडगत नाही म्हणून तो कृषी काळभैरवाची प्रार्थना करू लागला.

हातिमला मंत्र विसरावयास लावण्यासाठी काय उपाय करून असे कालभैरवाला विचारताच त्याने कृषीस सांगितले की, 'त्याची कीर्ती जगता चोहीकडे चिरंतन पसरावी म्हणून परमेश्वरानेच त्याला निर्माण केले आहे. त्याचा जप जालू असेपर्यंत मी काहीएक करू शकत नाही; पण केवळ तुझ्यासाठी त्याला गाढ झोपाविण्याचे काम मी करतो. त्याप्रमाणे त्याने हातिमास गाढ झोपविले. त्यास काळभैरवाने सुखाची गोड स्वप्ने पाडल्यावर मंत्राचा विसर पडला.

दुसऱ्या दिवशी हातिम पुष्करणीवर स्नानासाठी गेला असता त्याच्या अंगावर एक राक्षस धावून आला. पण त्याला तो प्रभावी मंत्र आठवेना त्यामुळे त्याची प्रतिकारशक्ती नाहीशी झाली. तेव्हा तो भयभीत झाला राक्षसाने कृषीच्या सांगण्याप्रमाणे हातिमास एका मोठ्या खड्ड्यात फेकून दिले.

तेथे तो आपल्या सुटकेसाठी परमेश्वराची प्रार्थना करू लागला. पुढे दोन दिवसांनी त्या ऋषीने आपल्या शिष्यास आज्ञा केली की, 'हातिम जवळ जो अस्वलकन्येने दिलेला प्रभावी मोती आहे तो घेऊन या आणि तो न दिल्यास त्यास दगडधोंड्यांनी ठेचा.' त्याच्या आज्ञेप्रमाणे त्या खड्यापाशी ते शिष्य येऊन हातिमकडे त्या मोत्याची मागणी करू लागले. पण हातिमने मोती तर दिला नाहीच उलट ऋषीच्या नरडीचा घोट घेण्याची प्रतिज्ञा केलेली पाहून ते शिष्य फार चिडले व त्याच्यावर दगडधोंड्यांचा वर्षाव करू लागले.

आपल्या गुरूस आवश्यक असणारा मोती त्याच्याकडून सामोपचाराने मिळवावा असा विचार करून त्या दिवशी मध्यरात्री एक शिष्य खड्डयाजवळ आला व त्याने हातिमास बाहेर काढले. नंतर हातिमने स्नान करून मंत्र जपण्यास सुरूवात केली. जेव्हा त्या शिष्याने हातिमजवळ मोती मागितला, तेव्हा हातिम म्हणाला, 'तुला मोती मिळणार नाही, पण तुझ्या गुरूला ठार मारून त्याचे पद मी तुला देतो. कारण तू माजी सोडवणूक करून माझ्यावर उपकार केले आहेस.' हे ऐकून तो शिष्य घाबरला. परत फिरल्यास गुरू आपणास कडक शिक्षा करीत म्हणून तो हातिमकडेच राहिला.

हे त्या ऋषीला समजताच तो अत्यंत संतापून त्या पुष्पकरणीवर आला आणि हातिमवर मंत्राचा भडीमार करू लागला. पण त्या मंत्रांचा हातिमवर परिणाम होण्याऐवजी ते मंत्र त्या ऋषीवरच उलटू लागले. त्यामुळे त्याचा शेवट झाला. नंतर या शिष्याला गुरूपद देऊन हातिम तेथून निघाला.

ताबडतोब तो भुवनसुंदरीकडे आला व तिच्याशी विवाह

करून तिला त्याने येमेन देशी पाठवून दिले.

पुढे काराम शहरी गेल्यावर आपण शोधत असलेले वाक्य एका दरवाजावर लिहिलेले त्याने पाहिले. तेव्हा अत्यंत आनंदाने तेथे उभा असताना त्या घरातील नोकर बाहेर आला तेव्हा हातिम त्याला म्हणाला, 'मला तुझ्या मालकाची भेट घ्यावयाची आहे.' मग त्या नोकराने आपल्या मालकास विचारून हातिमला वाड्यात नेले.

नंतर जेवणखाण झाल्यावर हातिमने मालकास विचारले की, वाढ्याच्या दरवाजावर 'खरे बोलणारा सदा सुखी असतो' असे वाक्य का लिहिले आहे? तेव्हा तो सांगू लागला की, 'माझे वय आठशे असून सातशे वर्षापूर्वी हे शहर वसले. तरूण वयात मी सर्व पैसा जुगारात गमावला. शेवटी चोरी करण्यासाठी रात्री राजवाड्यात शिरलो. तेथील अफाट संपत्ती पळवून मी जंगलाची वाट धरली. वाटेत माझी संपत्ती पाहून दुसऱ्या चोरांची टोळी मला ठार करण्यासाठी तेथे आली. मी त्याना राजवाड्यातील संपत्तीसंबंधी सांगत होतो. इतक्यांत भयंकर आवाज आणि वादळ सुरू झाले. त्याबरोबर सारे चोर जीव घेऊन पळाले.

थोड्याच वेळात वादळ शांत झाल्यावर एक सत्यपुरूष भेटला त्यांने मला विचारले की, 'प्रथम तू कोण आहेस हे मला सांग.' मग मी त्याला घडलेली सत्य हकीकत सांगितली. तेव्हा तो म्हणाला, 'तू पुन्हा कधीही जुगार खेळू नकोस.' मी खेळणार नाही अशी शपथ घेतल्यावर 'तू खरी हकीकत सांगितलीस म्हणून ही सारी संपत्ती तुला बक्षीस दिली आहे' असे सांगून तो दिसेनासा झाला. तत्पूर्वी तू नऊशे वर्षे जिवंत राहशील असा आशीर्वादही त्याने मला दिला. नंतर त्या संपत्तीतून मी

हा वाडा बाधला.

माझे हे वैभव माझ्या हितशत्रूंना पाहवेना. त्यानी मत्सराने माझी चौकशी करा असे कोतवालाला सांगितले. त्याप्रमाणे कोतवालाने माझी चौकशी केली. मी त्याला सत्य हकीकत सांगित्यावर त्याने मला राजासमोर नेऊन उभे केले. परंतु तेथेही मी सत्य गोष्टच सांगितली. ती ऐकल्यावर उदारपणे राजा म्हणाला.

'त्या सिद्ध पुरूषाने तुला क्षमा केली म्हणून मी तुला माफी करतो. आज मला प्रथमच सत्यवचनी चोर भेटल्याचे समाधान होत आहे.' राजाने मला खूप संपत्ती बक्षीस देऊन निरोप दिला.

तेथून घरी आल्यावर प्रथम मी 'खरे बोलणारा सदा सुखी असतो.' हे बोधवचन दारावर लिहिले. तेव्हा हातिमा! माझी माहिती ऐकल्याने तुझे कार्य तडीस जाणार आहे. तुझी भेट झाल्याने फार मोठे समाधान मला लाभले आहे' मग त्याचा निरोप घेतल्यावर हातिम भुवनसुंदरीला भेटण्यासाठी येमेन देशाकडे जाऊ लागला. त्या शहराच्या जवळ आल्यावर तो एका झाडाखाली शांतपणे बसला.

झाडावर राघू व मैना आपापसात बोलत होती. मैना राघूला म्हणाली, 'जिवलगा! काही झाले तरी तू मला एकटीला सोडून जाऊ नको. त्यावर राघू बोलू लागला की, 'तू काय वाटेल ते सांगितलेस तरी मी जाणारच. हाती घेतलेले कार्य तडीस नेले तरच परमेश्वराची मजवर कृपा होईल. तुम्हा बायकांना काय होते? एका स्त्रीच्या नादाला लागून राजाने आपले कार्यच अर्धवट सोडले आणि नंतर तो व्यर्थ पश्चात्ताप करू लागला. म्हणून मी जर तुझ्या नादी लागलो तर माझी राजाप्रमाणेच स्थिती होईल.'

ते ऐकून मैना म्हणाली, त्या राजाची हकीकत मला सांगा. तेव्हा पोपट म्हणाला, 'ऐक, राजा एकदा शिकारीसाठी एकटा भटकत असताना एका उद्यानात आला. तेथे एक शोभिवंत महाला आणि त्याचे समोर तलावही होती. राजा फिरून फिरून दमला होता. तेव्हा स्वतःला जरा उत्साह वाटावा म्हणून तो तेथेच हातपाय धूत असता त्याच्या हातात एक साखळी आली. ती ओढल्यावर त्याला एक पेटी बांधलेली दिसली. पेटीलाच अडकविलेल्या किल्लीकडे पाहून राजास कुतूहल वाटले व त्याने ते कुलूप चावी लावून उघडले. तेव्हा आतून एक सुंदर स्त्री बाहेर आली. राजाला गोंधळलेला पाहून ती म्हणाली, 'मी तुमच्याप्रमाणे मानवच आहे. तुम्ही आता स्वस्थपणे फराळ करून आराम करा.' तिच्या म्हणण्याप्रमाणे राजा तेथेच थांबला. नंतर जाण्याच्या वेळेला राजा आपली आठवण म्हणून तिला एक आंगठी देऊ लागला. तेव्हा ती म्हणाली, ही पाहा माझ्याजवळ अंगठ्यांची माळ आहे. माझा नवरा राजा असून त्याचा माझ्यावर विश्वास नसल्याने त्याने मला पेटीत घालून ठेवले आहे. तो रोज रात्री येतो आणि सकाळी मला पेटीत घालून निघून जातो. म्हाराज! आपल्याप्रमाणे मला भेटलेल्या पुरूषांनी ज्या अंगठ्या बक्षीस दिल्या आहेत याची ही एक माळच आहे' हे ऐकून हातिम विस्मयचकित झाला. नंतर त्या स्त्रीला पेटीत ठेवून व ती परत पाण्यात सोडून तो तिथून निघाला.

ही गोष्ट सांगून झाल्यावर राघू मैनेस म्हणतो, 'तू सुद्धा त्या स्त्रीप्रमाणे विश्वासघातकी नसशील कशावरून? एवढ्यासाठीच मी तुझ्या नादाने माझे काम अपुरे सोडणार नाही. आता हेच पाहा, की या झाडाखाली असलेला श्रेष्ठ राजा हातिम परोपकाराचे मोठे कार्य अपुरे टाकून स्त्रीलंपट होऊन येमेन देशाकडे निघाला

आहे.'

त्याचे हे बोलणे ऐकल्यावर हातिमने येमेन शहराकडे जाण्याचा आपला बेत रद्द केला व तो सरळ शहाबादेकडे निघाला. तेथे जाऊन पोहोचल्यावर त्याने मुनीरशहा व बानूची भेट घेतली.

तिला चौथ्या प्रश्नाचे उत्तर सांगून हातिम पाचवा प्रश्न विचारू लागला. तेव्हा बानूने त्याला आनंदाने पाचवा प्रश्न सांगितला. तो असा की, 'कोहनिदा' असा आवाज करण्याऱ्या पर्वताची खबर आण. बानूने अतिशय आग्रह केल्यामुळे हातिमने तेथे दोन दिवस मुक्काम करून विश्रांती घेतली व लगेच तो पाचव्या प्रश्नाचे उत्तर आणण्यासाठी निघाला.

## पाचवा प्रश्न

### 'कोहनिदा' असा आवाज करणाऱ्या पहाडाची गुप्त खबर आण.

प्रवास करीत करीत सहा महिन्यांनी हातिम एका मोठ्या शहरात आला. तेथे बरेच लोक जमले होते. हातिमास पाहताच त्यांनी मोठ्याने हाका मारून जवळ बोलावून घेतले.

जवळ जाताच तेथे भोजनाची जय्यत तयारी असून जवळच एका माणसाचे प्रेत ठेवलेले त्याने पाहिले. ते पाहून आश्चर्यचकित झालेल्या हातिमने हा काय प्रकार आहे? म्हणून चौकशी केली. तेव्हा त्यापैकी एक सांगू लागला की, 'आमच्या येथे कोणी मेला की, त्याच्या इष्ट मित्रांनी शहराच्या बाहेर भोजनाची सिद्धता केल्यावर जो पहिला प्रवासी येईल त्याला जेवू-खाऊ घालून

मग इतरांना जेवावयास बसवायचे अशी पद्धत आहे. त्यावेळी आम्ही सात दिवस प्रवाशाची वाट पहात आहोत. तेव्हा आज आपण भेटलात. आता आपण प्रथम जेवण करा.' तेव्हा हातिम आश्चर्यानें म्हणाला, 'समजा, एक महिना कोणीच भेटले नाहीतर काय करता? त्यावेळी त्यांनी सांगितले की, 'सहसा तसे होत नाही आणि जर झालेच तर पंधरा दिवस वाट पाहिल्यावर आम्ही भोजन उरकून घेतो,' नंतर त्या मेलेल्या माणसास त्यांनी गादीवर ठेवले आणि सर्वांनी त्यास सात प्रदक्षिणा घातल्या. मग ते लोक हातिमास म्हणाले, आता आपण पाच घास खा. मग आम्ही सर्वजण भोजनास बसू.' त्याने तसे केल्यावर त्यांनी जेवण उरकून त्या प्रेतास मूठमाती दिली.

हातिमच्या परोपकाराची महती चोहीकडे पसरली असल्याने तेथील राजाने त्यास बोलावून मोठा सन्मान केला. आपण कोणत्या कामासाठी प्रवासास निघाला आहात असे विचारल्यावरून हातिमने सर्व हकीकत सांगून म्हटले की, मला 'कोहनिदा' असा आवाज करणाऱ्या पर्वताची माहिती आणावयाची आहे. राजाला भौगोलिक परिस्थितीचे अतिशय ज्ञान असल्यामुळें त्याने सांगितले की, 'दक्षिण दिशेला असलेल्या झलमद नावाच्या अरण्याजवळ हा पहाड आहे. त्याच्या नजीक नैडा नावाचे शहर आहे. तेथील जनतेस कोणत्याही रोगाचा किंवा मृत्यूचा बिलकूल अनुभव नाही.' ही कहकीकत ऐकल्यावर त्याचा निरोप घेऊन हातिम पुढे निघाला.

पुढे त्याला एक शहर लागले. त्या ठिकाणी त्याने पहाडाची चौकशी केली तरी कोणी कांही सांगेना; परंतु एका माणसाने त्याला आपल्या घरी नेले. त्या गावात एक मनुष्य आजारी होता. त्याला मारून त्याच्या नातेवाईकांनी त्याचे मांस आपापसात वाटून घेतले. त्यातील काही मांस हातिम ज्याच्याकडे रहात

होता त्याच्याकडे आले होते. जेवणास बसल्यानंतर तो घरधनी म्हणाला, 'अशा मासांची चव आपण जन्मात घेतली नसेल. तेव्हा हातिमने कुतूहलाने विचारले, 'हे कोणत्या जनावराचे मांस आहे!

'हे मानवी-मांस आहे. हे त्याचे उत्तर ऐकून हातिम भयभीत झाला व हे ठिकाण 'नरबळी' देण्याचे असावे असा विचार करून तेथून पळत सुटला. पुढे अतिशय दमल्याने भूक भागविण्यासाठी त्याने एक हरीण मारले. ते भाजून खात असताना तेथे एक सिंह आला. तेव्हा ते हरीण सिंहाला देऊन त्याने कंदमुळे खाऊन स्वतःची भूक भागविली. पुढे प्रवास करीत असताना वाटेत त्याला एका ठिकाणी अग्नी पेटलेला असून काही माणसे तेथे रडत असे दिसले. त्याचे कारण विचारता 'पतीबरोबर सती जाण्याची येथे चाल आहे असे त्याला कळले. त्या घटनेबद्दल आश्चर्य करीत हातिम पुढे निघाला.

काही दिवसांनी त्याला एक अरण्य लागले. त्यातील सगळी श्वापदे भयभीत होऊन जीव घेऊन पळत सुटली होती. त्यांचा एक अग्नीप्रमाणे डोळे असणारे व शेपूट अतोनात लांब असणारे भयंकर जनावर पाठलाग करीत होते.

ते जनावर आपल्याही अंगावर येईल म्हणून हातिम झाडावर चढून हातात तलवार घेऊन तयारीत बसला. तेवढ्यात शेपटीच्या एका फटकाऱ्यात त्या जनावराने झाडच पाडले आणि हातिमावर झडप टाकली. अगोदरच सावध असणाऱ्या हातिमने चपळाईने त्याची झडप चुकवून तलवारीच्या एका घावाने त्यास मारून टाकले. त्याची नखे, दात कान आणि शेपटी कापून तो तेथून निघाला.

पुढे त्यास एक तटबंदीचे शहर लागले. पण आत माणसे दिसेनात म्हणून तो इकडे तिकडे पहात तेथून जात असताना राजवाड्यात दडून बसलेल्या राजाने त्यास आत बोलावले, आत गेल्यावर आपण असे दडून का बसला आहात असे राजाला विचारल्यावरून त्याने सांगितले की, शहरात एक भयानक जनावर शिरून लोकाना ठार मारू लागल्यामुळे सर्वजण जीवन घेन पळून गेले. म्हणून मी दडून बसलो. त्यावर हातिम म्हणाला, 'त्या जनावरास मी मघाशीच ठार केले आहे. ही पाहा त्याची नखे दात, कान वगैरे अवयव मी कापून आणले आहेत. तेव्हा आता तुम्हाला भिण्याचे काहीच कारण नाही.' ते ऐकून राजास अतिशय आनंद झाला. थोड्यात वेळाने सेवकाकरवी ही बातमी राजाने जाहीर करताच शहरात लोक परत येऊ लागले.

काही दिवस मुक्काम केल्यानंतर हातिमने 'नैडा' पर्वताकडे जाण्याची राजाची परवानगी मागितली. तेव्हा राजा म्हणाला, 'आता मी थकलो आहे. मला पुत्र नाही. माजी कन्या तुम्हाला देऊन तुम्हास राज्यपद द्यावे अशी माझी इच्छा आहे.' पण आता मी स्वीकारलेले महत्त्वाचे कार्य पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याच गोष्टीचा विचार करू शकत नाही, असे हातिमने उत्तर दिल्याने निराश झालेल्या राजाने आपले काही सेवक देऊन हातिमास जाण्याची परवानगी दिली. राजाच्या सेवकाने त्यास 'नैडा' पर्वताचा रस्ता दाखविला.

तेथील शहरात गेल्यावर हातिम राजास भेटला. त्याची हकीकत ऐकल्यावर राजा म्हणाला, 'काही दिवस तेथे मुक्काम कर म्हणजे पर्वताची सर्व माहिती कळेल.' त्याप्रमाणे तेथे राहिल्यामुळे हातिमच्या खूप ओळखी झाल्या आणि त्याचा वेळ आनंदात जाऊ लागला. नंतर एकदा 'नैडा' पर्वताची हातिमने चौकशी

केली असता एकजण म्हणाला, 'तो पहा 'नैडा' पर्वत समोरच आहे.' इतक्यात फार मोठा आवाज झाला आणि एक माणूस चित्रासारखा उभा राहिला. जरा वेळाने तो माणूस पर्वताकडे जाऊ लागला. त्याच्या बरोबरच्या माणसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, पण तो सफळ झाला नाही.

तो माणूस तसाच पुढे गेला. त्यासंबंधी चौकशी केली असता हातिमला सांगण्यात आले की, ज्या माणसास काळाचे बोलावणे येते तोच त्या पर्वताकडे जातो. तो काळ म्हणजे मघाशी झालेला मोठा आवज होय. तो आवाज कोणी केला असे हातिमने विचारले तेव्हा लोक म्हणले, 'ते त्याच माणसास विचारा.' ताबडतोब हातिम त्या माणसाच्या मागे धावला आणि त्याला विचारू लागला, 'मित्रा! तो आवाज कोणी केला हे मला सांग?' पण ते न सांगता हातिमास झिडकारून तो बेसुमार धावत सुटला आणि अदृश्य झाला.

या घटनेस थोडा वेळ होताच तो डोंगर नाहीसा होऊन त्या जागी एक घोडा दिसू लागला. हा चमत्कार पाहून हातिम परतला. त्यावेळी तेथे जमलेले मंडळी पर्वताकडे तोंड करून उभी होती आणि हातवारे करून तोंडाने काहीतरी म्हणत होती, नंतर ते सर्व लोक गुपचूप तेथून निघून गेले.

यानंतर हातिम एका मनुष्याबरोबर गप्पागोष्टी परीत असताना 'नैडा' पहाडातून पहिल्याप्रमाणेच मोठा आवाज आला. लगेच तो मनुष्य पर्वताकडे जाऊ लागला. या प्रकारच्या शोधासाठी त्याचा हात घट्ट पकडून हातिम त्याच्याबरोबर जाऊ लागला. जाता जाता हातिमने त्याच्याशी बोलण्याचा बराच प्रयत्न केला, परंतु तो गप्पच राहिला. नंतर हातिमाच्या हातास झटका देऊन

तो पर्वताकडे पळत सुटला पण हातिमने चपळाई करून त्यास पुन्हा गाठले. पुढे ते दोघे पहाडच्या मध्यापर्यंत चढले.

नंतर पर्वत दुभंगल्याने एक मोठी फट पडली होती. त्यात दोघे शिरताच ती मिटली गेली. मग त्यांना एक हिरवेगार मैदान लागले. ते संपल्यावर दुसरे काळ्या रंगाचे मैदान लागले. तेथे एक कबरीप्रमाणे चिरा तयार केलेला होता. त्यावर तो माणूस झोपताच मृतवत् होवून त्या चिऱ्यासह् खाली दुभंगलेल्या जमिनीत अदृश्य झाला व ती जमीन पूर्ववत् दिसू लागली.

हातिम तो चमत्कार पाहून परमेश्वराकडे हवाला ठेवून त्या मैदानातून निघाला व समुद्राकिनारी आला. त्यावेळी समुद्र इतका खवळला होता की, हातिमास काहीच दिसेना. नंतर समुद्र शांत झाल्यावर त्यास एक जहाज दिसले. त्यात एक जलदेवता निर्माण झाली व हातिमास म्हणाली, 'तू जहाजात येऊन बैस म्हणजे तुझी सुटका होईल' तसे केल्यावर हातिमला खाण्याचे पदार्थ व थोडे पाणी मिळाले. असे सात दिवस प्रवास केल्यावर हातिम पर्वताजवळ आला आणि जहाजातून उतरला.

नंतर त्याने पर्वत ओलांडला तेव्हा त्यास एक तांबडा समुद्र लागला. त्याच्या किनाऱ्यावरून जात असताना भूक लागली म्हणजे तो एखादा पक्षी मारून खात असे. ह्या प्रमाणे प्रवास चालू असताना किरमिजी, जांभळा, हिरवा, निळा असे अनेक समुद्र लागले. आता आपण मायदेशी जाऊ शकणार नाही असे हातिमास वाटले. त्याचप्रमाणे मुंनीरशहास दिलेले वचन अपूर्ण राहील म्हणून हातिमास दुःख वाटू लागले. तरीही शेवटपर्यंत जोराचा प्रयत्न करावयाचा असा त्याने निश्चय केला. कांही दिवसांनी रूपेरी लाटा असणाऱ्या समुद्रापाशी तो आला. त्याने

त्या पाण्यात पिण्यासाठी हात घालताच त्याचे हात रूप्याचे झाले व ते निकामी बनले. त्याचा शोध करीत बसला असताना तेथे एक गलबत आले. त्याच्या साहाय्याने तो समुद्र ओलांडल्यावर त्यास एक चमत्कारिक प्रदेश लागला.

तेथे नाना आकाराचे असंख्य खडे होते. त्यांचे निरीक्षण करता ते हिरे-माणेकांचे मौल्यवान खडे आहेत हे त्यांच्या लक्षात आले. त्यापैकी कांही घेऊन तो पुढे जात असताना त्यास मौल्यवान रत्ने दिसली. तेव्हा पहिले खडे टाकून त्याने ती रत्ने घेतली, पुढे त्यास एक ओढा लागला. त्याच्या पाणत्यात हात घालताच त्याचे हात पूर्ववत् झाले.

नंतर ईश्वराचे स्मरण करून तो तेथे झोपी गेला. उठल्यानंतर माणसासारखे अवयव असून सिंहासारखे तोंड असणारे बहुसंख्य प्राणी दिसले. हातिमने आपले धनुष्यबाण सज्ज केलेले पाहून ते प्राणी म्हणाले, 'अरे हातिमा! आपल्या स्वतःच्या संरक्षणासाठी आमचे प्राण का घेतोस?' ते ऐकून हातिमास पश्चाताप वाटून त्याने धनुष्यबाण खाली ठेवला. तेव्हा ते बोलू लागले की, दुसऱ्याची वस्तू त्याने दिल्याशिवाय घेणे हे तुमच्यासारख्या दयाळू आणि परोपकारी म्हणून कीर्ती असणाऱ्या थोर माणसाला लज्जास्पद आहे' तेव्हा हातिम उत्तरला, 'परमेश्वराने ज्या वस्तू निर्माण केल्या आहेत त्यावर सर्वांचाच सारखा अधिकार आहे. समुद्रातले ओंजळभर पाणी घेतल्याने मी चोर ठरत नाही; त्याप्रमाणे ही रत्नें घेतली असता मी गुन्हेगार होत नाही, आणि ती सुद्धा मी इतरांनाच वाटणार आहे हे तुम्ही लक्षात घ्या.'

'हे हातिमा! या वस्तूच्या लोभामुळे तुझी येथून सुटका होणार नाही.' म्हणून तुझ्या कल्याणाचीच गोष्ट आम्ही सांगत

आहोत.' हे त्यांचे बोलणे ऐकून हातिमाने घेतलेली सर्व मौल्यवान रत्ने फेकून दिली. पुढे त्या प्राण्यांनी एका ओढ्याजवळ आल्यावर हातिमास तीन रत्ने, एक हिरा, एक माणिक अशी पाच जवाहिरे दिली आणि सांगितले की, 'याशिवाय लोभाने जास्त घेऊ नकोस आणि जर घेशील तर संकटात सापडशील'

नंतर हातिमाने त्यास आपल्या देशाचा मार्ग विचारला असता ते म्हणाले, आजपर्यंतच्या अनेक प्रवासात ज्याने तुला सोबत केली तोच ह्यावेळी साहाय्य करील. आजपर्यंत येथें आलेल्या लोकापैकी सर्वजण मृत्युलोकी गेले. परंतु तीनच श्रेष्ठ पुरूष आपल्या मायदेशी परत गेले. अनेक सत्कृत्ये तुझ्या हातून होणार असल्यामुळे तू बचावलास. आता जाताना तुला सुवर्ण समुद्र. नंतर तांबडा व त्यामागून पिवळा, असे समुद्र लागतील मग तू आपल्या मायदेशात जाऊन पोहोचशील' इतके म्हणून ते प्राणी गुप्त झाले.

हातिम परमेश्वराचे चिंतन करून पुढे निघाला. वाटेत त्याला सुवर्ण पर्वत लागला. तेथे झाडे, फुले, फळे इतकेच काय पण सुवर्णमय झरे वाहत होते. वाटते त्याला एक रमणीय उद्यान लागले. त्यातील सुवर्ण कोचावर हातिम विश्रांतीसाठी बसला. रात्र झाल्यावर तेथे खूप गंधर्व सुंदरी आल्या. 'तुम्ही कोण आहात? म्हणून हातिमने चौकशी केली तेव्हा 'शृंगारसुंदरी नावाच्या राणीचे हे राज्य आहे व आम्ही तिच्या दासी आहोत' असे त्या म्हणाल्या. थोड्याच वेळात जिचे मुखकमल चंद्रापेक्षाही विलक्षण सुंदर असून जिच्या दंतपक्ती कुंदकळ्याच आहेत अशी अप्रतिम सौंदर्यवती शृंगारसुंदरी तेथे आली. तिचे सौंदर्य पाहून हातिमचे भान नाहीसे झाले.

तो सावध होत नाही हे पाहून त्या राणीने त्यास आपल्या

महालात नेले. तेथे अनेक उपचारानी तिने त्यास सावध केले. सावध झाल्यावर हातिमाने शृंगारसुंदरीस सर्व हकीकत सागितली. त्यावेळी हातिमाने चौकशी केली असता 'या प्रदेशाचे नांव अमरावती असून ह्रा मेरू पर्वताचा भाग आहे' असे तिने सांगितले, तेथे पांच दिवस पाहुणचार घेऊन हातिमने तिचा निरोप घेतला. नंतर तो सुवर्णसमुद्राजवळ आला असताना तेथे त्याला एक जहाज दिसले. तेव्हा त्या जहाजात बसून त्याने तो समुद्र ओलांडला. नंतर त्यास रेताड मुलूख लागला. तेथे उष्णतेच्या लाटा येत असून त्या ज्वालाप्रमाणे दिसत होत्या. त्यामुळे त्याचा जीव कासावीस झाला. इतक्यात पूर्वीचे प्राणी तेथे प्रकट झाले व त्यांनी त्यास एक मंतरलेला मोती दिला व म्हणाले, 'हा तू तोंडात धर म्हणजे तहान, भूक, अग्नी ह्यांचा त्रास तुला कधीही होणार नाही.'

अशा तऱ्हेने प्रवास करीत असताना अग्निज्वाळेसारखा एक भयानक समुद्र त्यास लागला व त्यात एक गलबत दिसले. त्यामधून प्रवास केल्यानंतर पंधरा दिवसानंतर त्यास जमीन लागली. तेथें चौकशी केल्यानंतर एका शेतकऱ्याने त्याला सांगितले की, हा येमेन देश असून तेथे तई राजा राज्य करतो. त्याला हातिम नांवाचा एक पुत्र आहे. लोककल्याणासाठी तो येथून प्रवासास गेला आहे.

नंतर हातिम त्यास आपली ओळख पटवून देऊन त्याच्या झोपडीत गेला. तेथे त्याने थोडी भाकरी खाल्ली आणि पाणी प्याला. मग तो शेतकऱ्यास म्हणाला की,'हाती घेतलेले कार्य पूर्ण करून मी लवकरच परत येईन असं तई राजाला कळव.'

तेथून निघाल्यावर हातिम शहाबादेश आला. नंतर मुनीरशहाची

त्याने भेट घेतली व तो बानूकडे गेला. नंतर त्याने तिला 'कोहिनिंदा' आवाज करणाऱ्या पर्वताजवळ घडलेल्या घटनेची हकीकत सांगितली. नंतर सहावा प्रश्न विचारून दोनचार दिवस मुक्काम करून तो ताबडतोब सहाव्या प्रश्नाच्या उत्तरासाठी प्रवासास निघाला.

# सहावा प्रश्न

## 'पाणकोंबडीच्या अंड्याएवढा एक मोती माझ्याजवळ आहे तसा दुसरा आण'

हातिम सहावा प्रश्न सोडविण्यासाठी शहाबादेहून निघाला. प्रवास करीत करीत तो एका अरण्यात येऊन पोहोचला.

त्यावेळी रात्र झाल्याने आता तेथेच मुक्काम करावा म्हणून तो एका झाडाखाली थांबला व थोड्या वेळात झाडावर बसलेले एक राजहंसाचे जोडपे आपसात बोलू लागले.

त्यातील मादी राजसहंसास म्हणाली, 'जिवलगा! ही हवा मला मानवत नाही. तेव्हा दुसऱ्या ठिकाणी जाणे बरे. त्यावर राजहंस उत्तरला - 'खरे! आपण तुझ्या म्हणण्याप्रमाणे उदयाच-मानससरोवराकडे जाऊ. नंतर मादीने ह्या झाडाखाली उदासीन होऊन' हा कोण बसला आहे असे विचारले. तेव्हा राजहंसाने सांगितले की, मृत्युलोकात ज्याच्याजवळ सर्वांना नितांत आदर आहे तो हातिम नांवाचा राजपुत्र त्या झाडाखाली बसला आहे. त्याने सारे जीवन परोपकारासाठी वाहिले आहे. आता तो अंड्यासाएवढे मोती आणण्यासाठी निघाला आहे. तेव्हा मादीने त्या मोत्यासंबंधी माहिती विचारली.

त्यावर राजहंस म्हणाला, 'प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने मोत्याप्रमाणे अंडी घालण्याची दैवी शक्ती राजहंसाच्या ठिकाणी निर्माण केली आहे. परंतु या कलियुगात ते सामर्थ्यसुद्धा लोपले. या पूर्वी घातलेल्या अंड्यांपैकी दोनच मोत्ये राहिलेली आहेत. कारण सप्तसमुद्रानजीक गंगापूर नांवाचे एक शहर आहे. तेथे सूर्यकांत नावाच्या राजाने सागराची मनोभावे प्रार्थना केल्यावर प्रसन्न होऊन ती सागरानेच त्याला दिली. काही दिवसांतच दुसऱ्या एक राजाने सूर्यकांत राजास ठार मारले व त्यातील एक मोती पळवून नेला.

एका राजाकडून दुसऱ्याकडे तेथून तिसऱ्याकडे याप्रमाणे अखेर हुस्नबानू नावाच्या बरझाक शहरी राहणाऱ्या सुंदर स्त्रीकडे तो मोती गेला आहे. दुसरा मोती सूर्यकांताच्या राणीजवळ होता. राजा ठार झाला तेव्हा ती गरोदर होती. शत्रूच्या भीतीने पळून जाताना तिने तो स्वत:बरोबर नेला.

पुढे जात असताना तिला एक जंगल लागले, परंतु तेथून रस्ता न सांपडल्याने घाबरून ती रडत निघाली. थोड्या दिवसातच तिला समुद्र किनारा लागला. योगायोगाने त्याचवेळी कृपासागर नावाचा एक व्यापारी तेथे आला. तिची अवस्था पाहून त्याला गहिवरून आले व तो तिला घेऊन आपल्या जहाजावर आला. तो जेव्हा आपला जलप्रवाह संपवून घरी आला तेव्हां सूर्यकांताची राणी प्रसूत होऊन तिला पुत्र झाला.

कृपासागरास मुलगा नव्हताच तेव्हा परमेश्वर कृपेने आपणास देवलाभ झाला. हा पुत्र ईश्वरीप्रसाद आहे या समजुतीने त्याला फार आनंद झाला. बालवयातच त्याने त्यास एका विद्वानाचे स्वाधीन केले.

त्याने त्याला सर्व विदयात पारंगत केले त्याची बुद्धिमत्ता

व पराक्रम पाहून कृपासागराने त्याला आपला वारसा केले. थोड्या दिवसांनी कृपासागर आजारी पडला व त्यातच त्याचा अंत झाला.

कृपासागर हा मूळचा मांडलिक राजा होता. प्रजापती होता. त्याने एक गुणी मुलास वारस केले हे पाहून तेथील प्रजेनेही त्यास राजा म्हणून मान्यता दिली. पुढे पैगंबर शक सुरू झाले. तेव्हा इतर राजांप्रमाणे त्याचे राज्यही नष्ट झाले.

त्यानंतर ते मोती एका गंधर्व स्त्रीला मिळाले. तिने ते विरूपाक्ष नावाच्या आपल्या मुलास दिले. त्याने अशी प्रतिज्ञा केली आहे की त्या मोत्याच्या उत्पत्तीपासूनचा सर्व इतिहास सांगणाऱ्यास आपली कन्या व मोती द्यावयाचे. रमल विद्येच्या साहाय्याने फक्त विरूपाक्षालाच त्याच्या उत्पत्तीची सर्व माहिती कळली आहे. कारण तिच्या साहाय्याने भूत-भविष्य जाणता येते.

कलियुगात अशी मोत्ये निर्माण होऊ शकलीच नाहीत. त्याची माहिती मिळणे अशक्य आहे. पण तुला ती सांगण्याचे कारण या झाडाखाली थांबलेल्या हातिमास कळावी व त्याचे कार्य सिद्धीस जावे. हे राजहंसाचे बोलणे ऐकल्यावर मादी म्हणाली, 'अहो! तुम्ही सांगता हे सर्व ठीक, पण येथून हातिम बरझाक शहरी कोणत्या मार्गाने जाणार? शिवाय मार्गसुद्धा किती भयंकर आहे तुम्हाला माहीत आहेच.' त्यावर हंस म्हणाला, 'त्याची नसती काळजी करून आपल्याला करायचे काय, कारण प्रत्यक्ष परमेश्वरच त्याचा पाठीराखा आहे.'

तरीसुद्धा माझी काही पिसे मी त्यास देतो असे म्हणून त्याने पंख झटकल्यावर काही पिसे खाली पडली. नंतर हंस पुढे सांगू लागला की, 'वाटेतील काफपर्वताच्या नजिक असणाऱ्या जंगलातून जाताना यातील हिरव्या रंगीची पिसे जाळल्यावर व

त्याची राख पाण्यात कालवून अंगास लावल्यावर त्याच्या शरीरास अतिशय उग्र दर्प येईल व त्यास राक्षसकाया प्राप्त होईल. केवळ त्यामुळेंच कोणत्याही श्वापदापासून त्याला धोका निर्माण होणार नाही. एवढेच काय पण श्वापदे त्याच्या जवळसुद्धा फिरकणार नाहीत, त्याचप्रमाणे पांढरी पिसे जाळून ती अंगास लावल्यावर त्यास पूर्ववत होता येईल.' ते एकून पक्ष्याची भाषा समजणाऱ्या हातिमने राजहंसाची खाली पडलेली सर्व पिसे गोळा करून घेतली.

नंतर मादीने नरास प्रश्न केला की, तुम्हाला हे समजले तरी कसे? त्यावर हंस म्हणाला, 'आपल्या पूर्वजांकडून मला सारी माहिती मिळाळी, त्याचप्रमाणे माझ्या गुरूनें सुद्धा मला ती हकीकत सांगितली होती.' पहाट झाल्यावर ते हंसाचे जोडपे मानससरोवराकडे जाण्यासाठी उडून गेले.

थोड्या वेळाने हातिम तेथून पुढे निघाला. वाटेत एका झाडाखाली त्याने मुक्काम केला तेव्हा तो म्हणाला, हे 'देवा! या संकटकाळी मला कोणाचीच मदत होणार नाही का? असे म्हणताच मोठा आवाज झाला. या आवाजाने त्याला जाग आली. तावडतोब त्याने आवाजाच्या रोखाने शोध केला. थोड्यात वेळात एक कोल्हीण आपले डोके एका दगडावर आपटत असलेली त्याला दिसली. तिचा शोक पाहून हातिमला तिची दया आली.

'तुला कसली मदत पाहिजे?' हे त्याचे शब्द कानी पडताच ती केविलवाण्या नजरेने त्याला म्हणाली, 'बाबा रे काय सांगू माझ्या दुःखाची कथा! एका पारध्याने आत्ताच माझ्या पिल्लांला आणि नवऱ्याला नेले. आता मी पोरकी झाले' ते ऐकल्या हातिमने विचारले 'पारध्याचे घर कोठे आहे? तेथून चार मैलावर तो रहातो असे तिने सांगितले.

त्यादे घर दाखवायला चल असे हातिमने म्हटल्यावर कोल्हिणीने साफ नकार देताना म्हटलं, 'अरे तुमच्यासारख्या माणसावर भरवसा ठेवलेल्या एका वानरीसारखीच माझी गत व्हायची?' 'तिची काय गत झाली? असे हातिमने विचारताच कोल्ही सांगू लागली, 'गोदावरी काठी एक वानरी आपल्या नवऱ्याबरोबर सुखाने रहात होती. पुढ एके दिवशी तेथे एक पारधी आला. त्यावेळी तिचे पोर लहना होते. पारध्याने क्रूरपणे वानरास व तिच्या पिल्लास पकडून नेले.'

दुःखाने होरपळलेल्या वानरीने कोतवालाकडे जाऊन तक्रार केली. तेव्हां कोतवाल अतिशय संतापला व त्याने शिपायास त्या पारध्यास पकडून आणण्याचा हुकूम सोडला. थोड्याच वेळात पारध्यास कोतवालापुढे उभे करण्यात आले. त्यावेळी कोतवाल म्हणाला, 'महामूर्खा! हिचा वानर आणि हिचे पिल्लू सोडून दे.' त्यावर पारधी शांतपणे बोलला, 'महाराज! त्यांना दोन दिवसापूर्वी आपणच विकत घेतले आहे.' ते ऐकताच कोतवाल उद्गारला, 'असं होय? तर मग या वानरीलाच पकडून ठेवा.' ताबडतोब शिपायाने वानरेला बंदिस्त करून टाकले. ते ऐकल्यावर हातिम म्हणाला, 'ते कांहीही असो, पण मी मात्र तुला नक्कीच फसवणार नाही याची खात्री बाळग.'

त्याच्या म्हणण्याप्रमाणे कोल्हिणीने मोठ्या आनंदाने त्याला पारध्याच्या घरापाशी नेले. तेव्हां हातिमने पारध्याचे दार ठोठावले. ते उघडताच हातिम आत जाऊन त्यास म्हणाला, 'मी सांधे दुखीने अतिशय त्रस्त झालो आहे. कोल्ह्याच्या रक्ताने स्नान केल्यास ही व्याधी दूर होईल असे मला वैद्याने सांगितले आहे. तुझ्याकडे कोल्हे मिळू शकतील असे समजल्यावरून मी येमेन देशाहून इतक्या दूरवर आलो आहे. तरी तुझ्या जवळच्या कोल्हयांची

किंमत सांग. पारध्याने त्यास सात कोल्ही देऊन जी किंमत सांगितली त्यापेक्षा जास्त किंमत देऊन हातिमने सर्व कोल्ही ताब्यात घेतली. त्यातील मुख्य कोल्हयास फारच जखडून बांधले होते. त्यामुळे तो मरायला टेकला होता.

त्याला पाहून कोल्ही काकुळतीने हातिमास म्हणाली, 'ह्याला हुशारी वाटून हिंडाफिरायला लावण्यासाठी माणसाच्या रक्ताची एक पेलाभर जरूर लागेल.' तेव्हा हातिमने स्वत:चे रक्त काढून कोल्ह्यास पाजले. कोल्हा बरा झाल्यावर हातिमने तेथून कूच केले. पुढे थोडे दिवसता त्याला एक रेतीचे ओसाड मैदान लागले. हातिमला खूप तहान लागल्याने तो इकते तिकडे पाण्याचा शोध करू लागला.

थोड्याच वेळात एक पाण्याचा ओहोळ दिसला. परंतु तेथें एक भुजंग पसरलेला पाहून हातिम दचकला. इतक्यात तो भुजंग मनुष्यवाणीने हातिमास म्हणाला, 'हे हातिमा! विनाकारण घाबरू नकोस. शांतपणे पाणी पी. तुझी तहान भागल्यावर माझ्याबरोबर चल.'

हातिमने पाणी पिऊन झाल्यावर देवावर श्रद्धा ठेवून त्याला संमती दिली.

थोड्यात वेळात दोघेजण एका सुंदर अशा थंडगार उपवानात आले. हातिमास तेथे आराम करण्यास सांगून तो भुजंग समोरच्या तलावात उडी मारून नाहीसा झाला. ते पाहून हातिमास फार आर्श्चं वाटले.

नंतर त्या ठिकाणच्या रम्य वनश्रीस कुतूहलाने पाहत हातिम आरामत पहुडला. इतक्यात त्या तलावातून हातात सुवर्णपात्र घेतलेल्या

गंधर्व स्त्रिया बाहेर पडल्या. हातिमास पाहताच त्या त्याच्याकडे येऊन म्हणाल्या, 'ज्या गृहस्थाने तुम्हाला येथे आणले त्याने पाठविलेल्या या भेटीचा आपण स्वीकार करा.' तेवढ्यात तलावातून आणखी कांही स्त्रिया मौल्यवान रत्नांची ताटे घेऊन बाहेर पडल्या व त्यांच्या पाठोपाठ निरनिराल्या पक्वान्नांची ताटे घेऊन आणखी काही सुंदरी काठावर आल्या. त्या सर्व हातिमाजवळ आल्यावर हातिम त्याना म्हणाला, 'मला कोणत्याही गृहस्थाने येथे आणले नाही. तेव्हा तुम्हाला तसे वाटत असेल तर त्याला प्रथम येथे आणा, त्याशिवाय मी कशाचाही स्वीकार करणे शक्य नाही.'

ते ऐकून त्या आपापसात कुजबुजू लागल्या. इतक्यात तलावातून एक देखणा गंधर्व बाहेर पडला. हातिमच्या जवळ आल्यावर त्याने अभिवादन करून म्हटले, 'आपण मला ओळखले नाही काय?' हातिमचा गोंधळलेला चहेरा पाहून तो म्हणाला, 'मधाच्या ओहळावरून तुम्हाला येथे कोणी आणले?' त्यावर हातिम उत्तरला 'एका भुजंगाने.' तेव्हा तो म्हणाला, 'तर मग तोच तुमच्यासमोर उभा आहे.' ते एकून हातिम आश्चर्याने उद्गारला की, 'तुमच्या दोन्ही स्थितीत एवढा विलक्षण फरक पडण्याचें कारण काय? त्यावर गंधर्व म्हणाला, 'प्रथम आपण फार दिवसांची आपली क्षुधा शांत करा, मग मी सर्व हकीकत शांतपणे सांगतो.'

नंतर दोघांचे मोठ्या मजेने खाणेपिणे झाले. थोडी विश्रांती झाल्यावर हातिमने त्यास पुन्हा माहिती विचारली. तेव्हा तो सांगू लागला की, 'माझे नाव वीरसिंह, मी गंधर्व रजाचा सरसेनापती. एकदा विमानातून विहार करताना आपल्या स्वामींचे राज्य बळकवावे असा दुष्ट विचार माझ्या मनात आला. तेव्हा हाताखालच्या सैन्यास मी फितवून कट रचला. पण त्याचा सुगावा लागताच गंधर्व राजा इतका संतापला की, त्याने साऱ्या सैन्याला मंत्रसामर्थ्याने

भुजंग केले. त्यामुळे आमची स्थिती शोचनीय झाली. पुढे स्वत:च्या दुष्ट कृत्याचा पश्चात्ताप झाल्याने मी त्रासाने रानोमाळ भटकत असता एका महापुरूषाच्या मठाजवळ आलो.

नंतर आत जाऊन पूर्वीचे माझे पापकृत्य मी त्याला सांगून टाकले. तेव्हा स्वामीने संदेश दिला की, 'ज्यावेळी येमेन देशाचा परोपकारी राजपुत्र हातिम याचे दर्शन तुला होईल, तेव्हांच तुझ्या साऱ्या सेनेचा उद्धार होईल' ते ऐकल्यावर मी माझ्या बागेत येऊन राहिलो आणि गेली कित्येक वर्षे मी आपली वाट पहात आहे. पण आज तो सोन्याचा दिवस उगवला. आपली भेट झाल्यावर स्वामींनी आपल्याला मठात घेऊन येण्याची मला आज्ञा केली आहे. तेव्हा कृपा करून माझ्याबरोबर चलावे.' आश्चर्यचकित झालेला हातिम काही न बोलता गंधर्वाबरोबर चालू लागला.

नंतर स्वामीच्या मठात जाऊन त्यांचे दर्शन घेतल्यावर त्यांनी त्या गंधर्वास पूर्वपद प्राप्त करून दिले. थोड्या वेळाने ते दोघे परत आले तेव्हा गंधर्व हातिमास म्हणाला, 'आपले मजवर अनंत उपकार झाले आहेत त्याचा मी उतराई कसा होऊ? आपल्या या प्रवासाचे कारण मला समजेल का?

तेव्हा हातिमने स्वत:जवळचा मोती दाखवून त्यास म्हटले, 'याच्या जोडीचा दुसरा आणण्यासाठी मी इतक्या दूरवर आलो आहे' मोती पाहून वीरसिंह म्हणाले, 'याच्यासारखा दुसरा मोती बरझाकच्या राजाजवळ आहे. त्याचा इतिहास सांगणाऱ्यास तो आपली कन्या व मोती देणार आहे. पण वाटेत अनेक राक्षसवस्त्या असल्याने तेथे जाणे महाकठीण आहे.

तेव्हा हातिम म्हणाला, 'माझ्यावर किती संकटे कोसळली तरी कशाची पर्वा न करता खंबीरपणे मी तेथे जाईन व हाती

घेतलेले कार्य तडीस नेईन.' ते ऐकून गंधर्वाने आपल्या सरदारास बोलावून सांगितले, 'या श्रेष्ठ पुरूषाने आपल्याला त्या भयानक योनीतून मुक्त केले, तरी यांच्याबरोबर जाऊन तुम्ही याचे संरक्षण करा.'

सरदाराने ते मान्य केले, पण हातिम कोठे जाणार आहे हे समजताच तो घाबरून म्हणाला, 'महाराज! आपल्या आज्ञेप्रमाणे मी यांच्यासह निघतो पण वाटेत भयंकर संकटे आल्यावर आमच्या साहाय्याला आपण धांवून आले पाहिजे.' गंधर्वाने आम्ही येऊच अशी कबुली दिली व सरदारासह सेना पुढे धाडली.

नंतर त्याने हातिमास विमानाने रवाना केले. विमानाचा प्रवास सतत तीन दिवस चालला होता. पण त्यानंतर अतिशय दमल्याने व फार भूक लागल्याने त्यांनी विमान खाली उतरविले. मग दोन सेवक खाण्याचे पदार्थ आणण्यासाठी गेले.

ते विमान जेथे उतरविले होते ती जागा राक्षसांची होती. त्यामुळे थोड्याच वेळात बरेच राक्षस तेथे येऊन त्यांनी विमानाचा ताबा घेतला. हातिमाच्या सेवकांनी खूप प्रतिकार केला, पण राक्षसांच्या पुढे त्यांना नमावे लागले. नंतर त्यांनी हातिमास व सेवकांस पकडून राजापुढे उभे केले.

राजाने त्याना विचारले, तुम्ही कोठून आलात? तेव्हा त्यांनी हातिमाकडे पाहून उत्तर दिले, की, 'प्रथम या थोर पुरूषास सोडा. नाहीतर तुम्हाला फार त्रास होईल.' ते ऐकताच राक्षस राजा भयंकर संतापला व त्याने सर्वांना कैदेत टाकले.

इकडे थोड्याच वेळात खाण्याचे पदार्थ घेऊन ते दोन सेवक परत आले. तेथे हातिम व त्याचे रक्षक नाहीत उलट

तेथे राक्षसांची प्रेते पाहून ते दचकले. तेवढ्यात त्यांना एक बेशुद्ध पडलेला राक्षस दिसला. त्याच्या तोंडात पाणी घालून त्यांनी त्यास सावध करून हातिमासंबंधी विचारले. तेव्हां त्याला व त्यांच्या रक्षकांना राक्षसांनी पकडून आमच्या राजाकडे नेले आहे असे त्याने सागितले. तेव्हा त्याने त्याला पकडून वीरसिंहाच्या पुढे आणून उभे केले.

त्याला पाहून वीरसिंह संतापून म्हणाला, 'बरझाक शहरी जाण्याऐवजी तुम्ही भलत्या ठिकाणी कसे गेलात?' तेव्हा त्याने सांगितले की 'हातिम राजास भूक लागल्याने आम्ही खाली उतरलो व मग अन्नशोधार्थ गेलो असता त्याना व इतर सेवकांना राक्षसांनी पकडून नेले. परत आल्यावर तेथे फक्त हाच राक्षस बेशुद्ध पडलेला दिसला. तेव्हां त्यालाच आपल्याकडे आणले आहे.' ते ऐकल्यावर वीरसिंहाने चिडून राक्षसास विचारले,' त्या थोर पुरूषास आणि माझ्या सेवकास तुम्ही का पकडलेत?' तेव्हा राक्षस थरथरत म्हणाला, 'महाराज! हे लोक आपले आहेत हे आमच्या राजास कसे ठाऊक असणार! शिवाय आपण पूर्ववत झाला हे सुद्धा अजून कोणालाच ठाऊक नाही.'

नंतर ताबडतोब वीरसिंह स्वतः आपली सेना घेऊन आकाशमार्गाने राक्षस राज्यात येऊन उतरला. त्याच्या हेरांनी राक्षस राजाचा तपास करून तो शिकारीस गेल्याची बातमी आणली. तेव्हा वीरसिंहाने त्याच्या राज्यासच वेढा देऊन राक्षसांची कत्तल केली. इतक्यात राक्षसाचा राजा परत आला तेव्हा त्यास कैद करून सेवकांनी वीरसिंहापुढे उभे केले.

तेव्हा वीरसिंहाने त्याला विचारले, 'काय रे अधमा! त्या थोर पुरूषास व माझ्या सेवकांस कैद करून तू कोठे ठेवलेस?

पण तो राक्षसराजा जेव्हा दुरूत्तरे करू लागला, तेव्हा वीरसिंहाने सेवकांस मोठा अग्नी पेटवून त्यात राक्षस राजास जाळून टाकण्यास सांगितले. मग मात्र राक्षसराजास धडकीच भरली व तो काकुळतीला येऊन वररसिंहास म्हणाला, 'महाराज! मी आपल्याला शरण आलो आहे. मला जीवदान द्या. मग मी आपणास सर्व काही सांगतो.'

वीरसिंहाने संमती देताच तो म्हणाला, 'माझ्या राजवाड्याच्या तळमजल्याच्या कोठडीत मी त्यांना कैद करून ठेवले आहे.' ते ऐकताच वीरसिंहाने ताबडतोब आपल्या सरदारास पाठवून हातिमास व आपल्या सेवकांस सोडवून परत आणले. जेव्हा वीरसिंह हातिमास भेटला तेव्हां दोघांना फार आनंद झाला.

नंतर वीरसिंहाने ताबडतोब सेवकांस हुकूम केला की, 'ह्या दुष्ट राक्षसास प्रथम पेटवून द्या; कारण तो मरेपर्यंत आपला धोका टळणार नाहीं.' ते ऐकून राक्षस गयावया करू लागला. पण वीरसिंहाने त्याला क्षमा न केल्याने शेवटी सेवकांनी त्याला जाळून टाकले.

नंतर चार सेवकांसह त्यांनी हातिमास विमानातून पुढे धाडले. वाटेत ते विमान खास विश्रांतीकरिता एका पर्वतावर थांबले. तिथे एक गंधर्व राजपुत्र अश्रू गाळत बसलेला त्यांनी पाहिला. तेव्हा जवळजाऊन हातिमने त्यास विचारले, 'तूं कोण? इथे असा रडत का बसलास?' तेव्हा त्या राजपुत्राने आपले नाव सांगून हातिमला प्रवासाचे कारण विचारले. तेव्हा हातिम म्हणाला, 'पर्णकोंबडीच्या अंड्याच्या आकाराचा एक मोती बरझाक शहरी आहे. त्याच्या प्राप्तीसाठी मी जातं आहे. परंतु तुझे रडणे कानावर पडल्याने तुझी विचारपूस करण्यासाठी इथे आलो आहे.'

त्यावर राजपुत्र म्हणाला, 'महाराज! आपल्या सांगण्याप्रमाणे

एक मोती त्या शहरी आहे, पण त्याचा पूर्वापार इतिहास आम्हा गंधर्वास माहीत नाही. तेव्हा तुन्हा मानवास काय माहीत असणार? ते ऐकून हातिम म्हणाला, 'अरे! परमेश्वर पाठीराखा असल्यावर मानवाला या जगात काय अशक्य आहे? म्हणून इतक्या उंचावर रडत बसण्याचे तुझे कारण मला सांग.'

मग तो गंधर्व सांगू लागला, 'महाराज! एकदा मी माझ्या पित्याच्या दरबारी बरझाक राजकन्येच्या रूपगुणांची अपार स्तुती ऐकली. त्यामुळे मी बेचैन होऊन तडक तिच्या पित्याकडे जाऊन तिला मागणी घातली.

दुसरे दिवशी राजाने दरबार भरवून मला त्या मोत्याची पूर्वापार हकीकत सांगण्यास सांगितले, पण मला काहीच माहिती नसल्याने माझा नाइलाज झाला. ते पाहून राजा म्हणाला, 'मी विचारलेली माहिती जो सांगेल त्यालाच तो मोती व राजकन्या मिळेल' हे ऐकल्यावर मी येथे येऊन राकन्येच्या प्राप्तीसाठी विव्हळतो आहे.' त्यावर हातिम म्हणाला, 'तूं माझ्याबरोबर चल, तुला राजकन्या मी मिळवून देतो,' पण राजपुत्राचा त्यावर विश्वास बसेना. शेवटी हातिमने त्यास वचन दिल्यावर तो तयार झाला नंतर ते विमानात बसले. थोड्याच वेळांत त्यांच्या विमानाने आकाशात झेप घेतली. पुढे ते विकर्ण राक्षसाच्या हद्दीतून जाऊ लागले. पण तेथील राक्षसांनी विमान खाली उतरवून त्यांना विकर्णाकडे नेले. त्याने 'तुम्ही कोण? या राज्यावरून का चाललात?' असे विचारल्यावर आम्ही वीरसिंहाचे लोक असून बरझाक शहरी निघालो आहोत असे त्याला सांगण्यात आले.

तेव्हा तो भडकून म्हणाला, 'वीरसिंह भुंजग रूपाने हिंडतो आहे. त्याचे नाव घेऊन या विकर्णाला फसविता काय?' इतक्यात

गंधर्व राजपुत्राकडे त्याचे लक्ष जाताच, तो त्याला म्हणाला, 'तुझा पिता माझा जिवलग मित्र असल्याने तुला सोडतो, पण यांना मी कैद केले आहे.' गंधर्वपुत्र ते ऐकून म्हणाला, 'तुम्ही यांना कृपा करून सोडा, कारण माझे फार महत्त्वाचे काम हे लोक करणार आहेत. तुम्हाला खावयास माणसे पाहिजे असतील तर दुसरी दहा माणसे मी येथे हजर करतो'

विकर्णाने त्याच्या म्हणण्यास होकार दिल्यावर मी पाच दिवसात दहा माणसे आणतो, तोपर्यंत यांना कोणतीही इजा करू नका असे सांगून तो गंधर्व तेथून निघाला, परंतु वाटेत ठिकठिकाणी विमान उतरवूनही त्याला माणसे मिळू शकली नाहीत. तेव्हा त्याने हातिमास पहारेकऱ्यांना चुकवून पळवावे असा बेत केला. रात्री त्याने आपले विमान हातिमास ठेवलेल्या बागेत उतरविले. तेव्हा पहारेकरी गाढ झोपलेले होते. त्याचा फायदा घेऊन आपल्या सर्व सेवकांस उठवून झोपलेल्या हातिमासह ते विमानात आले व ताबडतोब विमानाने उड्डाण केले. थोड्याच वेळात ते विमान एका गुप्त ठिकाणी आणले.

इकडे विकर्णाचे सेवक, हातिम व इतर लोक पळून गेलेले पाहताच अतिशय घाबरून शोधाशोध करू लागले. पण त्याच्याकाकांहीच उपयोग झाला नाही. नंतर दोनचार दिवसातच विकर्णाने हातिमास व इतर सेवकांना आणण्यासाठी शिपायांना हुकूम केला. पण ते पळून गेलेले कळताच तो भयंकर संतापला व त्याने सर्व शिपायांना जबरदस्त शिक्षा ठोठावली. थोड्याच दिवसात त्यांना विकर्णाच्या एका सरदाराने पाहिले व तो ती बातमी विकर्णास कळविणार हे लक्षात येताच त्यांनी त्याचे हातच छाटले. तेव्हा विकर्णास तुमची खबर सांगतो म्हणून तो रडत ओरडत तेथून पळून गेला.

इकडे ते सर्व पुढे निघाले. वाटेत त्यांना एक अरण्य लागले. तेव्हा गंधर्व राजपुत्र हातिमास म्हणाला, येथील राक्षसांचे व आमचे हाडवैर आहे. तेव्हा आपण येथून कसे जाणार?' त्याला चिंताक्रांत पाहून हातिमही विचारात पडला. इतक्यात त्याला राजहंसाच्या पिसांची आठवण होऊन तो आनंदाने आरोळी ठोकून म्हणाला, 'मी जरा राक्षस जालो तर तू पुढे येशील की नाहीं? ते ऐकून आश्चर्याचकित झालेल्या राजपुत्राने खुशीने मान डोलावली. नंतर हातिमने आपल्या बरोबरच्या सेवकास परत जाण्यस सांगितले.

पुढे गेल्यावर हातिमने राजहंसाची हिरवी पिसे जाळून त्याची राख पाण्यात घालून आपल्या अंगाला फासली. त्याबरोबर तो राक्षस झाला. ते पाहून गंधर्वांना कुतूहलाने त्यास त्याची हकीकत विचारली. तेव्हा हातिमने त्याला हंसाची माहिती सांगितली. पण मोत्यासंबधी काहीच कहीकत सांगितली नाही. थोड्या वेळाने ते दोघे पुढे निघाले.

बराच प्रवास केल्यावर दमल्याने एका झाडाखाली ते शांतपणे झोपले थोड्या वेळाने कांही राक्षस तेथे आले व त्यानी त्यांना जागे करून 'तुम्ही कोण? इथे का आला? कुठे चालला? वगैरे प्रश्न विंचारले. पण हातिमने चिडून त्यांना उलट विचारले, 'तुम्ही आम्हाला स्वस्थ झोपलो असताना का उठवलेत? गंधर्वराजाच्या वीरसिंह सेनापतीने आमच्या शूर्पकर्ण राजास ठार केले, शिवाय राजधानीची लूटमार करून तीसुद्धा पेटवून दिली. त्यामुळे मी वैतागून गेलो आहे. वीरसिंहाचा एक माणूस बरझाक शहराकडे निघाला होता. आमच्या राजाने विनाकारण त्याला कैद केले. ही बातमी वीरसिंहास कळताच चिडून जाऊन त्यांनी एवढा नाश केला. तो माणूस बरझाक राजाकडे गेला आहे व माझ्याबरोबर असणारा हा कर्मपुरीचा राजपुत्र आहे.

हातिमचे हे बोलणे राक्षसाना खरे वाटले व ते म्हणाले, 'तुम्ही शांतपणे झोप घ्या. आम्ही तुम्हाला त्रास देत नाही. बरझाक शहराकडे गेलेल्या माणसाला शोधण्यासाठी आम्ही तिकडे जातो' असे म्हणून सहजलक्ष तिकडे निघून गेल्यावर राजपुत्रास घेऊन हातिम पुढे निघाला.

काही दिवस प्रवास केल्यावर त्यांना सप्तसागराच्या संगमाचा किनारा लागला. तो पाहून हातिम म्हणाला, 'आता पलीकडे कसे जावयाचे?' त्यावर राजपुत्र उत्तरला, 'आपण त्याची काळजी करू नका. सागर पार करणारे उमदे घोडे थोड्या अंतरावर आहेत. त्याना मी आता घेऊन येतो.

गंधर्वपुत्र जाताच हातिमने पांढरी पिसे जाळून त्याची राख पाण्यात कालवून ती अंगास फासली. तेव्हा ताबडतोब त्याला मानव रूप प्राप्त झाले इकडे तो राजपुत्र घोडे मिळण्याच्या ठिकाणी गेला. तेथील राजा सोमदत्त हा त्याचा जिवलग मित्र होता. त्याने मोठ्या आनंदाने त्याला दोन घोडे घेऊन निरोप दिला.

हातिमास घेऊन ताबडतोब ते समुद्र पार करण्यास निघाले. वाटेतच हातिम अन्नपाण्यावाचून तळमळू लागला. गंधर्व पुत्रास हे कळताच त्याने त्यास एक फळ खाण्यास दिले. त्यामुळे हातिमाची तहानभूक तर भागलीच, पण त्याला उत्साहही वाटू लागला.

थोड्यात वेळात ते पैलतीरावर आले. त्यावेळी हातिमास वाटले की, आपण बरझाक शहरीच आलो. गंवधर्व राजपुत्रास त्याप्रमाणे विचारताच तो हसून म्हणाला, 'महाराज! अजून कमीत कमी सतत दहा दिवस तरी प्रवास करावा लागेल. पण माझ्या

पित्याचे राज्य जवळच असल्याने मी सैन्य आणतो. तो पर्यंत तुम्ही मात्र तेथून जाऊ नका.' विरूपाक्षाबरोबर लढाई करण्याची तुझी इच्छा आहे काय? असे हातिमने विचारतांच तो म्हणाला 'तो विचारसुद्धा मनात आणू नका. वाटेत येणाऱ्या अनेक संकटाना तोंड देण्यासाठी मी सैन्य आणतो आहे' असे म्हणून राजपुत्र निघून गेल्यावर हातिम जवळच असणाऱ्या रम्य उद्धानात जाऊन राहिला. इकडे गंधर्वपुत्र आपल्या राज्यात पोहोचला. त्याला पहाताच त्याच्या पित्याचा आनंद गगनात मावेना. तो म्हणाला, 'तुझा अनेक ठिकाणी तपास करूनही ठावठिकाणा समजेना त्यामुळे मी फार काळजीत होतो. तुझा बरझाक शहरी जाण्याचा उद्देश सफल झाला का?' त्यावर राजपुत्र उत्तरला, 'तुमचे शुभाशीर्वाद न घेताच मी गेलो. त्यामुळे मला यश आले नाही. अनेक संकटानी मी वैतागून गेलो होतो. शेवटी एका पर्वतावर मी रडत बसलो असता एक महापुरूष मला भेटला. बरझाक शहरी तो मोती मिळविण्यासाठी जात आहे.माझ्याबरोबर तेथे आलास तर तुझे काम करतो असे त्याने वचन दिले आहे.'

ते ऐकून राजा म्हणाला, 'बाळा! जिथे श्रेष्ठ गंधर्वांना त्या मोत्याची गंधवार्ता नाही तिथे सामान्य माणसाला काय माहीत असणार! तेव्हा त्याचा नाद सोडणे बरे नाही का?' त्यावर राजपुत्र उत्तरला, 'बाबा! कृपा करून गैरसमज करून घेऊ नका. त्या महात्म्याला माहीत नाही असे जगात काहीही नाही. तो माझी इच्छा पुरी करील याबद्दल शंकाच नाहीं.'

हे त्याचे निश्चयाचे बोलणे ऐकून राजा म्हणाला, 'तरतर मग त्या श्रेष्ठ पुरूषाला न घेताच तू इकडे कसा आलास? तेव्हा राजपुत्राने सांगितले कीं, 'तो फारच थकल्याने विश्रांतीसाठी वाटेतच थांबला आहे. वाटेत येणाऱ्या संकटाना तोंड देण्यासाठी

फौजफाटा घेऊन येतो असा सांगून मी आपल्या भेटीस आलो' ताबडतोब राजाने सेनापतीला बोलावून सैन्यासह बरझाक शहरी जाण्याचा हुकूम दिला.

आपल्या पित्याला वंदन करून आणि त्याचे आशीर्वाद घेऊन राजपुत्र सैन्यासह हातिमाकडे आला व कांही दिवसातच वाटेतील सकटांचा नायनाट करून बरझाक शहराजवळ येऊन पोहोचला.

इकडे विरूपाक्षास गंधर्व राजपुत्र मोठ्या सैन्यानिशी आल्याची वार्ता त्याच्या हेराकडून समजली. ताबडतोब स्वतःच्या सेनेनी जय्यत तयारी करून तो त्याच्या वाटेवर येऊन थांबला. गंधर्व राजपुत्राने जेव्हा विरूपाक्षाची प्रचंड सेना पाहिली तेव्हा आपला याच्यापुढे टिकाव लागणार नाही हे ओळखून मोठ्या कौशल्याने त्याने विरूपाक्षास निरोप पाठविला की, 'मी आपल्याशी युद्ध करण्यासाठी आलो नसून येमेन राजपुत्र हातिमासह आपल्या भेटीसाठी आलो आहे' तेव्हा विरूपाक्षाने अतिशय आनंदाने त्याचे स्वागत केले. नंतर मोठ्या मिरवणुकीने तो त्यांना घेऊन शहरात गेला.

राजाने हातिमास व गंधर्व पुत्रास दुसऱ्या दिवशी आपल्या दरबारात बोलाविले. तेथे गेल्यावर आपला येथे येण्याचा हेतू काय असे विचारल्यावर हातिमाने त्याला सर्व हकीकत सांगितली.

नंतर आपल्याजवळचा मोती हातिमाने राजासमोर ठेवला तेव्हा राजा म्हणाला,' याच्यासारखाच दुसरा मोती माझ्याजवळ आहे. पण त्याच्या उत्पत्तीपासून सारा इतिहास सांगणाऱ्यासच मी माझी कन्या व मोती देणार आहे' तेव्हा हातिम म्हणाला, 'महाराज! आपली प्रतिज्ञा मला माहीत आहे. मी जर तो इतिहास सांगितला तर मी सांगेन त्याच्याशी आपल्या मुलीचा विवाह करून देण्याची माझी अट आपण पुरी कराला का?' राजाने

त्याप्रमाणे संमती दिल्यावर हातिमने त्याची पूर्वापार हकीकत सांगितली. ती ऐकल्यावर राजाने आपल्याजवळ असणारा मोती हातिमापुढे ठेवून म्हटले, 'आपण जी सत्य हकीकत सांगितली त्याबद्दल मोती तुम्हाला बक्षीस दिला आहे. आता माझ्या मुलीचा विवाह कोणाशी करू ते सांगा?'

हातिमने 'माझा मित्र गंधर्व राजपुत्र याच्याशी तिचा विवाह करावा' असे सांगित्यालवरून राजाने त्याप्रमाणे सुमुहूर्त पाहून मोठ्या सोहळ्याने त्याचा विवाह समारंभ साजरा केला.

नंतर हातिमने राजाचा निरोप घेतला त्यावेळी त्याने आपले बरेच सैन्य त्याच्याबरोबर पाठविले. मार्गामध्ये येणाऱ्या साऱ्या संकटाचा नायनाट करीत तो वीरसिंहाकडे आला. तेव्हां वीरसिंहाला आनंद झाला. नंतर त्याने आपल्या सेवकांसह हातिमला एक विमानात बसवून शहाबादेकडे पाठविले. शहाबादेस गेल्यावर मुनीरशहास घेऊन तो हुस्नबानूकडे गेला.

नंतर त्याने तिला सर्व हकीकत सांगून मोती दिले. यावेळी तिला फार समाधान वाटले.

'मी आपल्याला सहा प्रश्नांची उत्तरे दिली, तेव्हा आता सातवा प्रश्न सांगा' असे हातिमने म्हटल्यावर, 'हमामबादगिर्दची खबर आणणे! हा झाला माझा शेवटचा प्रश्न. त्याचे उत्तर आणल्यावर तुमच्या सांगण्याप्रमाणे वागण्यास मी तयार आहे.'

त्यानंतर बानूने आग्रह केल्यामुळे हातिमने दोन दिवस विश्रांती घेतली व तो सातव्या प्रश्नाच्या शोधार्थ निघाला. त्यावेळी लवकर सुखरूप परत या. अशी बानू व मुनीरशहाने इच्छा प्रदर्शित केली.

# सातवा प्रश्न

## 'हमामबादगिर्दची खबर आण'

शेवटच्या प्रश्नाला उलघडा करण्याच्या जिद्दीने शहाबादेहून हातिम प्रवास करीत एका शहरापाशी आला. तेथे एक विहीर होती. तिच्या भोवती बरीच माणसे गोळा झालेली पाहून हातिमने जवळ जाऊन चौकशी केली. तेव्हा त्यातील एका माणसाने सांगितले की, 'आमच्या गावातील एका वैद्याचा मुलगा गेली कांही वर्षे भ्रमिष्टासारखा वागतो आहे. त्याच्यावर अनेक उपाय करूनसुद्धा काहीच फरक पडला नाही. त्या मुलाने दोन दिवसापूर्वी या विहिरीत जीव दिला. तेव्हा त्याचे प्रेत वर काढावे म्हणून आम्ही खूप प्रयत्न केला, पण अजूनही ते हाती लागत नाही. त्याचे आईबाप सारखे रडत आहेत.'

हे ऐकल्यावर जवळ बसलेल्या त्याच्या आईबापाजवळ जाऊन हातिम म्हणाला, 'झाल्या गोष्टीला आता उपाय नाही, पण विहिरीत उडी टाकून तुमच्या मुलाचा मी शोध करतो. तोपर्यंत शोक न करता तुम्ही तेथे थांबा'

त्यांनी संमती दिल्यावर हातिम पाण्यात उडी मारून तळाशी गेला. त्याचे पाय जेव्हा तळला लागले तेव्हा त्याने डोळे उघडले आणि काय आश्चर्य! आपण विहिरीच्या तळाशी नसून जमिनिवरील एका रम्य उद्यानांत उभे आहोत असे त्यास दिसले. नंतर तेथील सृष्टिसौंदर्यावर नजर टाकीत हातिम एका हिरेमाणकांनी व रत्नांनी शृंगारलेल्या महालाजवळ आला.

त्यावेळी महालाचा दरवाजा उघडा पाहून आधीच भारावलेला

हातिम सरळ आतील दिवाणखान्यात गेला. तेथे सर्वत्र रंगीबेरंगी झुंबरे लटकत होती. भरजरी गालिच्यांची व्यवस्थित बैठक घातलेली होती. मध्यभागी काही रत्नजडित सिंहासने होती. त्यापैकी एकावर साक्षात सौंदर्यदेवताच बसली असून दुसऱ्यावर एक पुरूष बसला होता. त्याच्या समोर कांही सुंदरी नाच - गायन करीत होत्या. एकंदरीत वातावरण बेहोश करणारे होते.

इतक्यात हातिमास त्या सौंदर्यसम्राज्ञीने पाहिले व त्यास खूण करून एका सिंहासनावर बसण्यास सांगितले. हातिम त्याप्रमाणे समोरील दृश्य पहात सिंहासनावर बसला. थोड्या वेळाने कार्यक्रम संपल्यावर त्या सुंदरीने हातिमास विचारले, 'आपण कोण? इथे कसे आला? आपला येण्याचा उद्देश काय?' मग हातिमने विहिरीत उडी का मारली याची सर्व हकीकत सांगून म्हटले, 'मी येमेन देशाचा राजपुत्र असून हमामबादगिर्दची खबर आणण्याकरिता निघालो आहे.'

त्याचे बोलणे ऐकल्यावर तेथे बसलेला एक तरूण म्हणाला, 'महाराज! आपण ज्याला शोधण्यासाठी विहिरीत उडी टाकली तो तुमच्या शेजारीच बसला आहे मी एक दिवस त्या विहिरीच्या काठावर निवांत बसलो असता ही सुंदरी पाण्यातून बाहेर आली. तिचे अप्रतिम लावण्य पाहनू मी जवळ-जवळ वेडाच झालो ती दृष्टीस पडावी म्हणून मी रोज विहिरीवर येऊन बसे व ही सुद्दा पाण्यावर येऊन मला मोहून टाकीत असे.

शेवटी एकदा हिच्या प्राप्तीसाठी मी सरळ हिला पाण्यात पहाताच वरून उडी टाकली व येथे येऊन पोहचलो. मग आम्ही गांधर्व विवाह केला. सध्या मी फार सुखात आहे. ते ऐकून हातिम म्हणाला, 'येथे तू जरी सुखात असलास तरी बाहेर

२८२५

तुझे आईवडील तू नाहीसा झाल्याने आक्रोश करीत आहेत. त्यांचा काही विचार करशील का नाही? तेव्हा तो तरूण म्हणाला, 'ही स्त्री जर मला वर येऊन सतत भेटेल तर मी तुमच्याबरोबर नक्कीच येतो.' नंतर हातिम त्या गांधर्व सुंदरीला म्हणाला, 'केवळ तूं वरल्यामुळेच हा इतक्या सुखात आहे. पण तिकडे त्याचे आईवडील दु:खाने व्याकुळ झाले आहेत. तेव्हा याला वर पाठविल्यास फार उपकार होतील' त्यावर ती सुंदरी म्हणाली, 'ज्याप्रमाणे हा स्वखुशीने येथे आला त्याप्रमाणे याला येथून स्वत:च्या मर्जीप्रमाणे नक्कीच जाता येईल. पुरूषासारखी स्वार्थी जात त्रिभुवनात कोठेच आढळणार नाही. शिवाय मी गंधर्व स्त्री आहे हे माहीत असूनही माझ्याशी कायम संबंध ठेवण्याच्या बुद्दीने हा मला वर कसा काय बोलवितो? तेव्हां हातिम म्हणाला, 'मी स्वत: गंधर्व स्त्रीशी विवाह केला आहे. शिवाय निरनिराळ्या गंधर्व राज्यांत फिरल्याने मला तुमची खडान् खडा माहिती आहे. मानव व गंधर्व यांचे अनेक विवाह मी पाहिले आहेत.'

ते ऐकून ती म्हणाली, 'तुमचे म्हणणे खोटे आहे असे मी बिलकुल म्हणत नाही, पण खऱ्या प्रेमाशिवाय त्यागास कोण तयार होणार?' हे ऐकताच तो तरूण एकदम म्हणाला, 'प्रत्यक्ष मातापित्याचा त्याग करून मी विहिरीत बेधडक उडी मारून येथे आलो तो काय हिच्यावर माझे प्रेम नाही म्हणून? त्याचे बोलणे ऐकून त्या सुंदरीने सेवकाकरवी एक मोठी कढई आणून तूप उकळावयास लावले व नंतर ती त्याला म्हणाली, 'खरोखरच जर तुझे माझ्यावर प्रेम जडले असेल तर तू या कढईत उडी टाक. तेव्हा ताबडतोब तो तरूण कढईत उढी टाकण्यास धावला. पण त्या स्त्रीने मोठ्या चपळाईने त्यास पकडून 'जिवलगा! खरोखरीच तुझे माझ्यावर प्रेम असल्याशिवाय तू येवढे मोठे दिव्य करण्यास

धजावला नाहीस. नंतर तिने सेवकास बोलावून हातिमास त्यास कांठावर पोहचविण्याची आज्ञा केली, हातिम जेव्हा वर आला तेव्हां त्याच्याबरोबर आपला मुलगा आहे हे पाहून त्या वृद्ध मातापित्यांत विलक्षण आनंद झाला. त्यानी हातिमचें आभार मानले. जमलेल्या सर्व लोकांनी हातिमचे फारच कौतुक केले. पुढे गंधर्व-स्त्री दिलेल्या वचनाप्रमाणे सतत प्रियकराच्या घरी येत आहे, हे पाहून मोठ्या आनंदाने हातिम पुढच्या प्रवासाच्या तयारीस लागला.

कांही दिवसांनी एका शहराजवळ पोहोचल्यावर हातिमास एक फकीर भेटला. त्याला एकट्यालाच पाहून फकिराने त्याला तू कोण? कुठे जात आहेस? तुझे काय काम आहे? वगैरे प्रश्न मोठ्या आपुलकीने विचारले.

हातिमने त्याला सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्यावर तो म्हणाला, 'बेटा! आपण थोडे पुढे जाऊ म्हणजे माझा मठ लागेल. आजचा दिवस तू तेथेच मुक्काम कर. हातिम त्याप्रमाणे फकिराच्या बरोबर त्याच्या मठात आला. थोड्या वेळाने फकिराने परमेश्वराची प्रार्थना करताच तेथे भोजनाची दोन ताटे सिद्ध झाली. मोठ्या समाधानेने दोघांनी भोजन केल्यावर फकीर हातिमास म्हणाला, 'बेटा! तू हमामबादगिर्द पर्वतावर जाण्याचा बेत रहीत कर. तिकडे जाणारा कधीच परत येत नाही. कारण तेथे भयंकर धोका आहे.

फकिराचे म्हणणे ऐकल्यावर हातिम म्हणाला महाराज! ईश्वरावर माझी पूर्ण श्रद्धा असल्याने त्या भयंकर धोक्यातूनही तो वाचवील याबद्दल मला कसलीच शंका वाटत नाही. 'त्यावर फकीर म्हणाला, तुला काहीच माहिती नसल्याने व्यर्थ बळी पडशील. यावर हातिम उत्तरला, 'महाराज! आता शेवटच्या प्रसंगी मी जर खचून गेलो व माघारी फिरलो तर परोपकारासाठी झटणाऱ्या या देहाचे सार्थक

होणार नाही. त्याशिवाय वचनभंगाचे घातक लागेल ते निराळेच. माझ्या कीर्तीला कलंक लावण्याऐवजी मी देहपतन आनंदाने स्वीकारीन' हे ऐकल्यावर या निश्चयी व कणखर पुरूषाला न बोलणे योग्य अशा विचाराने फकीर गप्प राहिला.

दुसरे दिवाशी फकीर हातिमबरोबर दोन रस्त्याच्या फाट्यावर गेला. व त्यास म्हणाला, 'बेटा! उजव्या हाताच्या रस्त्याने सरळ जा म्हणजे तू एका खूप उंच असणाऱ्या पर्वतावर पोहोचशील. पुढे भीतिदायक मार्ग संपल्यावर पुन्हा दोन रस्त्याच्या फाट्यावर येशील. तेथून डाव्या रस्त्याने चालू लाग, उजव्या रस्त्याने जाऊ नकोस. तो जरी जवळच असला तरी वाटेत भयंकर धोका पोहोचेल.'

फकिराचे सांगितलेल्या हमामबादगिर्दच्या रस्त्याची माहिती झाल्यावर हातिमने त्यास वंदन केले. फकिराने त्याला आशीर्वाद दिल्यावर तो पुढें चालू लागला. थोड्याच दिवसात तो एका शहरात येऊन पोहचला. तेथे एक प्रचंड मंडप उभारला होता व कित्येक वाद्ये जोरजोराने वाजविली जात होती. तेथे काय चालाले आहे याची हातिमने जवळ जाऊन चौकशी केली. तेव्हा त्याला सांगण्यात आले की, 'दरवर्षी, या गावात एक भुजंग मनुष्यरूप धारण करून येतो. नंतर गावांतील मुले एकत्र आणतात. मग त्याला आवडेल तो मुलगा दयावा लागतो. भुजंग येण्याची वेळ झाली असल्याने त्याच्या स्वागतासाठी वाध्ये वाजवून लोक आनंद व्यक्त करीत आहेत. लोक वरून आनंदी असले तरी आतून भयंकर संतापलेले असून अतिशय दुःखी आहेत.'

ती हकीकत ऐकल्यावर हातिम सर्वांना म्हणाला, 'आज त्या सर्पाला ठार करून तुमच्या मुलाबाळांचा जीव मी वाचविणार

आहे. पण माझ्यावरच संकट आले तर तुम्ही मदत करण्यासाठी जय्यत तयार राहा.' हातिमचे हे बोलणे राजाच्या कानावर जाताच त्याने त्यास राजवाड्यात बोलावून घेतले. दोघांचे बोलणे झाल्यावर हातिम राजास म्हणाला, 'तो सर्प आल्यावर त्यास बाजावून सांगा की, आज आमच्या सार्वभैम राजाचा पुत्र येथें आला आहे. त्याची परवानगी काढल्यावाचून दरव़र्षाप्रमाणे मुलगा देणे माझ्या अधिकारातील बाब नाही.'

थोड्याच वेळात तो सर्प आल्याची बातमी आली तो सर्प मानवी रूप धारण करून राजासह भोजन करू लागला. त्यावेळी त्याला पाहून हा सर्प नसून मायावी राक्षस आहे. हे हातिमने जाणले. नंतर त्याने राजाबरोबर यथेच्छ भोजन केले.

थोड्या वेळातच 'आता गावातील मुले ताबडतोब घेऊन या' असा त्याने राजास हुकूम केला. राजाने सर्व मुले त्याच्यासमोर उभी केल्यावर त्याने एक सुंदर मुलगा पंसत केला. पण तेवढ्यात राजा म्हणाला, 'दरवर्षी मी काही तक्रार न करता तुम्हाला आवडेल तो मुलगा देत असे पण आज आमच्या सार्वभौम राजाच़ा पुत्र तेथे मुक्कामाला असल्याने त्याने परवानगी दिल्याशिवाय हवा असलेला मुलगा तुम्हाला देण्याचा मला अधिकार नाहीं'

हे ऐकून राक्षस संतापून म्हणाला, 'त्याला प्रथम माझ्यापुढे आणा.' त्याप्रमाणे हातिमाला पुढे करण्यात आले. हातिमला पहाताच राक्षस म्हणाला, 'हातिम, आता ह्याना तू मदत करणार वाटते पण आपली मला पूर्ण ओळख असल्याने मी कोणासही न नेता परत जातो.' तेव्हा त्याचा हा कावा ओळखून हातिम म्हणाला, 'तुमच्या रितीरिवाजाप्रमाणे तुम्हाला आवडलेला मुलगा घेऊन जा, पण पाहुण्याचे स्वागत करण्याच्या आमच्या पद्धतीप्रमाणे

हे पाणी प्या.' राक्षस ताबडतोब ते पाणी प्याला. त्याबरोबर थोड्यात वेळात त्याची सारी शक्ती नष्ट झाली. तो दुर्बळ बनण्याचे कारण त्या पाण्यात अस्वल-कन्येने दिलेला मोती हातिमने उगाळून घातला होता. नंतर हातिमने त्या मनुष्यरूप धारण केलेल्या राक्षसास एका पेटीत बसविलें व ती पेटी राक्षससेवकांना जाळून टाकण्यास सांगितली राक्षसाने त्यातून बाहेर पडण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण त्याचे सामर्थ्य नष्ट झाल्यामुळे अखेर त्याचा नाश झाला.

.राक्षसांचा नाश केल्याने गावकऱ्यांना देव भेटल्याचे आनंद झाला. त्यांनी हातिमाला मोठ्या मिरवणुकीने जयजयकार करीत गावात आणले व चार दिवस गावात मोठा सोहळा साजरा केला.

नंतर हातिम सर्वांचा निरोप घेऊन पुढे निघाला, पण वाटेत रस्ता चुकल्याने तो एका घनघोर अरण्यात आला. तेथे अनेक संकटाना तोंड देऊन तो मोठ्या कष्टानें एका विस्तीर्ण मैदानात येऊन पोहचला. पुढे थोडे अंतर चालून गेल्यावर त्याला पुष्कळ क्रूर श्वापदे इतस्तत: फिरताना दिली. त्यातील काहीच्या दृष्टीस हातिम पडताच ती त्याच्या अंगावर धावून आली. त्यांच्याकडून हातिम ठार होणार इतक्यात तो फकीर त्या ठिकाणी प्रकट होऊन हातिमास म्हणाला, 'तू माझ्या सांगण्याप्रमाणे योग्य मार्गाने न येता भलतीकडूनच आलास त्यामुळे विनाकारण या भयानक संकटात सांपडलास.' हे ऐकल्यावर हातिमने फकिराचे पाय धरले. तेव्हा तो दयाळू फकीर म्हणाला, 'बेटा! धीर सोडू नकोस. अस्वलकन्येचा मोती ताबडतोब तोंडात धर म्हणजे ही संकटे चुटकीसरशी नाहीशी होतील.

त्याप्रमाणे हातिमने तो मोती तोंडात धरला. थोड्यात वेळात

सारी जनावरे पटापट मरून पडली व हातिमचा मार्ग मोकळा झाला. नंतर प्रवास करीत हातिम विलासपूर नावाच्या शहरता आला.

तेथील राजाची भेट घ्यावी या विचाराने तो बराच नजराणा घेऊन राजवाड्यात गेला. हातिमच्या नजराण्याचा मोठ्या आनंदाने राजाने स्वीकार केला. हातिमच्या भेटीमुळे राजा फार संतुष्ट झाला. या थोर पुरूषाचा सहवास घडला म्हणून त्याने काही दिवस हातिमास तेथेच राहण्याची विनंती केली. हातिम व राजाची रोज भेट होई. एके दिवशी बोलता-बोलता राजा म्हणाला, आपली काही इच्छा अस्लयास मला सांगा म्हणजे मी ती ताबडतोब पुरी करीन, आपण संतुष्ट झालात तर मलाही समाधान लाभेल.

राजाचे म्हणणे ऐकल्यावर हातिम म्हणाला, 'महाराज आपल्या हद्दीत हमामबादगिर्द नावाचा पर्वत आहे. तेथे जाऊन तो पहावा एवढीच माझी इच्छा आहे.' आपण परवानगी दिली तर ती माझी इच्छा नक्कीच पूर्ण होईल. हातिमची इच्छा ऐकून राजा खिन्न झाला. थोडा वेळ अगदीं स्तब्ध राहिल्यानंतर मोठ्या कष्टाने तो म्हणाला, तेथे गेलेला एकही माणूस परत आला नाही म्हणून कोणत्याही माणसास त्या पर्वतावर जाऊ द्यावयाचे नाही अशीं मी प्रतिज्ञा केली आहे. त्यातून आपल्यासारख्या थोर माणसाशी माझी मैत्री झाली आहे आणि सर्व कांही माहीत असून विनाकारण तुम्हाला मृत्यूच्या खाईत लोटण्याचे महापातक करायला माझे मन धजावत नाही.

नंतर हातिमने मुनीरशहा व हुस्बानू यांची हकीकत राजास सांगितली. हुस्नबानूच्या सहा प्रश्नांची उत्तरे आणण्याकरिता आपण जे अतोनात प्रयत्न करून यश मिळविले तसे अदयाप कोणालाही

मिळाले नाही व त्यावेळी जेवढ्या संकटांना तोंड दिले तेवढी संकटे अजूनही कोणाला सोसावी लागली नाहीत. तेव्हा मी दिलेल्या वचनातून मुक्त होण्यासाठी मला फक्त परवानगी द्या. मी नक्कीच यशस्वी होईन. असे हातिमने म्हटल्यावर शेवटी राजाने त्याला आज्ञापत्र दिले.

थोडे दिवस प्रवास केल्यावर हातिम पर्वतावर पोहोचला तेथे असणाऱ्या रखवालदाराने त्यास अडविले, तेव्हा त्याने त्याला राजाज्ञा दाखविली. मग रखवालदाराने त्यास इमामखान्याच्या दरवाजाजवळ नेऊन सोडले. शंभर फूट उंच असणाऱ्या त्या दरवाजावर 'शुरसेन राजाने पर्वतावरील इमामखान्यात इंद्रजाळ करून ठेवो आहे. त्यामुळे आत गेलेला कोणीही अद्याप बाहेर आलेला नाही.' असे वाक्य लिहिलेले हातिमने वाचले.

नंतर त्याने मागे पाहिले तर तो पहारेकरी तेथे नव्हता व पुन्हा दरवाजासुद्धा दिसेनासा झाला होता. त्यामुळें बुचकळ्यात पडलेला हातिम तसाच पुढे निघाला. तेव्हा त्याला एक माणूस दिसला. हातिमने त्याला सलाम ठोकला. त्यानेही उलट सलाम करून हातिमच्या हातात एक आरसा दिला. आरशात पहाताच त्याला इमामखाना दिसूं लागलला. मला तेथे जावयाचे आहे असे म्हणणाच तो त्यास इमामखान्यात घेऊन गेला.

तेथे असणाऱ्या एका लाल रंगाच्या पुष्करणीत हातिमास बसवून ह्याच्या डोक्यावर तीन तांबे पाणी ओतताच जणू काय प्रलयकालच होत आहे असा प्रचंड गडगडाट झाला. चोहीकडे काळाकुट्ट अंधार पसरला. थोड्याच वेळाने सगळीकडे स्मशानवत् शांतता पसरली. पुष्करणीतील पाण्याबरोबरच इमामखान्यातील शिखराची उंचीसुद्धा वाढत असल्याचे त्याच्या लक्षात आले. तो वाढलेल्या

पाण्यात पाहू लागला. इतक्यात पाणी एकदम शिखरापर्यंत पोहचल्याने हातिमने शिखरास घट्ट पकडले. त्याबरोबर मोठा आजाज झाला व आपण एका अरण्यात उभे असल्याचे त्याने पाहिले. तेथे एक अत्यंत शोभिवंत महाल होता. त्यात गेल्यावर तेथे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ ठेवलेले होते. त्याने त्यातले कांही खाल्ले, पण त्यामुळे त्याची भूक मात्र बिलकुल शमली नाही. पुढें गेल्यावर त्याने एका दालनात संगमरवरी दगडाचे अनेक पुतळे उभे केलेले पाहिले.

इतक्यात एक पोपट मनुष्यवाणीने म्हणाला, 'अरे मानवा! आपला जीव व्यर्थ कशासाठी धोक्यात घातलास?' ते ऐकताच हातिम दचकून इकडे तिकडे पाहू लागला. तेव्हा त्याचे लक्ष दगडावर कोरलेल्या मजकुराकडे गेले.

त्यावर लिहिले हाते की 'हे माणसा! या ठिकाणी तू आलास खरा. पण तुला आता परत जाता येणार नाही. शूरसेन राजास पूर्वी जो अमूल्य हिरा मिळाला होता त्याच्या जोडीचा दुसरा हिरा मिळविण्यासाठी त्याने अतोनात प्रयत्न केले, पण त्याला त्यात यश आले नाही. तेव्हा त्याने ते अमोल रत्न कुणाला कधीही मिळू नये म्हणून अनेक हुशार जादुगाराच्या साहाय्याने हे इंद्रजाळ तयार केले. आहे. या रमणीय महालात असणाऱ्या पोपटाच्या पोटात तो हिरा आहे. तुला जर स्वत:ची सुटका करून घ्यावयाची असेल तर तेतील दिवाणखाण्यात चौरंगावर असणाऱ्या धनुष्यबाणाने तू पोपटाला वध कर म्हणजे खात्रीने तुझी सुटका होईल. तीन बाणात पोपटाचा अंत झाला नाही तर तू दगडाचा पुतळा होऊन तेथे राहशील.'

तो संपूर्ण लेख वाचल्यावर हातिमला तेथे आल्याचा पश्चात्ताप झाला. तेथील इतर पुतळे म्हणजे आपल्याप्रमाणेच कोणाचेही न

ऐकता हट्टीपणामुळेच तेथे आलेले लोक आहेत याची त्याला खात्री पटली.

परमेश्वराच्या मर्जीप्रमाणे जे होणार आहे ते चुकणार नाही. आपले कर्तव्य करण्यात आपण कुचराई करू नये असा विचार मनात आल्याने त्याला अधिकच धीर आला व मोठ्या जोमाने त्याने पहिला बाण सोडला. तो बाण वाया गेल्यामुळे हातिमने गुड्यापर्यंत शरीर संगमरवरी झाले. तेव्हा पोपट बोलू लागला, 'बाबारे! अजूनही वेळ गेली नाही. स्वतःला आवर, व्यर्थ नाश करून घेऊ नकोस. ते ऐकल्यावर मात्र हातिम पुरताच भेदरला व रडू लागला.

तशा परिस्थितितही मन आवरून व हाती घेतलेले कार्य अर्धवट सोडावयाचे नाही असा निश्चय करून त्याने दुसरा बाण सोडला पण तोही चुकल्याने त्याचा कमरेपर्यंतचा भाग दगडी बनला.

आता हातिम इतका घाबरला की, काम अर्धवट सोडून आपली सुटका करून घ्यावी असे विचार त्याच्या मनात डोकावू लागले. पण जर हाती घेतलेले कार्य अर्धवट सोडले तर अर्धे पाषाणाचे शरीर घेऊन कसे जायचे ? आपल्याला पूर्वीप्रमाणे होण्यासाठी काय उपाय योजावे लागतील? असे नाना प्रकारचे प्रश्न त्याला भेडसावू लागले.

अखेर दैवाची परीक्षा पहायची, पण वाट्टेल ते झाले तरी माघारी फिरायचे नाही अशी प्रतिज्ञा करून व परमेश्वराची करूणा भाकून त्याने धनुष्य उचलून क्षणार्धात बाण सोडला.

तो बाण सूं सूं करीत पोपटाच्या कंठातच घुसला व पोपट गतप्राण होऊन खाली पडला. त्याबरोबर एक भयंकर कर्कश आवाज झाला. आता प्रलय होणार असे हातिमास वाटल्याने अंतसमयी परमेश्वराचे चिंतन करावे म्हणून त्याने डोळे मिटले. परमेश्वराची प्रार्थना केली. आपले वचन अखेरच्या समयी पुरे

होऊं शकेल की नाही म्हणून तो परोपकारी पुण्यात्मा अतिशय दु:खी झाला. मनुरशहाचीही त्याने मनात क्षमा मांगितली. पण काय आश्चर्य! थोड्यात वेळात सारे शांत झाले. व तो केवळ भास आहे ह्याची खात्री पटल्यावर त्याने डोळे उघडले.

त्याबरोबर तेथील महाल व इंद्रजाळ नाहीसे झालेले असून तेथे पोपटाचे मृत शरीर पडलेले त्याने पाहिले, जवळच एक अतिशय तेज:पुंज हिरा पडलेला त्याला दिसला. त्याने तो उचलून घेतला. त्याबरोबर ते दगडी पुतळे मनुष्यरूपात प्रकट झाले.

हातिमास ते सर्व लोक विचारू लागले की, आम्ही पुन्हा मानव कसे झालो? आम्हास कोणी सोडविले? इत्यादी. शेवटी हातिमने त्यांना सगळी हकीकत सांगितली. तेव्हा ते सर्व लोक म्हणाले, 'महाराज आपले उपकार आजन्म फिटणार नाहीत. आम्ही आपले अत्यंत ऋणी आहोत.' तेव्हा हातिम म्हणाला, 'मी काय केले? ही सर्व विधात्याची कृपा!

नंतर ते सर्वजण परत फिरले व रखावालदारास भेटले. तेव्हा सगळ्यांची सुटका करणाऱ्या हातिमचे त्यांनी फार कौतुक केले. थोड्याच वेळात हातिमने सर्वांना आपापल्या घरी जाण्यास सांगून आनंदाने निरोप घेऊन तेथून प्रयाण केले.

थोड्याच दिवसांत तो विलासपुरात आला व राजाच्या भेटीस गेला. हातिमास परत आलेला पहाताच राजाने त्याला कडकडून मिठीच मारली. नंतर राजास सारी हकीकत सांगून म्हणूनच हे सारे माझ्या हातून घडले' असे म्हणून हुस्नबानू व मुनीरशहास पर्वतावरून आणलेले अमोल रत्न दाखवून येतो व नंतर आपणास भेट देण्याची माझी इच्छा आहे, तरी आपण त्याला संमती द्यावी.' असे राजास विनविले, त्यास राजाने आनंदाने होकार दिल्यावर हातिम जाण्यासाठी परवानगी मागू लागला, पण राजाने अतिशय आग्रह करून त्यास चार दिवस ठेवून घेतले. निरोप दिला. त्यावेळी सर्वांना फार वाईट वाटले.

तेथून प्रवास करीत-करीत हातिम शहाबादेस आला. प्रथम त्याने धर्मशाळेत उतरलेल्या मुनीरशहाची भेट घेतली त्याला सारी हकीकत सांगितल्यावर आता आपल्याला हुस्नबानूची नक्कीच प्राप्ती होणार म्हणून तो अतिशय आनंदी झाला. त्याने हातिमचे मनापासून फार आभार मानले.

नंतर हातिमने हुस्बानूची भेट घेलती. त्याला परत आलेला पाहून बानूला अतिशय आनंद झाला. हातिमने जेव्हा तिला सातव्या प्रश्नाचा वृत्तांत सांगून तें रत्न दाखविले तेव्हां ती म्हणाली 'आपण माझ्या साऱ्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे दिलीत. तेव्हा आता आपली कोणतीही आज्ञा पाळण्यास मी तयार आहे.'

हे ऐकून हातिम म्हणाला, 'ज्या माझ्या जिवलग मित्रासाठी मी इतकी दुःखे सोसून तुझी अट पुरी केली, तेव्हा त्याच्याशी तू आता विवाह कर!' मुनीरशहा हा जसा रूपवान होता तसा ऐश्वर्यसंपन्न व गुणी राजपुत्र होता. हुस्नबानूस तो पसंत असल्याने व तिची अट पुरी झाली असल्यामुळे तिने त्याच्याशी विवाह करण्यास संमती दिली.

नंतर आपल्या गुरूस बोलावून तिने सुमुहूर्त ठरविला व त्या दोघांचा विवाह मोठ्या सोहळ्याने साजरा झाला.

हातिमने मोठ्या आनंदाने शहाबादेत सुमारे एक महिना घालविला. नंतर हमामबादगिर्द पर्वतावरून आणलेला हिरा त्याने सेवकांबरोबर विलासपूरच्या राजाकडे पाठवून दिला. मग हातिमने नवदांपत्याकडे आपल्या घरी जाण्याची परवानगी मागितली.

आपल्यासाठी ज्याने अनंत दुःखे सोसली त्याचा वियोग होणार म्हणून मुनीरशहास फार वाईट वाटले. त्याचप्रमाणे हुस्नबानुसुद्धा दुःखी झाली. जन्मोजन्मी हातिमचे उपकार फिटणार नाहीत याची जाणीव त्या दोघांना होती. तरही फूल ना फुलाची पाकळी म्हणून आपणाला आवडणारी अत्यंत मौल्यवान रत्नें व इतर सुंदर वस्तू बानूने हातिमास भेट म्हणून दिल्या. हातिमने त्याचा

२८२५

स्वीकार करून दोघांनाही शुभाशीर्वाद दिला. नंतर दोघेही त्यास शहराच्या हद्दीपर्यंत पोचविण्यास आली. हातिम त्यांचा निरोप घेऊन आपल्या शहरी येण्यास निघाला तेव्हा सर्वांना गहिवरून आले.

## *हातिम मायदेशी परतला*

हातिम इमनदेशी परत आला. तो आल्याची बातमी सर्वत्र पसरली तेव्हां लोकांनी त्याच्यावर पुष्पवृष्टी करून आनंद व्यक्त केला. त्यावेळी आपले सारे कष्ट विसरून हातिम उत्साही बनला. तो राजवाड्यात आल्यावर त्याने आपल्या पित्याच्या पायावर डोके ठेवले. तेव्हा दोघांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहू लागल्या. मग हातिमने भुवनसुंदरीची भेट घेतली व साऱ्या लोकांची चौकशी केली.

तईराजा हातिमास म्हणाला, 'पुत्रा! आता या पुढे कोठेही न जाता तू हे राज्य सांभाळावेस अशी माझी इच्छा आहे. आता माझे उतार वय झाल्यामुळे राज्याचा भार मी तुझ्यावर टाकणार आहे.' तेव्हा हातिम उत्तरला, 'बाबा! मी सर्व जगाचा अनुभव घेऊन आलो आहे. केवळ परोपकारासाठीच मी बाहेर पडलो होतो' आता मी कोठेच जाणार नाही असे आपल्याला वचन देतो.' ते ऐकल्यावर तई राजाचा आनंद गगनात मावेना.

नंतर एक सुमुहूर्त पाहून राजाने हातिमास राज्याभिषेक केला. त्यावेळी राजाने खूप दानधर्म केला. लोकांनीसुद्धा त्या सोहळ्यात उत्साहाने भाग घेतला होता. प्रत्यक्ष परमेश्वरानेसुद्धा पुष्पवृष्टी करून हातिमास आशीर्वाद दिला.

पुढे हातिमने कित्येक वर्षे राज्य केले. दीनदुबळ्यांचा तो वाली होता. दुष्टांचा तो नायनाट करणारा होता. कोणावर जुलूमजबरदस्ती न करता सत्याने व न्यायाने राज्य करून त्या प्रजेला फार सुखात ठेवले सर्व प्रजा राजा हातिमला देव मानी.